REGISTERED N. No.

सहामाही " ३ " ८८
साल अखेर " ७ " १ ८८
किरकोळ अंकास ........................८

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत ८० १
दर ओळीस........ ८१ ०६
दुसरे खेपेस .... .... ....८१

Six monthly........ 3 .............. 8 as
Single copy ................................4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...8 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOLXXXV AKOLA MONDAY I APRIL 1901 NO 12

वर्षें ३५ आकोला सोमवार तारीख १ माहे एप्रिल सन १९०१ इ० अंक १२


## पत्रव्यवहार

### संगीत मूक नायक नाटक.

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांस सा. न. वि. वि. मूक नायका बद्दल माझें जें मत झालें आहे, तें मी आपणाकडे पाठवीत आहे.

प्रसिद्ध वीरतनय नाटककर्ते रा० रा० श्रीपाद कृष्ण कोल्हटकर बी. ए. एल, एल, बी. तेल्हारा कोर्टातील वकील, यांनीं वरील नाटक लिहून तें विविधज्ञानविस्ताराच्या १९०० सालच्या अंकांतून प्रसिद्ध केलेलें आहे. वीरतनय आणि मूक नायक हीं आवळीं जावळीं भांवडेंच आहेत ह्मणण्यास हरकत नाहीं. महाभारतांतील सुरस कथा श्रवणानें, शूद्रकाच्या हास्य कारक व आनंद दायक नाटकाच्या ऐकण्यानें जगद्विख्यात शेक्सपीयरच्या रमणीय मानवीस्वभावाच्या देखाव्यानें जनसमूह तल्लीन होऊन जात असे, परंतु अलीकडे अधुनिक नाटककार स्वकपोलकल्पित नाटक रचूं लागले आहेत, व मराठी भाषेची सेवा होईल तितकी करीत आहेत ही समाधानाची गोष्ट आहे. शारदा नाटक, वीरतनय, हीं अधुनिक नाटकांत बरींच वठलेलीं आहेत. कित्येक ठिकाणीं जरी कमी जास्ती दोष आढळले तरी एकंदरीच्या परीक्षणावरून ते क्षम्य होण्या सारखे आहेत. एखादी तसबीर पाहून ज्या प्रमाणें मन आनंदित होतें. व मनावर एका प्रकारचा ठसा वठतो, त्या प्रमाणेंच कादंबऱ्या, नाटकें यांची गोष्ट आहे हें कोणास नव्यानें सांगण्याची अवश्यकता नाहीं. नाटककारांचा उद्देश ज्या वेळेस नाटक पौराणिक भागा पैकीं नसेल त्यावेळीं, तरी निदान कांहीं तरी परिणामदर्शक असावयास पाहिजे. ही बाजू रा० कोल्हटकर यांच्या नाटकांत फारच थोडी किंबहुना, नाहीं ह्मटलें तरी हरकत नाहीं.

नाटकांतील कथा भागः— रोहिणीचा पती शरश्चंद्र हा दारूच्या व्यसनानें राज्याचेंही नुकसान करूं लागला. त्याच्या वाईट लोकांच्या सहवासानें त्याच्या दारु पिण्याच्या व्यसनांत भरच पडत चालली. त्यामुळें रोहिणीस आपल्या नवऱ्याचें व्यसन कसें सुटेल याजबद्दल काळजी लागली. रोहिणीचा मामेभाऊ विक्रांत हा त्या नजीक मोठ्या मागाचा राजा होता. शरश्चंद्र एके वेळीं दारू पिऊन मार खाण्याच्या बेतांत आला असतां विक्रांतानें (मूक नायक ते हेच, कारण राजांनीं कोण वगैरे प्रश्न केला असतां विक्रांतानें उत्तर न देतां ते नुस्त्या खुणेनें दर्शविलें) मोठ्या मेहेनतीनें याचे प्राण वांचविले. विकंठा सारख्यांनीं दारूचें व्यसन राजास अधिक लागावे ह्मणून वरचेवर प्रयत्न केला व त्यांच्या प्रयत्नास यशही आलें आहे. शरश्चंद्राची बहीण प्रमद्वरा हिचें रूप फारच वर्णनीय असल्यामुळें विक्रांताचें मन सर्वतोपरी इच्यावर बसलें. तें इतकें कीं त्याला इच्या शिवाय कांहीं सुचेना. तिनें असा पण केला कीं शरश्चंद्राला दारूच्या व्यसनांतून जो मुक्त करील त्याला मी वरीन. पहिल्या प्रथम मुक्या सेवकाची ह्मणजे मूक नायकाची व हिची भेट झाली त्यावेळीं तिनें असें सांगितलें कीं विक्रांताशिवाय मी कोणासही वरीन विक्रांतच मूक नायकाचें रूप पालटून आला आहे ही गोष्ट तिला माहीत नव्हती. यामुळें अशी गोष्ट तिच्या हातून घडली. पुढें होतां होतां दारूच्या व्यसनांतून मुक्त करण्याचा पण एकीकडेसच राहिला कीं काय कोण जाणे ! ! कारण तिसऱ्या अंकातील विक्रांताच्या "मी पण जिंकला असें मला वाटतें" या ह्मणण्यावर मीही भरंवसा ठेवून पडद्याच्या आंत पण जिंकला असावा, असें धरून चालतों. याशिवाय यांत विशेष कांहीं नाहीं.

भाषेसंबंधानें:— पहिल्या अंकांत "अप्सरे सारखें लावण्य असून स्वभाव निगर्वी" असें ह्मटलें आहे. यावरून लावण्यवती स्त्रिया गर्विष्ट असतातच असा रा. कोल्हटकरांचा समज दिसतो. वेत्रिका ह्मणते टला ट जुळविला कीं कवितेची माती होते. वेत्रिकेचा तरी उपदेश रा. कोल्हटकरांनीं ऐकावयाचा होता. व कांहीं ठिकाणीं पदांची जी सर मेसळ केली आहे ती टाळावयाची होती. शरश्चंद्र ह्मणतोः— "अशा लुसलुशीत हातावर हात मारावयाला मिळेल तर मोठमोठे ऋषी सुद्धां पातक करावला तयार होतील. या वरून सौंदर्य आणि पतिप्रेम हीं एके जागीं क्वचितच राहतात असें समजण्याचें काय? पहिल्या अंकांतील तिसऱ्या प्रवेशातील प्रतोदाच्या भाषणांत असें दर्शविलें आहे कीं, "हाडामांसाचें खरेखुरे पिंडधारण करणारे मनुष्य प्राणी सुद्धां तेव्हां प्रमाणें आपल्या दुष्ट चाली रीतीस रुतून गेलेले आहेत. तेव्हांचा काळ तो कोणता हें जरी समजत नाहीं, तरी प्रतोदानें पहिल्यानें जेव्हां तें नगर पाहिलें, त्या वेळेंपासून मध्यंतरी जें अंतर गेलें त्या काळाचाच बोध होतो. सुमारें १० वर्षांच्या अवधींत काय काय सुधारणा व्हावयास पाहिजे होत्या? तात्पर्य, एकही पूर्णपणें लक्षांत आणण्या सारखा भाग दिसत नाहीं ही मोठी चमत्कारिक गोष्ट आहे. एकंदर पद्यरचना वीरतनया प्रमाणेंच दुर्बोध असून ह्मणण्यास बरीच कठीण आहे. शिवाय पार्शी चालींचा सुळसुळाट असल्यामुळें साधारण ह्मणण्या सारख्या इसमास ती बरीच कठीण आहे. यांपक्षां जास्त जे बारीक दोष आहेत ते न काढणें बरें समजून पुरें करितों. रा. कोल्हटकर विद्वान् असून बरेच मार्मिक लेखक आहेत. त्यांचीं नाटकें अधिक सुगम, उपयुक्त व प्रिय व्हावीं या हेतूनें हें पत्र लिहिलें आहे. त्यांना निरुत्साह करण्याचा मुळींच उद्देश नाहीं. मणीमंजुल हल्लीं ते रचीत आहेत असें समजतें तर त्यात या दोन्ही पक्षां जास्त सुधारणा व्हावी हीच इच्छा आहे. "मूक नायकाची ढाल" जरी यावर चमकली तरी त्याची भिति बाळगण्याचें मला मुळींच कारण नाहीं रा. कोल्हटकर असेच जास्ती प्रयत्न करून मराठी भाषेची सेवा करीत होच विनंती आहे. कळावें लोभ असावा हे विनंती.

आपला

संगीत नाटकाची आवड असणार

## रामायण

[ अंक ११ वरून पुढें ]

वनवासांत पाठविलेल्या दुसऱ्या एका इक्ष्वाकु वंशांतील राजपुत्राचें उदाहरण रामायणांत दिलें आहे. तो रस्त्यांतील बालकें उचलून सरयूंत बुडवी आणि खदखदां हासे. या जुलूमाला त्रासून लोकांनीं राजाकडे गाऱ्हाणें नेलें, आणि ह्मटलें "राजा असंमजाला घे, नाहीं तर आह्माला घे." तेव्हां राजा सगरानें त्याला वनास धाडिलें. (१-३८-२०-२२-२-३६-२०-२४) येथेंही लोकांना अधिकार काय तो गाऱ्हाणें नेण्या पुरताच होता. राजा दयाळु असेल तर लोकांचें ह्मणणें मनावर घेई खरोखर इह लोकींचा त्याला आळा नव्हता. परलोकींचा धर्म धर्मशास्त्रांत घातला होता. त्यांत जीं जीं पातकें लोक करितील त्यांच्या एक षष्ठांशाचा धनी तो होतो हा एक होता. तसेंच राज्यांत कांहीं अनर्थ झाले तर ते राजाच्याच दोषानें होतात, असा सर्व साधारण समज असे, व तो पापभीरु राजांना प्रतिबंधक असे. (७,७३,१६)

राजाच्या पाठीमागून त्याचा वडील पुत्र गादीवर बसतो, हा सामान्य नियम होता व इक्ष्वाकु वंशात ठरल्या सारखा होता, (२,७३,२२,९,८१,१०,३६) केव्हां केव्हां मृतराजाचा मुलगा लहान असेल व त्याला राज्य आकळतां येणार नाहीं अशी भीति असेल तर मृत राजाचा धाकटा भाऊ गादीवर बसत असे. रामाला वनवासास पाठविण्याचा निश्चय झाला व कैकेयी सीतेला चीवरें देऊं लागली, तेव्हां तिचा निषेध करून वशिष्ठ ह्मणतो "राजाला फसवून तूं वर घेतलें. पण तूं तरी आपल्या बोला प्रमाणें कोठें रहातेस? सीतेला वनास जाण्याचें कांहीं कारण नाहीं, रामाचे यौवराज्य प्रकृत असून सीता घेईल. सपत्निकाची पत्नी ही त्याचा आत्मा होय. सीता रामाचा आत्मा ह्मणून ही मेदिनी पाळील" हें ह्मणणें लक्ष्यांत ठेवण्या जोगें आहे.

राजाला सल्ला मसलत देण्याला सचिव असत. त्यांच्या अंगीं स्पष्ट बोलणें हा गुण समजत. दरबारांत प्रकरणाचा उहापोह होत असे. एकाच्या ह्मणण्यावर दुसरा उत्तर देत असे. व शेवटीं राजा सर्वांच्या विचारावर साधक बाधक कारणें सांगून आपलें मत देत असे. रामाला सर्वांचें मन न दुखवितां आपला पक्ष स्थापित करण्याची हातोटी चांगली साधली होती.

देशाचें संरक्षण करण्या करितां सैन्य असें. याचीं चार अंगें असत. पायदळ, घोडेस्वार, रथी, व गजारूढ. प्रत्येक पथकांत इतके पायदळ, इतके घोडेस्वार इतके रथी व इतके गजारूढ अशी मर्यादा होती. व पथकांच्या संख्ये वरून सैन्याला सेना, अनीक, अक्षौहिणी, वगैरे नांवें देत. कवीनें संख्या दिली आहे तितकी रणांत येत असेल कीं नाहीं या बदल संशय आहे. सेनानायक प्रायः राजा असे. राजाभावीं त्याचा बंधु, सुत अगर इतर आप्त असे. क्वचित् इतरही विश्वासूक मनुष्य असे. लढाईचीं शस्त्रें ह्मटलीं ह्मणजे नाना प्रकारचे बाण, मुद्गर, चक्र, तोमर, गदा, असि, मुसळ, शूळ परिघ, पट्टिश, पाश भुशुंडी वगैरे असत. या नांवावरून या शस्त्रांची रचना वगैरे कळत नाहीं. परंतु बहुतेक लोखंडाचीं असत व हातांनीं वापरण्याचीं किंवा फेकण्याचीं असत. दारूचा शोध झाला नव्हता तेव्हां सर्व भार सैनिकांच्या बाहुबळावरच असे. एके ठिकाणीं कुलपी गोळ्या सारख्या कूट शस्त्राचें वर्णन केलें आहे. रथ्यांना रथांत बसवून युद्ध करण्याला सवड चांगली असे. व रथांचीं वर्णनेंही चमत्कारिक आहेत. प्रत्येक रथांत शस्त्रास्त्रें ठेवण्याची जागा असें. रथ्यांवर हल्ला करावयाचा ह्मणजे पहिल्यानें रथाचा ध्वज पाडून टाकावयाचा. याचा हेतु असा दिसतो कीं, ध्वज मोडला किंवा पडला ह्मणजे सर्व सैन्य गर्भगळीत होऊन पळून जाई. अशी पळपळाट झाल्याचीं पुष्कळ उदाहरणें रामायणांत आहेत. ध्वज पडल्या-

[illegible]

Judge
Amraoti District.

...नानसार

प्रयोग झालला आढळतो. अशा संबंधानें खरी माहिती कांहीं मिळत नाहीं.

कपिसेनेचीं आयुधें वर दिलेल्या शिवाय वृक्ष, पाषाण, नख, दंत वगैरे सांगितलीं आहेत. रामायणांतील युद्धांचीं वर्णनें सरासरी सारखीं व कंटाळवाणीं झालीं आहत. इंद्रजिताला अग्नि प्रसन्न होऊन दिव्य रथ देत असे. म्हणून तो बसला म्हणजे शत्रूला अदृश्य व अवध्य होत असे व तो कपट मायेचा प्रयोग करी असें ह्मटलें आहे. प्रच्छन्न राहून शत्रूला हल्ला करीत असेल. इतकीच गोष्ट या कथेला कदाचित् पाया असेल. रात्र झाली म्हणजे राक्षसांचा ( निशाचरांचा ) प्रभाव द्विगुणित होतो असें ह्मटलें आहे. त्याचा तरी तात्पर्यार्थ हाच दिसतो.

सेना चालली असतां तिच्या करितां व्यवस्था करण्याचा प्रघात होता. रस्ते विषम असतील तर सम करीत असत, छाये करितां वृक्ष लावीत. अरण्यांतून रस्ता चांगला नसेल तर वृक्ष कापीत, खडक फोडीत, पाण्याचे मोर करीत, कोठें विहिरी करीत, कोठें तलाव करीत व कोचेद काठेवेही बघीत, शिबिरांतील रस्ते नगरांतल्या प्रमाणें मोठे ठेवीत व त्यांवर सडा संमार्जन होत असे. प्रसंगीं पुष्पेंही टाकीत. तळ चांगल्या ठिकाणीं देत. कूच केल्यावर पूर्वीचा तळ जाळण्याचा परिपाठ असे. याचें कारण कदाचित् असें असेल कीं शत्रूला आपल्या तळाचा फायदा मिळूं नये. व आपला मार्ग कळूं नये. त्याकाळीं झाडी कीर्र असल्या कारणानें हा हेतु साध्य होत असेल.

सैन्य मार्गांत असतां पुढें एक टोळी जात असे; तिचें काम हें कीं, शत्रूनें वाट रोधिली आहे कीं काय, आणि पिण्याचें पाणी दूषित केलें आहे कीं काय, हें पहाणें. सैन्याची आघाडी, पिछाडी, व उजव्या व डाव्या बाजू यांचा बचाव करण्या करितां एक एक टोळी नेमली असे, व सैन्यसंघ मधून चालत असे. सैन्य बहुत करून उत्तर रात्रीं चालत असे, आणि सूर्योदयानंतर तळावर येत असे. ग्रामांना व नगरांना आपल्या सैन्यापासून उपद्रव होऊं नये म्हणून, रामानें गांव सोडून सैन्य च्या कूचाचे मार्ग काढावे. युद्ध पावसाळ्यांत चार महिने बंद असे.

युद्धांत पडलल्या व घायाळ झालेल्या वीरांची व्यवस्था एका सेनाध्यक्षाकडे असे. रामसेनेंत 'सुषेण' हा वैद्य होता. त्याकडे हें काम दिलें होतें. मशाली लावून घायाळांचा शोध होत असे. मृतसंजीवनी, [ मृतास उठविणारी ) विशल्य करणी [illegible] करणी [illegible] री ). [illegible] ळवि [illegible] औषधी [illegible] आणि [illegible] रांच्या [illegible] अशी [illegible] असें [illegible] बहुतक [illegible] तलेंच [illegible] करून- [illegible] फिरून लढाईला उभे राहण्याला लावीत. जय मिळाला तर शिस्तेकडे फारसें लक्ष नसे. हनुमदंगद प्रभृति वीरांनीं सीतेचा शोध लावला, या हर्षभरांत कपिसैन्या कडून सुग्रीवाच्या 'मधुवन' नांवाच्या बागेचा विध्वंस केला, व तोही सीतेचें वर्तमान कळविण्यापूर्वी बागेचा रक्षक 'दधिमुख' सुग्रीवा पाशी गार्‍हाणें घेऊन गेला तेव्हां सुग्रीवाची खातरी झाली कीं कार्य संपादिल्यावाचून त्यांनीं हा असा व्यतिक्रम केला नसेल, व तो दधिमुखास म्हणाला "काम करून आल्यावर सर्व मधुवन खाऊन टाकलें यांत मला आनंदच आहे. काम करून आलेल्याचा अविनय ( धर्षण ) पोटांत घातला पाहिजे [ धर्षणीय ] ( ९,६४ ) आपणा मधील हल्लींची शिस्ती संबंधी वाणी जुनी पुराणी आहे.

( पुढें चालेल. )

---

वऱ्हाडसमाचार

---

मिती चैत्र शुद्ध १३ शके १८२३

---

गेल्या गुरुवारीं मुंबईच्या ग्रांट मेडिकल कालेजामध्यें बक्षीसें वाटण्याचा समारंभ झाला तेव्हां अध्यक्षस्थानीं बडोद्याचे श्रीमंत महाराज सयाजीराव विराजमान होते, श्रीमंतांनीं या कालेजाला २६ हजार रुपयांची देणगी देऊन पूर्वींच ऋणी केलें आहे आणि अशा उदारचरित श्रीमंताची योजना अध्यक्षस्थानीं झाली ही गोष्ट फार यथायोग्य झाली. सरस्वती आणि लक्ष्मी एकत्र क्वचितच राहतात पण आमचे श्रीमंत सयाजीराव याच्यापाशी दोघांचाही वास आहे. श्रीमंतांनीं या सुसमयाला विद्यार्थ्यांस जें बोधामृत पाजलें तें श्रेष्ठ ग्रंथकारही मोठ्या प्रेमानें प्राशन करील. या भाषणांत शिक्षणाची मीमांसा फार उत्कृष्ठ झाली असून श्रीमंतांनीं आपल्या विशाल ज्ञानदृष्टीचा क्षितिज दिग्दर्शित केला हें पाहून मोठा आनंद वाटतो. सर्वसाधारण चांगल्या हितबोधाच्या गोष्टी इतक्या पुष्कळ एकत्र ग्रथित केल्या आहेत कीं त्या सुंदर सुभाषिताच्या अंजलीनेंही वाचनाची पिपासा मंदावते आणि कंटाळा येतो. श्रीमंत शास्त्रांतरीं इतके निष्णात दिसतात कीं त्यांची माहिती पाहून फार आचंबा वाटतो. श्रीमंताचें संभाषणही अती लांबलें आहे पण त्यांतील उपयुक्त सूचनांनीं त्याला चांगलें महत्व आलें आहे. देशी वैद्यकासंबंधाचे विचार सर्वांनीं ग्रहण करण्या सारखे आहेत. इंग्रजी डाक्टर म्हणजे औषधांच्या यादी लिहिणारे असतात. औषधें तयार करण्याची क्रिया त्यांस अवगत नसते. विलायतेहून जीं औषधें येतात त्यांचा बटवाडा ही डाक्टर मंडळी करितात. देशी वैद्यकाचा अगदीं ऱ्हास झाला आहे. आमचे वैद्य औषधें तयार करितात व तीं आपल्या दवाखान्यांतील रोग्यांस देतात. औषधें तयार करण्याची क्रिया व तीं देण्याची क्रिया अशा दोन्ही क्रिया आमचे वैद्य करितात. देशी वैद्यक ऱ्हासास पोंचल्या सारखें आहे. इतकी चांगली सुविद्या अभ्यासाच्या अभावानें मलीन व नष्ट होत आहे ही मोठी खेदाची गोष्ट होय. पूर्वजांचा अनुभव व त्यांची वैद्यक विद्या नष्टप्राय होत आहे ही गोष्ट अक्षरशः खरी आहे. अलिकडचे अश्विनीकुमार व धन्वन्तरी वैद्यमाचे शत्रु आहेत आणि ते आपल्या मूर्खपणानें माणसें मारतात असा आमचा अनुभव आहे. श्रीमंता सारखे सुविद्य व उदार गृहस्थ या गोष्टीकडे लक्ष पुरवितील आणि देशी वैद्यकाची पाठशाळा काढतील तर ते खरोखर मोठी धन्यता पावतील आणि सर्व राष्ट्र त्यांचें ऋणी होईल. राजाश्रय नाहीं ह्मणून देशी वैद्यक बुडालें आहे. ग्रांट मेडिकल कॉलेजांत नेटीव वैद्यक शिकविण्याचा वर्ग कां निघू नये हें आह्मांस समजत नाहीं. या बाबतींत श्रीमंत गायकवाड आणि त्यांच्याच सारखे इतर संस्थानिक इंडिया सरकारची मदत मागून देशी वैद्यकाचें पुनरुज्जीवन करितील अशी आह्मास आशा आहे.

---

## सरकारचे मनोरथ

गेल्या गुरुवारीं व्हाइसराय साहेब आपल्या कायदेकौंसिलाच्या सभेंत १९०१-१९०२ च्या बजेट संबंधानें बोलले आणि त्या बोलण्याच्या ओघांत त्यांनीं सरकारचे भावी विचार विदित केले आणि प्रस्तुत हातीं घेतलेल्या कार्यमालेंतील विकसित पुष्पांचा स्वाद आपल्या कौंसिलदारांस दिला. लार्ड कर्झन सारखे व्हाईसराय क्वचित् येतात. हे उत्तम मुत्सदी व धुरंधर आहेत. त्यांची विद्वत्ता त्यांच्या संभाषणांत चांगली कळते. हे मोठे वक्ते असल्यामुळें त्यांच्या भाषणांत विशेष गोडी असते. त्यांच्या भाषणाचा गोषवारा आह्मी आपल्या मराठी वाचकांच्या माहितीसाठीं आज देणार आहों.

प्रथमतः त्यांनीं कायदे कौंसिलांत पसार झालेल्या कायद्याविषयीं आनंद प्रदर्शित केला आणि कौंसिलाच्या कामगिरीची गोळाबेरीज पुष्कळ मोठी आहे व आसामांतील मजुरा विषयींचा कायदा व तसेंच खाणीचा कायदा हे दोन्ही लोकांस मोठे हितप्रद होतील अशी मनीषा प्रगुट केली. यंदाच्या बजेटावरून भावी सुखसमृद्धी मोठी समाधानकारक दिसते आणि मागील वर्षांप्रमाणें दुष्ट प्रसंग येणार नाहींत तर नामदार फडणीसाचें भाकित खरें ठरून पुढील वर्षाच्या हिशोबाच्या अंतीं चांगली शिल्लक राहील.

**लष्करी खर्च**—या खर्चा संबंधानें मोठी ओरड ऐकूं येते पण ती चुकीची आहे. हा खर्च वाढला आहे आणि असाच वाढेल परंतु हा खर्च केलाच पाहिजे. इंडियाच्या सरहद्दीच्या संरक्षणासाठीं व ब्रिटिश राज्याच्या सुरक्षितपणासाठीं लष्करी खातें अगदीं उत्कृष्ठ ठेविलें पाहिजे. उधळपट्टी किंवा गैरवाजवी खर्च होऊं नये ह्मणून मोठी दक्षता घेण्यांत येते. हा लष्करी खर्च व्यर्थ आहे असें किसेकजण मुखानें बोलोत, परंतु वेळ येऊन बेतली ह्मणजे या लष्कराच्या हातून सर्वांचा बचाव होणार आहे. लष्कराला नवीन हत्यारें दिलीं पाहिजेत, तोफखाना वाढविला पाहिजे, व नव्या नव्या सुधारलेल्या तोफा आणविल्या पाहिजेत किनाऱ्यावरील लष्कर तयार ठेविलें पाहिजे, लहान लहान रेल्वे करून इंडियाच्या सरहद्दीवरील ठिकाणें सुरक्षित केलीं पाहिजेत; या व अशा इतर सुधारणा केल्या वाचून गत्यंतर नाहीं. नवा अनुभव व नव्या गरजा निरनिराळ्या खर्चाच्या बाबी उत्पन्न करितात पण या गोष्टी लांबणीवर टाकता कामा नये किंवा अजिबात वगळता येणार नाहींत.

सरकार कांहीं स्वस्थ बसलें नाहींत. त्यांच्या पुढें अनेक प्रकारच्या गोष्टी येत असतात आणि सरकारांनीं आरंभीं ज्या गोष्टी हातांत घेतल्या आहेत त्यांचा परिचय प्रजाजनांत करून द्यावा ह्मणजे रयतेचें मोठें पाठबळ मिळेल असा सरकाला पूर्ण भरंवसा आहे.

पहिली गोष्ट ह्मणजे सरहद्दी विषयीं राजकीय धोरण होय. एकच धोरण निश्चित नसल्या मुळें चुका घडल्या आहेत आणि ह्या चुकांच्या परिणामीं लढाई होऊन मनुष्यहानी मोठी झाली आहे. उत्तरेकडील सरहद्द वाढविण्याचा प्रयत्न आह्मीं टाकला होता, त्यांवर पसरत चाललेलीं ठाणीं इंडियाच्या सरहद्दीवर एकत्रपणें कायम करावीं आणि चित्रळ पासून गोमालदरी पर्यंत सरहद्दीवरील परकी लोकांचा एकोपा करून त्यांच्या मधूनच कवाईत शिकविलेले लोक तयार करावयाचे असा राजकीय क्रम चालूं आहे. या क्रमांत अनेक फेरफार वेळोवेळ झाले परंतु हाच क्रम चिरकाल चालूं ठेवण्याचा पक्का विचार आहे. लार्ड लिटन पासून वाटत आलेला सरहद्दीचा कारभार एका निराळ्या प्रांताच्या कारभारा प्रमाणें चालविण्याचा सरकारचा विचार मुक्रर झाला आहे, आणि हा कारभाराचा प्रश्न ह्मणजे दुसरी मोठी बाब होय.

तिसरा प्रश्न मोठमोठ्या प्रांतिक अधिकाऱ्यांस रजा देण्या संबंधानें आहे. वारंवार रजा देणें आणि वरचेवर बदल्या करणें या दोन्ही गोष्टी बंद करण्यासाठीं नवे नियम करून दिले आहेत.

चवथी सुधारणा लेखी कामा संबंधानें होय. अलिकडे रिपोर्ट लिहिण्यांत आणि निरनिराळे तक्ते भरण्यांत वृथा काळ जातो आणि हा प्रकार पुष्कळ वर्षांपासून चालत आला आहे तरी तो बंद करून पुष्कळसा खर्च वाचविण्याची सरकारी खटपट जारीनें चालूं आहे.

पांचवी गोष्ट ही कीं सोन्याचें नाणें इंडियांत चालू केलें. आणि १६ पेन्साचा १ रुपया ह्मणजे १५ रुपयांला १ पौंड नाणें असें कोष्टक बसविण्यांत आलें आहे. सोन्याच्या नाण्यामुळें चलनी नाण्याच्या किंमतीसंबंधानें एक प्रकारची स्थिरता आली आणि विलायतचें मांडवल इंडियांतील व्यापारांत पुष्कळपटीनें अधीक

येऊं लागलें आहे.

सहावी सुधारणा रेलवेच्या विस्तारा वि-षयीं होय, दुष्काळाच्या वर्षांत रेलवेकडे ८। कोट रुपये खर्च झाले. त्याच्या आदले-वर्षी ९ कोट रुपये रेलवे करण्याकडे लागले आणि पुढील वर्षी १०। कोट रुपये नवीन रेलवे सुरूं करण्यांत खर्च होतील. तीन वर्षा पूर्वी २२५०० मैल लांब रेलवे सुरूं होती ती हलीं २५१५५ मैल वाढली आहे. ही लांबी पुष्कळ झाली आणि झपाट्यानें रेल-वेचा प्रसार होतच आहे.

रेलवमुळे धान्याचे व इतर पदार्थांचे भाव थोड्याशा फरकानें सर्वत्र सारखे होतात. जो प्रांत किंवा भाग रेलवेच्या अभावामुळें दूर होता तो रेलवेनें जवळ झाला आणि त्या भागाच्या मालाला सर्वत्र बाजार खुले झाले. पूर्वी प्रमाणें पेवांत धान्य सांठवून ठेवावें लागत नाहीं आणि दुष्काळाची भिती दूर हो-ऊन सर्वत्र धान्याची विपूलता झाली व किंमता नेंही सारखेपणा येत चालला आहे. रेलवेमुळें दूरदूरच्या भागांचा एक जीव बनत चालला आहे आणि रेलवेचा विस्तार जितका पुष्कळ होईल तितकें चांगलें असा व्हाइसराय साहे-बांचा पक्का अभिप्राय आहे.

सातवी गोष्ट ह्मणजे कालवे बांधण्या विषयीं, पाटस्थळाची योजना वाढविण्या-विषयीं आणि पाण्याचे खजिने नवे नवे स्थळोस्थळीं करण्याविषयीं चालूं असलेल्या-व्यवस्था होत. या संबंधानें निराळा ठराव करून खर्चाचा अंदाज व तत्संबंधीं बांध कामें बांधण्या विषयींचे नमुने तयार करण्या-साठीं हुकूम देण्यात आले आहेत.

आठवी सुधारणा शेतकरी लोकांच्या स्थिती विषयीं आहे. शेतकरी कर्जबाज हो-ऊन आपली शेती गमावीत आहे. ही गोष्ट पंजाबांत जशी दिसून आली तशीच व ति-तक्याच मानानें इतर प्रांतांतही दिसून येते. पंजाबचा पुरता कायदा केला आहे आणि तोच इतरत्र लागूं करण्याचा विचार चालूं आहे.

यूरोप व इंडिया या दोन राष्ट्रामधील तारायंत्राचे दर कमी करण्याविषयींची सुधा रणा नववी होय.

जुने लेख व जुन्या गोष्टी राखून ठेवण्या विषयीं व्हाइसराय साहेबांची खटपट मोठी आहे. या संबंधानें एक कायदा करून चांगली तजवीज करण्यांत येणार आहे.

सोल्जरांच्या दुर्वर्तनाला आळा घालण्या साठीं सरकारचा प्रयत्न चालूं आहे. सिव्हि-ल अंमलदार व लष्करी अंमलदार यांच्या विचारानेंच कडक नियम केले आहेत. शिकारीचे अनर्थ वारंवार घडतात आणि ते बंद करण्याविषयीं सर्व प्रयत्न चालूं आहेत ही दहावी गोष्ट होय.

विद्यादाना संबंधी सुधारणा अकरावी गोष्ट आहे. युनिव्हरसिटी शिक्षण, उच्च प्रतीचें शिक्षण, मध्यम प्रतीचें शिक्षण, प्राथमिक शिक्षण व औद्योगिक शिक्षण हीं सर्व बाजूंनीं जोरदारपणें प्रचलित करावयाचीं आहेत खानगी शिक्षणक्रमावर सरकारी अंमल पूर्णपणें बसविण्याचा विचार पक्का दिसतो आणि ती गोष्ट मोठ्या बेताबातानें पडली पाहिजे.

पोलीस खात्यांतील मोठमोठ्या हुद्यांच्या जागेवर चांगले लोक नेमण्या विषयीं मोठी काळजी घेण्यांत येईल. प्रसंगानुसार त्या जागांचे पगारही वाढविण्यांत येतील. ही १२ बारावी सुधारणा होय.

या गोष्टी सांगितल्या नंतर व्हाइसराय साहेब उपसंहाराच्या भागाला लागले. शेतकरी, शेतकऱ्यांची पेढी, सांप्याची वाढ, देशी हस्तकौशल्यास उत्तेजन इत्यादि गोष्टींचा नामशः उल्लेख करून राष्ट्राच्या सांपत्तिक स्थिती कडे वळले. त्यांच्या मतानें लोक सुखसंपन्न होत आहेत आणि त्यांची स्थिती सुधारत आहे. हें सिद्ध करितांना त्यांनीं अनेक आंकडे प्रमाणा दाखल घतले आहेत.

---

# The Berar Samachar

MONDAY APRIL 1 1901

The discussion on the National Budget for 1901—02 is very instructive. It was an occasion for Lord Curzon to explain the long programme of administrative reforms which the Government of India have in view. Lord Curzon is an excellent Viceroy and the people of India are obliged to His Excellency for the honor he has done them in taking them in confidence in connection with his further work of progress. It is well and good that the support of the public opinion is so much sought in official circles. It is, no doubt, the backbone of all positive reforms and we hope that the Government will be very successful in the large works of reforms that they have propounded for immediate consideration. The speech of Lord Curzon is excellent in tone, eloquent in expression and instructive in its numerous suggestions. We hope that these proposals will soon come to fruition. The most important item refers to the Educational Reform. There will be solid efforts to place education in its various branches on a scientific footing and we have great hopes that the measure of success that will crown this educational reform will be the measure for the material prosperity of India.

Lord Curzon appears to be highly optimistic when he attempts to refute the statement whether India is on the verge of economic ruin. There are two theories about the condition of India The poverty of India is a trite thing with the Natives of India, whereas the hopeful and cheerful out—look of India's prosperity is the common clamour of the Anglo Indian Officials. And Lord Curzon is no exception to this general rule. In his peroration on the Budjet, there. play with statistical figures and inspite of the conjectural element in his data he declares with the imprimatur of his position, dignity and the high repute of a statesman, that the economic situation oi India is drawing near to a bright dawn of prosperity Barring all elements of possible disasters that are beyond human control, the signs of the time are very hopeful of a bright future. The recuperative power of the people is wonderful and it this theory be true there is no wonder that after the appalling famine of the last year the people are fast improving in their material condition.

We have however no such hopes. Fancy is no longer our guide and we have to deal with stern facts. The agricultural income added to the non agricultural income comes to Rs. 30 per head. This sum is no grand figure and Lord Curzon will compare the European averages with the average income of an Indian. The comparison will speak for itself. The figure for India will be too low in the scale. With a good season the chances of improvement become indeed re-assuring but there is no sign of a permanent change in the material condition of the people. Statistics are often deceptive. They may be quoted to prove two contrary things and there are many multiferious circumstances which upset any calculation or any inference. But we know the fact of poverty as a matter of certainty and we want no Euclid to demonstrate the existence of that fact with the accuracy and correctness of his theoretic propositions. With due deference to Lord Curzon's optimism we cannot drive away the growing poverty that comes in our way at every point. We are glad that the Government are sanguine about their hopeful forecast but at the same time it behoves a good Government to recognize the fact of poverty and to err on the safe side by a cautious provision against the growth of poverty. Lord Curzon summarizes his argument in the eloquent manner which we quote below for an easy reference:—

"There comes a time—it must come in India—when the average agricultural income per head ceases to expand for two reasons—first, that the population goes on increasing, and, secondly, that the area of fresh ground available for cultivation does not increase *pari passu*, but is taken up and thereby exhausted. When this point is reached, it is no good to attack Government for its inability to fight the laws of Nature. What a prudent Government endeavours to do is to increase its non—agricultural sources of income. It is for this reason that I welcome, as I have said today, the investment of capital and the employment of labour upon railways, canals, in factories, workshops, mills, coal—mines, metalliferous mines, and on tea, sugar, and indigo plantations. All these are fresh outlets for industry. They diminish *pro tanto* the strain upon the agricultural population and they are bringing money into the country and circulating it to and fro. This is evident from the immense increase in railway traffic, both goods and passenger, in postal, telegraph, and money order business, in imports from aboard, and in the extraordinary amount of precious metal that is absorbed by the people. These are not symptoms of decaying or impoverished populations."

There is a great deal of truth in this observation and we hope that all future efforts will be preguant with the expansion of an active industrial life for India.

---

## वऱ्हाड

हवामान— पाऊस पडतो, अभ्रें येतात आणि हवा मोठी रोगट होते. गर्भावळीचे मेघ मध्यंतरीं जलवृष्टी करितात हें ठीक नाहीं तथापि काल पासून हवमान उष्ण-कालाला अनुकूल असें होत आहे.

मे. रुस्तुमजी साहेब हे आज कुमार श्री हरबानजी यांस डिपूटी कमिशनरीचा चार्ज देणार आहेत.

हास्पिटल असिस्टंट तयार करण्याची शाळा हैदराबादेस आहे. या शाळेंत पांच पगारी विद्यार्थी पाहिजे आहेत. या शाळेस जाऊं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची दर वर्षी उमरावतीस एक परीक्षा होत असते. ही परीक्षा येत्या एप्रिलच्या १९ वे तारखेला होणार आहे.

---

नमुना नंबर १४३

सन १८८१ चा आक्ट नंबर ५ कलम ६९ प्रमाणें.

क्लास १९

दिवाणी किरकोळ मु० नंबर $\frac{१}{१९०१}$

विद्यमान डेपुटी कमिशनर साहेब जिल्हा उमरावती यांचे कोर्टात.

नांवः— १ पद्मनाभ रावजी दंडे राहणार उमरावती.

२ जयराम लक्ष्मण पाटील राहणार अचलपूर.

३ नागोराव चिमणाजी कुणबी राहणार राम, तालुके उमरावती.

यांस.

कळविण्यांत येतें कीं मयत गणेश यादव राहणार नारायणपूर तालुका उमरावती याचे इस्टेटीचे प्रोबेट मिळावे ह्मणून सदर्हू अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याज करितां सदर्हू मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यांस जाहिरातीचें द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यांनीं तारीख १९ माहे एप्रील सन १९०१ इसवी रोजीं सदर्हू अर्जाची चौकशी होईल त्यावेळीं या कोर्टात हजर होऊन आपापले हक्काविषयीं लेखी हकिकत दाखल करावी.

उमरावती डिपुटि कमिशनरचे आफिस तारीख २९ माहे मार्च सन १९०१ इ०

D. O. MORRIS
Deputy Commissoner
&
District Judge
Amraoti District.

---

## वर्तमानसार

मनुष्यमांसविक्रय—चिनांत पडलेल्या ना बरदस्त दुष्काळामुळें तेथील बाजारांत आतां मनुष्यांचे मांसाची विक्री होत आहे. हाय! हाय!

अहमदनगर येथें एका मुलीचें लग्न झालें व दुसऱ्या दिवशींच नवरा मेला. दुर्दैव!

बोअर कमांडर हार्टजाग हे आपल्या फौजेनिशीं कालव्हिनिया येथें असतां महाराणी व्हिक्टोरियाच्या मृत्यूची बातमी तेथें पोहोंचली तेव्हां बोअर लोकांनीं महाराणीचे फोटो पायाखालीं तुडविले. यांना काय शिक्षा होईल?

गुजराथेंत लोक गवत खाऊं लागले आहेत. दुर्दैव बिचाऱ्यांचें!

शिवनी, माळव, येथें मि. स्वान या नांवाच्या मिशनऱ्यानें शिकार करीत असतां एका नेटिवास गोळी मारली आस्वल आहे असें वाटलें कीं काय?

पेटलेली विडी तोंडांत धरून निजण्यानें रंगुनास मोठी आग लागली व १८००० रुपयांचें नुकसान झालें. विडी ओढणारांनो! ध्यानांत धरा.

कांहीं दिवसांपूर्वी श्रीमत्परमहंस पूर्णानंदस्वामी यांस लवाजम्यासह जातांना पाहून एका आर्चबिशपर्चो आग झाली व यानें स्वामीस लवाजम्यासह न जाऊं देण्याविषयीं मामलेदारास लिहिलें. मामलेदारानें त्याचें न ऐकल्यामुळें यानें गव्हरनर साहेबांस हें कळवून आपल्यासारखा निकाल करून घेतला. बिचारे हिंदू!

## लढाई

ज. बोथा व लार्ड किचनर या दोघांची मुलाखत होऊन तहाचा जम बसणार होता. पण तें सर्व विसकटलें. किचनर साहेबांच्या अटी बोअर लोकांस नापसंत आहेत. बोअर लोकांनीं इतके दिवस रणदेवतेच्या पायीं आपल्या स्वातंत्र्यासाठीं, पैशाची व रक्ताची आहुती दिली पण त्यांस अद्याप यश आलें नाहीं. इंग्रज फौजेच्या खवळलेल्या अफाट दर्यांत त्या मूठभर लोकांची तीरण्याची कितपत शक्ति असणार! परंतु त्यांचा ईश्वरावर पूर्ण विश्वास. स्वदेशावर खरी प्रीति. ईश्वर आपला पाठीराखा आहे व तो आपणास कधीं अंतर देणार नाहीं अशी त्यांची पूर्ण समजूत म्हणूनच त्यांचें धैर्य व हिंमत हीं अद्याप रती इतकी सुद्धा खचली नाहींत. ज्या स्वातंत्र्यप्रीतीसाठीं जोबर्ट क्रांजी सारख्या महारथ्यांनीं आपलें जीव खर्ची घातले तें स्वातंत्र्य सध्यांचे रणधुरंधरवीर बोथा, व डिवेट हे आपण होऊन शत्रूस शरण जाऊन गमावून टाकतील ही गोष्ट संभवत नाहीं. मृत्यु किंवा स्वातंत्र्य ह्या शिवाय त्यास तिसरी गोष्टच समजत नाहीं. शिवाय इंग्रज सरकारही आपल्या साम्राज्याचें नांव राखण्यासाठीं ह्या बंडखोर बोअर लोकांस चित व पादाक्रांत केल्या खेरीज स्वस्थ बसणार नाहीं. मग तह होऊन शांततेचा शिरकाव कसा होणार कोणजाणे, ईश्वर करो व दोघांसही सुबुद्धि देवो!

हुकमी पाऊस—दोन इटालियन गृहस्थांनीं कृतीनें पाऊस पाडण्याचा नवीनच शोध लावला आहे. एका तोफेची रुळा सारखी लंब वर्तुल एक नळी असते तिला दारु मुळींच लागत नाहीं. ॲक्सीटिलनग्यास व हवा यांचें मिश्रण हेंच त्या तोफेची दारू. तिचें तोंड ढगाकडे करून ठेवावें व विजेच्या दिव्यानें तिला पेटवावी म्हणजे तिचें गोळे आपलें काम बेमालूम करितात. ही तोफ कधीं बिघडत नाहीं अथवा मोडत नाहीं. इतकेंच नव्हे, तर ती विशेष प्रयत्न केल्यावाचून एक हजार वेळ पटापट उडविता येते आणि तीही हात लाविल्यावाचून. हिच्या बारानें पावसाच्या गारा वितळून यांची उत्कृष्ट सर होते वीज गडगडत नाहीं. ती कोठें पडत नाहीं व वादळही कोठें होत नाहीं. ढगावर तिचा मारा बसला कीं, पाऊस खालीं पडलाच म्हणून समजावें. असें आहे तर ह्या तोफेचा प्रयोग हिंदुस्थान सरकारानें करून हुकमी पाऊस कां पाडूं नये! क० त०

लार्ड कर्झन साहेबांनीं नुकताच एक ठराव प्रसिद्ध केला आहे कीं हिंदुस्थानांत तळीं, कालवे वगैरे कोठें कोठें करितां येतील याबद्दल चौकशी करून येत्या अक्टोबरचे आंत सरकारांत रिपोर्ट करावा व त्यांस खर्च काय लागेल ह्याचाही अंदाज करून तो सरकारांत सादर करावा. दुष्काळांत खडी फोडण्याच्या कामापेक्षां वरील उपयुक्त कामास ज्यास्त महत्व देण्याचा सरकारचा विचार आहे व तो स्तुत्य आहे.

प्रे. क्रूगर यांनीं रशियाच्या झारास मध्यस्थी करण्याची विनंती केली होती; पण ती करण्याचें झारानें नाकारिलें,

रशियाचें चीनमधील वर्चस्व युरोपियन राष्ट्रांस पहावत नाहीं म्हणून युरोपियन राष्ट्रें फारच धडपड करूं लागलीं आहेत.

रा. रा. गुरुजी यांना जामीन मिळून ते तुरुंगांतून सुटल्याचें कळविण्यास आम्हांस आनंद वाटतो. मो० वृ०

तुझ्या तोंडांत माती पडो या म्हणी प्रमाणें गेल्या दुष्काळांत रजपुताना प्रांतांत लोकांनीं रानांतील कंदमुळें संपल्यावर पोटाची खळगी भरण्यासाठीं प्रथम झाडाच्या साली खाल्या व त्याही संपल्यावर दगड कुटून तें थोड्याशा अन्नांत मिसळून खाऊं लागले. पिल्या माटा नांवाचा एक दगड असून त्याचें पीठ करून ते भाकरीच्या पिठ त मिसळून पुष्कळ लोकांनीं कित्येक दिवस घालविले.

एलैंडांत दारू गोळा व बंदुका जाईपर्यंतच शांतता राहाण्याचा संभव आहे तेवढा गेला कीं, बंडास उघड सुरुवात होईल असें अमेरिकेंत एका बड्या अधिकाऱ्यानें बोलून दाखविलें. अ०

संजीवनी विद्या—जर्मनींत एका मनुष्यास फाशीची शिक्षा झाली. तेव्हां त्या मनुष्यास फाशी देण्याचे वेळेची संधी एका जर्मन शास्त्रवेत्त्यानें राखून त्या मनुष्याचा फांसानें प्राण जातांच विद्युत्प्रयोग करून पाहण्यासाठीं त्या मनुष्याचें प्रेत आपणास तावडतोब मिळावें म्हणून त्या शास्त्रज्ञानें सरकारास अगोदरच लिहिलें होतें. फांसावर चढविलेला मनुष्य मेला असें डाक्टरानें ठरविल्या नंतर सदहू जर्मन गृहस्थानें त्याचें प्रेत आपल्या यंत्रालयांत नेलें. आणि त्या प्रेताच्या रुधिराशयांत तारांच्या योगानें वीज भरली. तेव्हां सुमारें अर्धा तास लोटतांच तें प्रेत हालचाल करूं लागलें आणि आणखी अर्ध्या तासानें तो मृत मनुष्य जिवंत झाला नंतर कांहीं वेळ पावेतों त्याच्या वाचाशक्तींत व ज्ञानशक्तींत मात्र कांहीं व्यंग दिसलें पण पुढें तेही व्यंग आपाप नाहींसें झालें; आणि तो मनुष्य अगदीं पूर्व स्थितीवर आला. तेव्हां फांशी दिलेल्या त्या मनुष्यास जर्मन सरकार पुन्हां पकडूं लागलें. म्हणून त्या शास्त्रवेत्त्यानें त्यास जर्मनींतून रशियांत पाठवून दिलें. हा त्या शास्त्रज्ञाचा प्रयोग दीर्घ प्रयत्नानें चांगला सुसाध्य होईल तर हा एक ईश्वरी पुरुषच जगांत निर्माण झाला असें म्हटलें पाहिजे.

विजेनें प्राणी जिवंत करूं लागले—गरमी गरमीला मारते याचा प्रयोग चिकागो येथें नुकताच एका विद्वानानें करून दाखविला. ह्या विद्वानानें एक मांजर विजेच्या जोरानें मारून लागलेंच जिवंत केलें. हें पाहून तेथील लोक आश्चर्यानें चकित होऊन राहिले असून मृत मनुष्यसुद्धां विजेनें जिवंत करतां येईल असें आतां ते म्हणूं लागले आहेत.

दैविक चमत्कार—बेळगांव येथील प्रसिद्ध केदारभक्त इरापा दवेरमनी यांस सहा महिन्यामागें देवाज्ञा झाली. तेव्हां यांना तुरक मठी माळावर समाधिस्थ केलें असून त्यांच्या भक्तांनीं व शिष्यांनीं तेथें एक धर्मशाळा वगैरे बांधण्याचें काम चालविलें आहे ह्या समाधीस एकसारखा दगड होता; परंतु अलीकडे थोड्या दिवसापासून ह्या दगडावर श्री गजानन महाराजांची आकृति उमटूं लागली आहे. इतकेंच नव्हे तर दिवसेंदिवस आकृति चांगली खुलत चालली आहे असें म्हणतात ज्ञा० च०

इंग्लंडच्या लष्करचा लहानशा ट्रान्सव्हालच्या लष्करानें अगदीं धुव्वा उडवून दिला इतकेंच नव्हे तर आज वर्ष दीडवर्ष पर्यंत इंग्लंडच्या लाखो शिपायांना ट्रान्सव्हालच्या पांच पंचवीस हजार शिपायांनीं झुलविलें, अद्यापही झुलवीत आहेत, व पुढेंही झुलवितील, असा रंग दिसत आहे. खरोखर पाहतां इंग्लंडच्या बलाढ्यतेस व इभ्रतीस हा कमीपणा आहे. इंग्लंडचें लष्कर लार्ड वुलस्ली, लार्ड राबर्टस ह्यांच्या सारख्या पराक्रमी सेनापतीच्या देखरेखी खालीं असतां तें इतकें ढिलें कसें राहिलें याबद्दल जगांतील प्रत्येक राष्ट्र आश्चर्य करीत आहे. दोन महिन्यांत ट्रान्सवाल खालसा करण्याची ज्या सैन्याची उमेद त्या सैन्याकडून दोन वर्षांत तरी ट्रान्सवाल खालसा होते कीं नाहीं अशी शंका येऊं लागली आहे. या लढाईचे पायीं इंग्लंड द्रव्यामुळें आणि माणसामुळें अगदीं जिगजिगीस आलें आहे. तेव्हां आतां या लढाईत थप्पड खाण्याचा दोष सेनापतीकडे, शिपायांकडे, कीं प्रधानमंडळाकडे याची वाटाघाट तिकडे चालू झाली आहे. हजारो लोक लढाईत मेले, लक्षावधि रुपयांचा चुराडा उडाला, ब्रिटिश सैन्याचा कमजोरपणा जगजाहिर झाला अतएव इंग्लंडच्या पदरांत नामुष्कीचें माप पडलें.

मुंबईस विजेची ट्रामवे लौकर सुरूं होणार आहे.


## जाहिरात

तुपे यांची उत्तम निळी काळी शाई एकदम ।॥।- ची घेणारांस रोख रुपये ५०० २००,१००,५०,२५,१५,१०,५,२ किंवा ०।२ कीं. चें पुस्तक यांतून एक बक्षीस प्रत्येकांस खात्रीनें मिळेल. शाई मागविणारांनी ट. ह. सह ०।४ ची मनिआर्डर पाठवावी, तांच त्यांचें नांव रजिष्टरांत नोंदून ज्या नंबरी नांव नोंदलें असेल त्या नंबरास आधींच ठरावून ठेवलेलें बक्षीस आहे तें लगेच रवाना होतें.

पत्ता:—एम. जी. तुपे, पेठ गणेश घर नंबर ३३ पुणें

## मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटींवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत म्हणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या ह्यातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एकहजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १९ जुलै १८९८ } A. G. Watson Agent.

## भारतधर्म सर्वांस फुकट

( आबालवृद्धांना उपयुक्त मासिक पुस्तक. )

सनातन भारतधर्ममहापरिषदेच्या हेतूप्रमाणें धर्म—नीतिज्ञानाचा विस्तार, बोध व करमणुक हीं सुलभ रीतीनें होण्याकरितां 'मनीषिमार्गगमंडळी'च्या कित्येक वर्षांच्या परिश्रमानें हें मासिक पुस्तक सुरू होणार. शके १८२३ च्या चैत्रापासून दरमहा निघणार.

या प्रथमवर्षी, पांच हजार प्रतींस वर्गणीदार होईपर्यंत फुकट! पुढच्या वर्गणीदारांना वर्षास टपालसह वर्गणी १ रु० म्हणून मागविण्याची त्वरा करा!

मुंबई—नवानागवाडा.

म्यानेजर.

आर्यमित्र.


☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED M. No.

वर्षाची आगाऊ ५ हाशील ०१२
सहामाही " ३ " ०८
साल अखेर " ७ " १ ०८
किरकोळ अंकास ..........................०४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.........०१ ०६
दुसरे खेपेस .... ........०१

Annual in advance 5 Postage 13 a
Annual in arrears 7 ,, 1 Rs 8 a
Six monthly......... 3 ...............8 a
Single copy ...............................4 a

Advertisement
Below 10 lines ...... 2 R
Per line over 10 ......4 a
Repetition Per line....3 a

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOLXXXV AKOLA MONDAY 8 APRIL 1901 NO 13

वर्ष ३५ आकोला सोमवार तारीख ८ माहे एप्रिल सन १९०१ इ० अंक १३

## जाहिरात

### पुण्यांतील वक्तृत्वोत्तेजक मंडळी.

सन १९०१।१९०२ सालचा.

भाषणसमारंभ.

पुण्यांतील वक्तृत्वोत्तेजक मंडळीचा चालू सालचा भाषणसमारंभ रविवार ता० ९ माहे मे सन १९०१ पासून सुरू होईल. विषय व बाक्षिसें खालीं लिहिल्याप्रमाणें ठेविलीं आहेत.

( २ ) विषय—तीन नेमिले असून त्यावरील सर्व भाषणें मराठींत व्हावयाचीं आहेत. इंग्रजी विषयाकरितां उमेदवार फार येत नाहींत असें दिसल्यावरून इंग्रजी विषय यंदा कमी केला आहे, तथापि बऱ्या उमेदवारांचे ता० १० एप्रिलचे आंत अर्ज आल्यास इंग्रजी विषय नेमण्यात येईल.

विषय पहिला— इंग्रजी साम्राज्याची ( Imperialism ) जी नवी कल्पना निघाली आहे तिच्यामुळें इंग्लंड, इंग्लंडच्या वसाहती व ताब्यांतील मुलूख यांचें एकीकरण कितपत व कसें होण्याचा संभव आहे व त्यामुळें इंग्रजी साम्राज्याची शक्तिमत्ता सर्व जगभर किती वाढणार आहे हें दाखवून तें घडवून आणण्यास या कल्पनेच्या पुरस्कर्त्यांनीं किंवा इंग्रजी मुत्सद्यांनीं काय उपाय किंवा साधनें योजावयास पाहिजेत तें सांगावें व ऐतिहासिक दृष्ट्या या कल्पनेचें थोडेसें परिक्षण करून अशा तऱ्हेच्या साम्राज्यात हिंदुस्थानासारख्या इंग्रजांच्या ताब्यांत असलेल्या परधर्मीय व भिन्नजातीय देशाचा कायमचा समावेश होण्यास काय काय केलें पाहिजे याचें वक्त्यानें विशेष विवेचन करावें.

विषय दुसरा—अलीकडे हिंदुस्थानांत जे दुष्काळ वारंवार पडत आहेत त्यामुळें हिंदुस्थानवासी लोकांची सामाजिकदृष्ट्या निकृष्ठावस्था उत्तरोत्तर जास्त कशी होत चालली आहे हें दुष्काळाच्या उदाहरणावरून साधारण दाखवून, विशेषतः दुष्काळानें अनाथ झालेल्या हजारों पोरक्या मुलांचें ह्यांचा त्यांचा स्वधर्म राखून रक्षण होण्यास व त्यांस योग्य शिक्षण मिळून पुढें ते उद्योगधंद्यास लागण्यास आपल्या लोकांनीं व सरकारनें काय काय उपाय केले पाहिजेत तें सांगून सदर उपाय अंमलांत कसे आणतां येतील हें सांगावें व अशा तऱ्हेचे उपाय न झाल्यास त्यापासून कायमचें नुकसान काय आहे त्यांचेंही थोडक्यांत निदर्शन करावें.

विषय तिसरा.—खालीं लिहिलेल्या अभंगांचें विवेचन करणें:—

भक्ति तें नमन वैराग्य तो त्याग ।
ज्ञान ब्रह्मीं भोग ब्रह्मतनु ॥
देहाच्या निरासें पाविजे या ठाया ।
माझी ऐशी काया जंव नव्हे ॥
उदक अग्नि धान्य झाल्या घडे पाक ।
एकाविण एक कामा नये ॥
तुका ह्मणे मज कळतें चांचणी ।
बडबडीची वाणी अवघा सत्य ॥

### बक्षिसें व गुण

वरील तीन विषयांतून इच्छेस येईल तो ( एकच ) विषय घ्यावा. पहिले विषयास बक्षीस ३९ रुपयांचें एक व दुसरें २० चें कै० रा० ब० नानाशास्त्री आपटे यांचें. दुसऱ्या विषयास रु० ३९ चें एक. व तिसरे विषयास रु० ३९ चें एक व दुसरें रु० २० चें श्री० कै० यशवंतराव गोपाळराव मैराळ यांचें बक्षीस मिळण्यास १०० गुणांतून निदान ५० गुण आले पाहिजेत

कृष्णराव बापूजी मांडे,
रामचंद्र भास्कर पाळंदे,
पुण्यांतील वक्तृत्व मंडळीचे चिटणीस.

## जाहिरात

तमाम लोकांस माहित होण्यासाठीं प्रसिद्ध केलें जात आहे कीं आकोला व उमरावती येथें असलेल्या गुरांच्या दवाखान्या प्रमाणें जनावराच्या रोगांचे इलाजा करितां गुराचे दवाखाने वाशीम, बुलडाणा, एलिचपूर आणि यवतमाळ येथें तारीख १ एप्रिल १९०१ पासून स्थापन करण्यांत आले आहेत. ह्या दवाखान्यांतून घोडे, गायी, बैल, ह्मशी, कुत्रे इत्यादि ग्राम्य पशूंच्या रोगांची पारख नीट करून त्या त्या रोगाचा इलाज करण्यासाठीं डाक्टर लोक नेमले आहेत. ह्मणून ज्या ज्या लोकांना जरूरी असेल त्यांनीं ह्मानीं सदरहू संस्थांचा जितका उपयोग करून घेतां येईल तितका करून घ्यावा. या दवाखान्यांत औषधोपचार मुफत केले जातील. कळावें. तारीख ६ एप्रील सन १९०१ इ.वी.

F. W. Francis.
डायरेक्टर आफ ल्यांडरिकार्डस
आणि अग्रिकलचर
मु० अ० हैदराबाद.

## मोरोपंत

पुढील वेंचा पूर्वीच्याच क्रमास ( तुटक पद्यें ) अनुसरून देत आहों उत्कृष्ट वेंचांतून उत्कृष्ट वेंचे घेतले तरी त्यांचा विस्तार फारच मोठा होईल ह्मणून चालू क्रमासच अनुसरलें पाहिजे.

पद्यांची रचना हेतुपूर्वक व विचारपूर्वक कशी केलेली आहे हें विशेष प्रकारें पाहण्या विषयीं पूर्वीच विनंति केली आहे.

कवीच्या मुखांतून निघालेले सर्व स्वाभाविक उद्गार हीच कविता होय हें मत आह्मांस संपूर्ण अंशांनींच ग्राह्य नाहीं. त्यांत कांहीं सत्य असेल, आणि तें सत्य त्या त्या व्यक्तीच्या बुद्धिविशालत्वा पुरतें लागू करितां येईल. पण नुसत्या बुद्धीनें, केवळ्याहि विशाल बुद्धीनें ह्मणा, हें कार्य होण्या सारखें नाहीं. शिक्षणाच्या साहित्याची त्यास फार मोठी अपेक्षा आहे. नुसत्या बुद्धीचीच देणगी ह्मटली तर ती निसर्गतःच रानटी लोकांतही अल्प संख्येनें तरी आढळतेच. पण शिक्षणाच्या पूर्ण अभावामुळें तिला कोणत्याहि रीतीनें बहुधा, आदरणीय स्वरूप येत नाहीं. ती बुद्धि जितकीच्या तितकीच राहते. आपल्या पूर्वी जे लोक होऊन गेले, त्यांनीं संग्रहित केलेल्या अनुभवांचें पठण व मनन करणें हेंच शिक्षण होय. मनुष्यप्राणि बुद्धीनें किती जरी शक्तिमान असला, तरी त्यानें दुसऱ्याच्या अनुभवांचें साह्य घेतलें पाहिजे. याचेंच नांव अध्ययन होय. साधारण बुद्धीचा मनुष्य, नितक्या अवधींत, कांहीं एक विषयांत नैपुण्य संपादील, तितकें नैपुण्य संपादण्यास बुद्धिमानास चतुर्थांश अवधि पुरेल. आणि लोकोत्तर बुद्धिमानास याहूनही अत्यल्प काळ मिळाला तरी चालेल. पण विद्वत्तेच्या साह्या वांचून नुसत्या बुद्धीस उत्तम काव्य करितां येणें दुरापास्त होय, सर्व प्राचीन किंवा अर्वाचीन कवि पाहिले, तरी ते नामांकित पंडित होते असेंच दिसून येईल.

या नियमास, बहुत लोक, साधु तुकाराम हा अपवाद ह्मणून पुढें करितात. पण असें करण्यांत ते आपलें अज्ञान उघडें करितात असें ह्मणावें लागतें. कांहीं तरी कोडें कांहीं तरी गूढ, आणून टाकावें, हेंच बहुधा अज्ञजनांचें काम असतें व तें त्यांस फार आवडतें. तें गूढ उकलण्यास ते शक्तिमान नसतात, पण शास्त्राच्या सहायानें किंवा सारबुद्धीनें कोणी ते उकलून टाकील तर त्या अज्ञान्यांस तें रुचत नाहीं! कां कीं तसें केल्यानें त्यांचे मिथ्याभास लयास जातात. त्यांच्या मनाचें पोषण, रुचीतील गोडी, व हृदयांतील परमानंद या मिथ्याभासांत असतो. जें कांहीं असंभाव्य, व अतर्क्य असेल. असें कांहीं तरी ऐकावयास व पहावयास मिळावें, हीच त्यांची इच्छा असते. आणि ज्या विषयीं कधीं कोणास स्पष्ट कल्पना करितां यावयाची नाहीं व ज्यास व्यक्त रूप देतां यावयाचें नाहीं, असें विषय मनांत धरून ठेवणें, हे त्यांस फार आवडतें. त्यांच्या समजुतींत विक्षेप आणून सत्यस्वरूप दाखविण्याचा यत्न केला, तर त्यांचा उत्साहभंग होतो. जें वर्णन मनुष्य स्वभावास, मनुष्य कृतीस, व स्थितीस शोभण्या सारखें असतें तें सर्व त्यांस असंमत होतें, आणि तद्विरुद्ध वर्णन कान देऊन ते ऐकतात व आशा पूर्वक हृदयांत सांठवितात. ही मनोवृत्ति व ही आवड सर्वपरी त्याज्य वाटली पाहिजे. श्रेष्ठ मनोवृत्तींत यांची गणना मुळीं करितां येत नाहीं.

तुकाराम अशिक्षित होता हें कशावरून? श्रुतिस्मृतींचें सार, पंडितांस मान्य होण्या सारख्या भाषेनें, व विचारांनीं, ज्यानें भर काढिलें तो विद्वान् या पदास अपात्र होता किंवा तशा ग्रंथांस अपरिचित होता, ही कल्पना तरी शोभण्या सारखी आहे काय तुकारामाची बुद्धि विशाल होती हे निर्विवाद आहे. आणि ह्मणून सामान्य जनांकडून दोन तपांत होणारें अध्ययन, जनसमूहानें अलक्षित असें, त्यानें दोनच वर्षांत संपवून टाकलें असावें. त्याचें पुढील आयुःक्रमण उदासीनतेचें होतें. या आयुःक्रमण कालांत तुकारामाचें अध्ययन, जनसमूहावलोकनांत न आल्यामुळें, वरील कुतर्काचा त्यास आश्रय करावा लागला. स्वभावतः मूढबुद्धि असून, गुरुकृपेनें किंवा दैवयोगानें, ज्ञानशक्तींत अकस्मात फरक होऊन बृहस्पतीची योग्यता येते, ह्या अज्ञान मूलक समजुती मूढ जनांवांचून कोणास पसंत पडतील? आतां काव्यस्फूर्ती ह्मणून जो एक नैसर्गिक प्रसाद आहे ती वेगळीच बाब होय. पण तिचें सार्थक्य होण्यास विद्वत्तेची जोड करणें अत्यावश्यक आहे.

असो. आतां याखालीं प्रसंगास उचित असा, कै. बा. म. हंसकृत लहानसा अभिप्राय दाखल करून नंतर वेंचा देऊं.

"पंतांनीं, अठरा पर्वांच्या भारती इं[...] दंडाची लावणी महाराष्ट्र भूमिकेंत करू[...] ठेविली आहे. महाभारत ग्रंथ गीर्वा[...] भांडारांत सांठविलेला असल्यामुळें प्राकृतां[...] दुर्मिळ होता. त्याची सुगमता करून पंतांनी प्राकृत जनांवर मोठाच प्रसाद केला हें कोणी[...] ही कबूल करील. हीं पंतांचीं सर्वच प[...] उत्तम काव्य रसानें पुष्ट झालीं आहेत + + + + मोरोपंताची कवित[...] तींतही विशेषें करून, आर्यावृत्त तील, बिव[...] लकरी वळणा प्रमाणें, तत्काळ ओळखत[...] येण्याजोगीं वळणदार दिसते. भवभूत[...] जगन्नाथराय, इत्यादि पंडितांनीं, स्वकृतीविषयीं, मोठी उद्दाम गर्वोक्ति प्रकट केली आहे तसा मार्ग पंतांनीं घेतला नाहीं. + + + पंतांनीं श्रृंगारवीरादि रसांत पवित्र भक्तिरसाचें मिश्रण केलें. अर्थात वरील पंडितांची उक्ति उद्दाम मदमय, आणि पंतांची लीन[...] मोदमय झाली."

भारत वि. प. पृ १९०

विद्यमान काळीं, इंग्लंद, फ्रान्स, जर्मनी, अमेरिका, इत्यादि विद्याचार संपन्न राष्ट्रांत, योग्यतेच्या मनुष्यांचा केवढा मान होतो, हें पाहिलें ह्मणजे तीं राष्ट्रें धन्य होत असें

ह्मटल्या वांचून राहवत नाहीं. आपल्या या देशांत सद्गुणांची चहा करण्याकड आजपर्यंत औदासिन्य झालें व त्यामुळें अत्यंत मौल्यवान् रत्नेंही धुळींत लोळत होतीं या औदासिन्यास, सर्वसाधारण लोकांत, उपयुक्त ज्ञानप्रसृतीचा अभाव हें मोठें कारण होतें. हें कारण बहुतांशीं आतां दूर झालें आहे. ह्मणून ह्या रत्नांची आतां पारख होऊन, त्यांच्या तेजानें जनसमूहाचीं अंतःकरणें सुप्रकाशित होतील अशी आशा धरण्यास जागा आहे.

( पुढें चालेल )

वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र वद्य ४ शके १८२३

## शेतकऱ्यांची स्थिति व ती सुधारण्याची अवश्यकता

आपल्या देशांत नुकतेच एका मागून एक दोन दुष्काळ होऊन गेल्यामुळें, व त्यामुळें आपल्या देशांतील लोक किती निकृष्टावस्थेस पोहोंचले आहेत ह्याचें चित्र बऱ्याच प्रमाणानें, आपल्या राज्यकर्त्यांच्या मनावर हुबेहुब वठल्यामुळें, हिंदुस्थान देशांतील निकृष्टावस्था कोणत्या उपायांनीं सुधारतां येईल ह्या विषयाकडे हिंदुस्थान सरकारचें अलिकडे लक्ष्य लागलें आहे; व ह्या प्रमाणेंच प्रांतोप्रांतीच्या अधिकाऱ्यांचेंही ह्या विषयाकडे अलिकडे लक्ष्य लागत चाललें आहे ही समाधानाची गोष्ट आहे. हिंदुस्थानच्या दारिद्र्यावस्थें संबंधानें नामदार दादाभाई नौरोजी ह्यांनीं काढलेलीं विधानें जरी सर्वांशीं मान्य झालीं नाहींत, तरी हिंदुस्थानांतील लोकांची सांप्रतची स्थिति समाधानकारक नाहीं असें हिंदुस्थानसरकार प्रांजलपणें कबूल करण्यास लागलें आहे ही गोष्ट कमी महत्वाची नाहीं. कारण रोगाचें निदान बरोबर झालें ह्मणजे गूण शेंकडा ५० अंशानें तरी हटकून येतो असा आपल्या लोकांचा समज आहे. असो. हल्लीं आपल्या देशांतील लोकांची स्थिति बरीच निकृष्टावस्थेस पोहोंचली आहे, ह्या मताच्या पुष्ट्यर्थ प्रत्यक्ष प्रमाणाशिवाय इतर प्रमाणाची जरूरी नाहीं. शहरांतून हवेल्यांची संख्या वाढलेली दिसते ह्मणून तेवढ्यावरूनच एकंदर देशाची स्थिति सुधारली आहे अशा आशयाचें विधान करणें चुकीचें होईल; कारण शहरांतून जरी सुखवस्तु लोकांची संख्या वाढली आहे असें जरी घटकाभर धरून चाललें, तरी त्या बरोबरच दुसरीं किती कुटुंबें निकृष्टावस्थेस पोहोंचलीं आहेत ह्याचा बारकाईनें शोध केला असतां वस्तुस्थिति कळून येणार आहे. शिवाय इतर राष्ट्रांशीं तुलना करून पाहिली असतांही आपल्या देशाचा नंबर बराच खालीं आहे हें दिसुन येईल असो. आपल्या देशातील लोकसंख्येची उपजीविका बहुतांशीं शेतीवरच असल्यामुळें, ती सुधारण्याविषयीं आपण प्रथम विचार केला पाहिजे.

आपल्या प्रांता संबंधानें पहातां कांहीं वर्षांमागें "वऱ्हाड व सोन्याची कराड" अशी ह्मण आपल्या प्रांतातील लोकांची सुस्थितिद्योतक ह्मणून प्रचारांत असे; परंतु अलिकडे खानदानींतील लोक, जहागिरदार, देशपांडे, देशमुख व पाटील ह्यांची पूर्वींची संपन्न स्थिति जाऊन, त्यांना आतां बरीच निकृष्टावस्था प्राप्त झाली आहे. साधारण कुणबी शेतकऱ्याची हल्लीं काय अवस्था झाली आहे, हें त्यांच्यां पैकीं किती लोक गेल्या दुष्काळांत दुष्काळ कामांवर पोट भरण्याकरितां गेले होते ह्याचा बोध केला असतां सहज ध्यानीं येईल. कुणबी जात्या मोठ्या मानी स्वभावाचा असून, त्याला निरुपायास्तव गिट्टी फोडण्याच्या कामावर जावें लागलें, ह्यावरून ह्याची स्थिति किती निकृष्टावस्थेस पोहोंचली आहे ह्याचा विचार करता येईल. अशी स्थिति आपल्या देशांतील लोकांस प्राप्त व्हावी ही गोष्ट नैतिकदृष्ट्यादि फार अनिष्ट आहे. कारण गरिबी बरोबरच लबाडी वगैरे अवगुण आपला रिघाव करितात. आपल्या वऱ्हाड प्रांतांतच पूर्वीं कुणबी लोक फार भले व भोळे समजले जात असत. परंतु अलिकडे सावकाराच्या कचाट्यांतून सुटण्याच्या बुद्धीनें नातेवाइकाच्या आड लपून ज्यानीं कपटाची खरेदीखतें केलीं आहेत, अशा किती कुणब्यांचीं उदाहरणें अलिकडे दिवाणी कोर्टापुढें येत असलेलीं दिसून येतात बरें! अशा तऱ्हेच्या उदाहरणावरून शेतकऱ्यांच्या नीतीचा अलिकडे ऱ्हास होत चालला आहे व त्याचें मुख्य कारण त्यांची गरिबी होय हें मोठ्या दुःखानें कबूल करावें लागतें. तेव्हां शेतकऱ्यांची स्थिति कोणत्या उपायांनीं सुधारतां येईल हा विषय अत्यंत महत्वाचा आहे हें प्रत्येकास कबूल करणें भाग पडेल.

## विश्रांतीचा काल

( राव बहादूर देवराव जयकृष्ण देशपांडे यांच्या चाकरीची इतिश्री. )

आह्मी रोजगार धंद्यांत निमग्न असलेले लोक विश्रांतीच्या कालाचीं सुखें कल्पनेनें बहुगुणित करीत असतों. विश्रांतीचा काल उपभोगण्याचा सुखमय सरकारी नोकरांच्या दृष्टी पुढें जसा आखलेला असतो तसा तो बिन नोकरीच्या माणसा पुढें नसतो. तथापि असा सुखमय ज्यांस प्राप्त होतो त्या सरकारी अधिकाऱ्यास आह्मी लौकिकी दृष्टीनें धन्य व कृतकार्य मानतों. पेनशनीच्या विश्रांतीला पात्रता आली ह्मणजे सरकारी चाकरी पुरता एका उपयुक्त कारकिर्दीचा गोड शेवट झाला असें आह्मी ह्मणतों. राव बहादूर देवराव जयकृष्ण हे सरकारी चाकरीच्या उत्कृष्ट शेवटाला पोचले आणि ह्यांचीं सर्वत्र मानमान्यता राहिली हें आह्मांला निराळें कळवावयाला नको. त्यांचा लौकिक त्यांची आठवण सर्वांस देतच आहे. हे कुलीन खरे पण मूळचे गरीब होते. सामान्य ८।१० रुपयांच्या चाकरी पासून हे एवढ्या मोठ्या दर्ज्याला चढले आणि या पेक्षांहि नेटिवांस कांहीं जागा खुल्या असत्या तर ते त्याही उच्च पदवीला चढले असते.

राव बहादूर देवराव जयकृष्ण यांचा जन्म १८४१ च्या जानेवारी १ ला झाला. यांच्या घराण्याची मूळची वस्ती वाशिमाकडची आहे. १८६० च्या १ ले जानेवारीला प्रथम हे इझारनविसच्या जागीं चाकरीला लागले. पुढें १८६२ नोवेंबर पासून तीन वर्षे पर्यंत हे नागपुरास मराठी क्लार्क होते. पुन्हा उमरावतीस नायब शिरस्तेदारीच्या जागीं वऱ्हाडांत परत आले आणि १८७१ च्या सुमाराला बुलढाण्यास क्लार्क आफ कोर्ट झाले. १८७३ च्या जानेवारींत आकोल्यास तहशिलदारीच्या जागीं त्यांची नेमणूक झाली. १० वर्षे तहशिलदारी केल्या नंतर हे ए. असिस्टंटच्या पदवीला चढले. १८८४ पासून हे आकोला व यवतमाळ येथें मिळून १८९० च्या में पर्यंत फिरते होते तेल्हाऱ्यास गेल्या पासून ११ वर्षांचा काल त्यांचा एकाच स्थळीं गेला; आणि मोठमोठीं दरबाराचीं, लोकोपयोगी व महत्वांचीं कार्यें यांच्या हातून या ठिकाणीं घडलीं.

श्रेष्ठपणाला नेणारा सोपानमार्ग मोठा बिकट असतो. त्यांत बुद्धिचातुर्य, श्रमलालित्य, स्वभावरीक्षण, विद्याभिलाष इत्यादि दुर्निवेद्यारीचीं उत्कृष्ट साधनें उपलब्ध पाहिजेत. आणि तीं सर्व राव बहादूर देवराव बाबा साहेबांच्या ठायीं एकत्र झालेलीं आहेत. राव बहादूर जसे राजमान्य आहेत तसे लोकप्रियही आहेत. त्यांच्या वयाला साठ वर्षे झालीं आहेत. या दीर्घ कालांत कांहीं दोषस्थळें दिसलीं तरी गोळा बेरजेनें अशा उत्तम कारकीर्दीही थोड्याच दाखवितां येतील. ईश्वरकृपेनें त्यांस हा पेनशनीचा काल चिरकाल लाभो आणि त्यांच्या हातून पुष्कळशा सार्वजनिक गोष्टी घडोत!

गेल्या सोमवारीं राव बहादुरांनीं आपल्या कामाचा चार्ज दिल्या नंतर त्यांच्या सन्मानार्थ तेल्हाऱ्यास पानसुपारीचा मोठा समारंभ तारीख २ एप्रिल रोजीं झाला त्या वेळीं झालेल्या संभाषणास उत्तरादाखल त्यांनीं जें संभाषण केलें तें आह्मी आमच्या वाचकां करितां खालीं देत आहों:—

सभ्य लोक हो आज तुह्मी माझा जो इतका बहुमान केला त्या बद्दल मी तुमचा सर्वांचा फार आभारी आहे. आपण माझा इतका सत्कार करावा असें माझे हातून कांहीं घडलेलें नाहीं. नोकरीचे नात्यानें जें काय मला करणें जरूर होतें तेंच मीं केलें आहे; यापेक्षां जास्त कांहीं केलें नाहीं.

मी आज सुमारें ४२ वर्षे नोकरी केली त्या नोकरींत तेल्हारे येथील नोकरीचा काळ विशेष महत्वाचा होता असें ह्मणण्यास हरकत नाहीं. वऱ्हाडामधें जीं मोठालीं कोर्टें आहेत त्यांपैकींच हें एक कोर्ट आहे. या कोर्टावर काम करणाऱ्या न्यायाधिशांवर कामाचा बोजा फार पडतो. हें मी स्वतःचे अनुभवावरून सांगतों.

या कोर्टांतील माझे हाताखालील कारकून वगैरे मंडळीकडून मजला साह्य चांगलें मिळालें. दिवाणी कामांत कारकून लोकांकडून पक्षकार लोकांस फार तकलीफ होत असते ही गोष्ट आपणा सर्वांस माहीत आहेच. तसा त्रास आपले कारकिर्दींत लोकांस पडूं नये ह्मणून मी फार काळजी घेत असें आणि इतर कोर्टांचे मानानें पाहिलें असतां हें कोर्ट बरेंच चांगलें आहे.

या ठिकाणीं माझे हाता खालचे नोकर मंडळीस इतकेंच सांगावयाचें आहे कीं, कामाचे संबंधानें माझे कारकिर्दींत कदाचित त्यावर विशेष बोजा पडला असेल किंवा प्रसंग विशेषीं मी ह्यांचेवर रागावलोंही असेल परंतु अधिकाऱ्यास तसें करावें लागतें. पोटांत कितीही दया असली तरी बाहेर सक्ती करावी लागते. त्या शिवाय काम होत नाहीं. करितां कामाचे संबंधांत माझे हातून जर कोणाचे मन दुखविलें गेलें असेल तर ती गोष्ट कोणी मनांत ठेवूं नये. इतकेंच माझें सांगणें आहे. त्यांनीं मला जो आदर केला त्या बद्दल मी त्यांचा आभारी आहे.

न्यायाधिशाचा आणि वकिलाचा जितका संबंध असतो तितका दुसरे कोणाचा नसतो असें ह्मटलें तरी चालेल. एकंदरीनें पाहतां तेल्हारे कोर्टाचे वकील चांगले आहेत यांत संशय नाहीं. पुष्कळ वकिलांकडून न्यायाचे कामीं चांगली मदत मिळाली हें मीं संतोषानें कबूल करतों.

येथील कोर्टाचे वकिला संबंधानें आणखी एक विशेष गोष्ट अशी आहे कीं, जसें कोर्टाचें कामांत ह्यांचें लायक वर्तन आहे तसें घरगुती कामांतही आहे. वकील लोकांस साधारणतः बरे पैसे मिळतात; आणि पैशाचे मागें व्यसनें असतात. परंतु येथील वकील लोकांचें खासगी वर्तन निर्मळ आहे ह्यांपैकीं बरेच जण मन मिळाऊ आणि स्नेहास लायक आहेत. ते परस्परांशीं मोठ्या प्रेमानें वागतात आणि जुटीनें राहतात न्यायाचे कामीं आणि खानगी कामीं ह्यांनीं मला पुष्कळ मदत दिली याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे.

न्यायाधिशाचे कामाशिवाय मला इतर पुष्कळ कामें करावीं लागली मुख्यत्वेंकरून दुष्काळाचे दिवसांत तशीं कामें फार होतीं. त्या कामांत येथील सावकार, वकील व इतर लोक यांनीं मला फार मदत दिली आहे. आणि त्याबद्दल मी त्यांची योग्य ठिकाणीं तारीफही केली आहे.

तेल्हाऱ्याची स्यानिटरी कमेटी, आकोट तालुका बोर्ड आणि तशीच येथील लायब्ररी या संबंधानें चार शब्द बोलल्या शिवाय मला राहवत नाहीं.

ही मोठी आनंदाची गोष्ट आहे कीं, ह्या सर्व संस्था माझ्या वेळीं येथें प्रस्थापित झाल्या. येथील कमेटीची आणि बोर्डाची सरकारही वाखाणणी करीत आहे ही गोष्ट आपणास माहित असेलच. गावकऱ्यांनीं दरसाल ८०० रुपये वर्गणी आपसांत करून सरकारास देणें ही गोष्ट सामान्य नाहीं. या कमेटी प्रमाणें वऱ्हाडांत दुसरे ठिकाणीं कमेट्या स्थापन कराव्या असें सरकारचे मनांत फार आहे परंतु ती गोष्ट अद्याप सिद्धीस जात नाहीं. यावरून या कमेटीचे महत्व किती आहे हें लक्षांत येण्या सारखें आहे. ह्या कमेटीचें काम योग्य प्रकारानें चालण्यास मजला आपण सर्वांनीं मदत केली आहे.

परवा बोर्डाची सभा भरली होती त्या वेळीं बोर्डाचे मेंबर लोका संबंधानें मीं आपलें मत दिलें आहे, करिता आतां येथें त्याबद्दल विशेष सांगण्याची जरूरी नाहीं.

ज्या लायब्ररीचे इमारतींत आपण हल्लीं बसलों आहों ती इमारत मोठ्या शहरांतही शोभा देण्यासारखी आहे.

शेवटीं मला इतकेंच सांगण्याचें आहे कीं, हीं सर्व कामें करण्यांत माझ्या मित्र मंडळीचें मला पुरें साह्य होतें. ही मंडळी कोण आहे हें आपण जाणत आहांत. माझा या मंडळीवर पूर्ण भरंवसा आहे. आणि त्या भरंवशास ती मंडळी अगदीं लायक आहे. हें मी मोठ्या आनंदानें अजूनही ह्मणतो.

या संबंधानें आतां इतकेंच सांगणें आहे कीं, या सर्व संस्था नीट सुरळीत चालण्या विषयीं खबरदारी घ्या. मला यापेक्षां विशेष सांगण्याचें नाहीं. आज पर्यंत तुह्मी माझ्यावर जसें प्रेम केलें तसें पुढेंही करा. माझे नोकरीचा महत्वाचा काल या ठिकाणीं गेला आहे असें मी पूर्वीं ह्मटलें आहे. सरकारांतून माझ्या नोकरीबद्दल थोडा बहुत मजला जो मान मिळाला आहे तो याच ठिकाणीं मिळाला आहे. कामाचे संबंधानें माझे हातून जाणून बुजून किंवा न कळत कांहीं प्रमाद झाले असतील तर ते आपण अगदीं विसरा. अशी मी आपणास विनंती करतो, आणि आपला शेवटचा निरोप घेतों.

The Berar Samachar

MONDAY APRIL 8 1901

We are glad to observe that Mr. Digamber Krishna Kolhatkar B. A. LL. B. is appointed an Extra Assistat Commissioner in the Central Prvinces. He is at present posted a Narsingpur and we hope he will oon be confirmed in his new post n due course of time. This event suggests to us a question as to te advisability of appointing judge from amongst the thriving meners of the bar. We donot think tat there will be two opinions bout the necessity of such rerms. We see excellent results ofhis system in the Bombay presidcy and the present judicial oartment of Bombay will excel silar departments in other provces in point of merit and eellenee. Sir Raymond West h won the highest renown for systematic and constitutional refos in the formation of the judici line of the whole presîdency. Hrecognized the greatness of he legal profession and madhe legel education a pass—p to the service in the judicial bch of the administration. We h nothing of these reforms herea Berar. There is no likelihoodt a probable change in t judicial department as long as re is no appreciation of the lestraining as a qualification for jus and magistrates. The presejudicial department requires a and compsehensive revision. legal erudition and the trainint the bar should be the first qualifications for appointments in the judicial line. Our judges and magistrates are as a rule gentlemen of official experience alone. They know well the routine of business and when they sit to administer justice they draw upon their official experience and common sense. But these are not enough to qualify a man for the competent and efficient administration of justice. We admit that the prasent machinery of the judicial department turns out a full quota of work, But it lacks in every excellence which ought to typify and ennoble the high notions of justice. It goee on and will do so for years together. It often happens that judges and magistrates are appointed even before they pass through the A B C of the legal training required for the departmental Higher and Lower examinations. It is something like this: A judge in Berar begins to study and administer law at one stroke by the virtue ot his position. It is a serious drawback in the administration and sanctions a most objectionable practice. The science of Law regulates human conduct in society and as civilization progresses law becomes most intricate and multifarious. And for this difficult and stupendous task of regulating the manifold aspects of human life in a progressive community we require men of high calibre, exceptionable abilities and a special training, in law It is a fatal mistake to appoint to this divine duty men who have yet to begin their studies in law. We have thus reasons to expect judges to possess the highest attainments in the legal knowledge. Where else can we ask for such high standards of the legal education? We condemn the present ways of making appointments in the judicial line. The selection of judges and magistrates should be from amongst the members of the bar. This is a sound principle and let us hope that it will be honored with all the weight it deserves.

There was a Pan Supari meeting in honor of Mr. E. J. Sanjana at the ative Club on Friday last. The gentlemen of the station were present on the occasion and the pleaders' Association at Akola took leave of the guest of the day in a feeling and kindly manner. We give below the texts of the speeches delivered at the meeting with a view that they will be more interesting than our terse and dry observations. Mr. D. G. Patwardhan the senior pleader of Akola addressed the assembly in the following terms:—

Mr. Sanjánà, gentlemen and friends,

I think you all for your having kindly graced this occasion by your presence when the pleaders of the Local Bar intend entertaining Mr. Sanjáná at a Pan Supari party this evining. Mr. Sanjâná gentlemen, has been here for over threa years; during this time he acted as Judge of the Local Small Cause Court. I don't think this is a fit occasion to pass any remarks on the good work done by Mr. Sanjana nor do I think it is within my province to do so. But you will allow me, and I believe it will not be objectionable to state here that Mr. Sanjana always gave us, the pleaders, a very patient hearing and he did so especially to parties when they were not represented by pleaders. I may state, Mr. Sanjana tried his best to do justice to all concerned. He treated us all gentlemanly, Courteously and with due respect. I leibeve I shall be expressing the unanimous sentiment of the whole body of pleaders at Akola, if I state that Mr. Sanjana always considered our conveniences, rendering it thereby easy for us to fulfil all our engagements, which I think were many times numerous. I have known Mr. Sanjana in capacities other than that of Small Causes Court Judge, and have had differences with him on important points; but I must state here, very candidly, that he possessed the good quality of forgetting differences in one sphere of life, while doing duties belonging to another. I take this opportunity, gentlemen, of expressing the obligations of the pleaders of Akola to Mr. Sanjana for the courteous treatment he gave us. Thanking you gentlemen, again for your presence. I will not detain you any further from the good work that awaits you in the veranda."

In rosponse to this address Mr. Sanjana made the following reply:—

"Mr. Patwardhan, members of the Akola Bar and gentlemen,

I thank you heartily for the honour you have done me in assembling here this evening to give expression to your kind wishes for me. I feel doubtful however whether I have done any thing very extraordinary during my term of office here that would deserve this honour. Whatever I have done was due from the bench and the same, I am sure, will be equally well or even better done by my successor; yet I am glad to say that our relations during the four years that I had the honour of sitting as a Judge of the Small Causes Court here were never in any way strained and that we did our level best according to our own lights for the public good. I have to thank you for the cordial and ready assistance you all along gave me in the discharge of my duties and I am using no light words when I say that the bar as at present constitued is second to none in India and is a great source of help to the Bench. I am an old officer; you are almost all of you young men and it is really creditable that for four years you should have cheerfully fallen in with my old ways and worked with me harmoniously and smoothly. I wish you all success in life.

I thank you once more gentlemen for the trouble you have taken and for the honour you have done me and wish to each of you along with my good bye a long life of successful public usefulness."

## वऱ्हाड

मे. रुस्तुमजी फर्दूनजी यांनीं तीन महिन्यांची हक्काची रजा गेल्या १ ले तारखेपासून घेतली; आणि गेल्या गुरुवारीं पहाटेच्या गाडीनें ते जबलपूर मार्गें रवाना झाले. ह्यांचा विचार ही रजा काश्मिराकडे शिकारींत व इतर करमणुकींत घालविण्याचा आहे.

मे. कुमारश्री हरबानजी रावजी हे १ ले तारखेला डिपुटी कमिशनरच्या जागीं रुजूं झाले; आणि या जुन्या अधिकाऱ्यांची साधी राहणी, मनमिळाऊ स्वभाव, व गोड भाषण हीं विशेष प्रेक्षणीय आहेत. उच्च अधिकाराला या गुणांनीं चांगली शोभा येते.

रा० रा० कृष्णाजी अनंत यांनीं रजा संपल्यामुळें उमरावतीच्या तहशिलीचा चार्ज घेतला आणि रा० रा० रंगनाथ विष्णु हे आपल्या आफिशिएटींग एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनरच्या जागीं येथें रुजूं होण्यासाठीं लवकरच दाखल होतील.

रा० रा० विश्वनाथ नारायण दांडेकर हे आपल्या कामाचा चार्ज स्मालकाज कोर्टाच्या न्यायाधिशास देऊन गेल्या शुक्रवारीं पुण्याला तीन महिन्यांच्या रजेवर गेले आहेत.

गेल्या दुष्काळांत ज्यांनीं सरकाराला व लोकांना नानाद्वारें मदत दिली त्या लोकांस अभिनंदनपत्रिका मे. कमिशनर साहेब यांनीं पाठविल्या आहेत. त्या पत्रिका समर्पण करण्यासाठीं काल प्रातःकाळीं सभा भरली होती आणि पंचवीस गृहस्थांस मे. कुमारश्री हरबानजी साहेबांनीं त्या पत्रिका मोठ्या आनंदानें दिल्या. येत्या बुधवारीं पुष्कळशा राहिलेल्या गृहस्थांस अभिनंदन पत्रिका वाटण्यांत येणार आहेत.

मे. क्राफर्ड साहेब हे म्हैसूरच्या रेसिडेंटच्या जागीं लवकरच जाणार आहेत आणि येथील कमिशनरच्या जागीं कोण येणार आहेत हें मात्र अजून ठरलें नाहीं. मे. हेअर साहेब हें कमिशनर होतील तर सर्व प्रांतस्थ लोकांस मोठा आनंद होईल.

## जाहिरात

अकोले येथील सर्व राहिवासी लोकांस या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं सन १९००-१९०१ साल पुरें होऊन खाजगी पायखान्याचे लायसेन्साची मुदत संपली आहे. करितां चालू १९०१-१९०२ सालाबद्दलची, खाजगी पायखान्याचा उपयोग करणार सर्व लोकांनीं, लायसन्सें घ्यावींत व तीं तारीख ३० माहे एप्रिल सन १९०१ इसवीचे आंत घ्यावीत. आणि ज्या लोकांनीं आपले स्वतःचे खाजगी भंगी ठेऊन पायखानें साफ करण्याची व्यवस्था केली आहे त्या लोकांनीं आपलें नांव आणि ठेवलेल्या भंग्याचें नांव सदर्हू मुदतीचे आंत कमेटीस कळवावें. तसें न केल्यास खाजगी भंगी नाहीं असें समजून व जे लोक लायसन्सा वाचून पायखान्याचा उपयोग करून सदरहू तारखेचे आंत लायसन्स घेणार नाहींत असें दोन्ही प्रकारचे लोकांवर लायसन्सावांचून पायखाना उपयोगांत आणल्याबद्दल मुकद्दमे केले जातील. मग कोणतेही प्रकारची सबब ऐकिली जाणार नाहीं. कळावें. तारीख ७।४।१९०१ इसवी.

K. G. Damale
Secretary
Akola Municipal Committee.

## वर्तमानसार

### लढाई

बोअर लोकांच्या टोळ्या अद्याप बऱ्याच आहेत व त्या इकडे तिकडे हिंडून नासधूस करितात व त्रास देतात जगांतलि बलाढ्य अशा राष्ट्राशीं एका भिकारड्या ट्रान्सवालनें वैर माडिलें आहे, व सिंहास उंदीर जसा त्रासवून बेजार करितो तसें इंग्रजांस बोअर लोकांनीं भंडावून सोडलें आहे. त्यांचे हजारों लोक कैद होत आहेत व मरत आहेत तरी त्यांस दिक्कत वाटत नाहीं. त्यांच्या धैर्याचा व प्रतापाचा मेरू अचल आहे. स्वातंत्र्यासाठीं ते इतके दिवस लढत आहेत व तें मिळविल्या खेरीज हातची समशेर बंदूक खालीं टेवणें नाहीं असा यांचा कृत संकल्प दिसतो. व कोणीकडून तरी इंग्रजांस चैन पडूं देणें नाहीं ह्या तत्वावर लढाई मारण्याचें त्यांचें संधान होय.

### चीन प्रकरण

इंग्लंड व जर्मनी यांचें आपसांत असें ठरलें आहे कीं, चीनचें म्यांचुरिया सकट सर्व राज्य कायम ठेवावयाचें व त्याचे तुकडे होऊं द्यावयाचे नाहींत.

### हत्ती पळाला

म्हैसोर फॉरेस्ट डिपार्टमेंटचे एका हत्तीनें आपल्या महाताच्या चिंध्या केल्या, व उसाच्या एका बागेची नासधूस करून फन्ना उडावेला. ह्या हत्तीची सर्वांस मोठी भीति उत्पन्न झाली आहे. हत्तीस पकडण्याची व्यवस्था सुरू आहे.

### उपव्द्यापी

एका मनुष्यानें एक मुसलमानाची व एक चांभाराची अशा दोन मुलींचीं लग्नें, ह्या ब्राह्मणाच्या आहेत अशीं थाप देऊन, दोघा ब्राह्मणा बरोबर करून सोडलीं. पुढें लबाडी बाहेर आली व त्यांस ९ वर्षांची शिक्षा मिळाली.

### नवीन रेल्वे

मुंबई पासून कराची पर्यंत, व पेशावर पासून जमरूड पर्यंत रेल्वे करण्याचें घाटत आहे.

### थोर

पीतज्वरा सारखे स्पर्शजन्य रोग हे माशा डांस वगैरे प्राण्यांच्या चाव्यानें एकाचे दुसऱ्यास लागतात. ह्या रोगावर देवी काढण्या सारखा तोडगा निघाला आहे. त्याचा अनुभव घेण्यास डाक्टर लाझिअर व कारोल असे दोघे अमेरिकन गृहस्थ तयार झाले. पैकीं लाझिअर हा प्राणास मुकला व दुसरा मात्र वांचला. लोकांच्या भावी कल्याणासाठीं जीव देणारे महात्मे थोरच.

### गैर गोष्ट

एज्युकेशनल डें० इन्स्पेक्टर त्रिवेंदम हे मुलींच्या शाळांतील जाणत्या मुलीचे आपल्या सह फोटो काढवितात असें ह्मणतात. हें चालतें तरी कसें? खरी गोष्ट असल्यास गैर आहे.

### पाण्याची चोरी

ज्या गांवांना पिण्याचें पाणी फार लांबून आणावें लागतें तेथें अशा गमतीच्या गोष्टी नडतात. उन्हातान्हाचें डोक्यावर घागर घेऊन दुरून पाणी आणिलें ह्मणजे तें सोन्यारुप्यापेक्षां सुद्धां जास्त मोलवान् होतें. पोरणगंज गांवीं एकाच्या घरांत चोर शिरला व त्यानें घरांतून एक कळशभिर पाणी चोरून नेलें दुसऱ्या कांहीं एक वस्तूस धक्का पोंचला नाहीं. कायद्यानें ह्या चोरास पाण्याबद्दल शिक्षा होईल काय ?

### हत्ती चोरला

ट्राव्हनकोर कडील पत्तनूर शहरीं एका मनुष्याचा ३ हजार रुपये किंमतीचा हत्ती चोरीस गेला. हत्ती सारख्या बड्या जनावराची चोरी कशी काय झाली कोण जाणे ! आणि अद्याप पत्ता नाहीं हें तर आश्चर्यच चोर शोकीन खरा.

### साहेबाचे घरीं चोरी

कलकत्यास गेल्या तारीख २७ रोजीं एका चोरानें रॉस साहेबांच्या बंगल्यांत शिरून पेट्या वगैरे लांबविल्या. त्यानें त्या घरातील एका लहान लेकराचा गळा दाबून प्राणही घेतला. तो चोर पळून गेला आहे त्यास पकडून देण्याबद्दल पो० कमिशनरनें एक हजार रुपयांचें बक्षीस लाविलें आहे. हे बक्षीस पोलीसलाच मिळावयाचें असें दिसतें. पण चोरीचा पत्ता लावणें हे पोलिसचेंच काम आहे.

### साडे साती

कालीदास कर्ते रा० गुरुजी यांस योग्य जामिनदार मिळाले होते पण मॅजिस्ट्रेट साहेबांच्या अतर्क्य व अचाट कल्पनेमुळें निरुपाय झाला. घराची जामीनयत भूकंपाचे आशाश्वतमुळें रद्द झाली. व एकच मनुष्य जामिनकीची सर्व रकम देण्यास तयार असतांही नामंजूरी मिळाली. नकर्त्याचा वार शनिवार दुर्दैवानें कसा आडवा येतो पहा.

### वैचित्र्य

आस्ट्रेलिया मध्यें आपल्या इकडच्या अगदीं उलट अशा चमत्कारिक गोष्टी घडतात. तिकडे झाडांची पानें न गळतां त्यांच्या सालीच झडतात. फळांच्या आंतील बी व मगज हा फळांच्या बाहेरच्या अंगास असतो. तिकडल्या फुलांना वास मुळींच नाहीं. कोणच्याच पक्षाला सुस्वर काढितां येत नाहीं. हंसाचे रंगरूप काळें असतें. कोळी माशांना खात नाहींत पण उलट माशाच कोळ्यांना पकडून खातात. मासे तर पाण्याच्या बाहेर येऊन जमिनीवर चालतात व झाडावरहि चढतात अशी कांहीं इश्वरी करणी अगाध आहे.

### गमतीचा विवाह

पोलंडांत एका गावीं एका ८८ वर्षांच्या वृद्ध मनुष्यानें एका १८ वर्षांच्या बालिके बरोबर विवाह केला. लग्नसमारंभास सुमारे २०० वऱ्हाडी होते, पैकीं ११ त्या नवरदेवाचे पूर्व स्त्रीचे चिरंजीव होते. सर्वांत वडील मुलगा ६० वर्षांचा व लहान ४१ वर्षांचा होता. ६३ नातवंडे, ३९ पणतवंडे व २०—२९ पणतूंची मुलें व त्या मुलांची मुलें होतीं. येणें प्रकारें सर्वांनीं त्या मंगल कार्याचा थाट उडवून दिला.

### बक्षीस

लार्ड कर्झन साहेबांनीं लाहोरच्या मशिदीला एक नक्षीदार सुरेख असा कंदील बक्षीस दिला.

### गडबड

रावळपिंडीस दोन शीख कैद्यांनीं आपली सुटका करून घेऊन दोन बंदुका मिळविल्या व पहारेकऱ्यांना ठार करून ते बंदिखान्याचे बाहेर पडले. पुढें दोन उंटवाल्यांना जिवें मारून त्या उंटावर स्वार होऊन त्यांनीं कूच केलें परंतु त्यांना पुन्हां पकडून चांगल्या कडक शिक्षा दिल्या. यांच्या बंदुकीच्या अवाजामुळें सर्व पलटण तयार झाली व काय प्रसंग ओढवणार अशा भीतीनें सर्वांची एकच धांदल होऊन गेली होती.

### उपाय

एरंडेल तेल चामखिळीवर रोज एकदां या प्रमाणें ५–६ आठवडे चोळल्यास चामखिळी नाहींशा होतात.

### बेअब्रू

एका परसिव्हल नांवाच्या मास्तरानें रोमेशचंद्र दत्त यांची नालस्ती केली आहे. तो आपल्या शिष्य वृंदांना अगदीं उघड उघड असें सगतो कीं हिंदुस्थानचा इतिहास हा दत्त यांनीं न लिहितां कोणी त्यांच्या युरोपियन स्नेह्यानें लिहिला आहे व ते स्नेही एकाएकी मेल्यामुळें या पुस्तकांत इकडे तिकडे कांहीं तरी दुरुस्ती करून त्यांनीं आपल्या नांवानेंच तो इतिहास प्रसिद्ध केला आहे. बाकी इतिहास लिहिण्या इतकी कांहीं त्यांची विद्वत्ता नाहीं.

---

नोटीस

रा. रा. आत्माराम वल्लद सदाशिव वाढी रहाणार पिंपळोद तालुके दर्यापूर यांसः—

मी खाली सही करणार या लेखानें असें कळवितें कीं, माझें लग्न आपल्या बरोबर झालें व मी न्हातीधुती होऊन आज सुमारे ७।८ वर्षें होत आली. मी आपणापाशीं ५।६ महिनें होत परंतु आपल्या बरोबर माझी सुदी नांदणूक होईलसें दिसलें नाहीं. सबब मी आपल्या बापाचे घरीं जाऊन राहिले. ह्या ५।६ वर्षांत तुम्हांला माझी आठवणही झाली नाहीं. मग आपण मला चांगल्या रीतीनें वागवाल अशीं खात्री कोठून होणार? असो. आपल्याला माझी जरूर दिसत नाहीं व मात्र तर संसार झाला पाहिजे ह्मणून आपणास या नोटिशीनें मी फारकत मागते. नोटीस पोचल्या पासून ८ दिवसांचे आत मला फारकती देऊन मोकळे करावें. तसेंच ५।६ वर्षांचे माझे पोटगीचे पैसे देऊन टाकावेत. असें वरील मुदतींत न झाल्यास ही नोटिसच सोडचिठ्ठी समजून मी दुसरा संसार करीन मग आपला हक्क मजवर कसलाही चालणार नाहीं. व पोटगीच्या पैशाबद्दल फिर्याद करून नोटिशीच्या खर्चासुद्धा सर्वे रक्कम भरून घेईन. कळावें तारीख ५ माहे एप्रील सन १९०१ इ०

सही

गोपी मर्द आत्माराम वाढी हल्लीं वस्ती अंबोड ता० अकोट.

तर्फे मुखत्यार गंगाराम बापूजी पाटील कराळे वस्ती मौजे वाई ता० अकोट.


### जाहिरात

तुपे यांची उत्तम निळी काळी शाई एकदम ।।।- ची घेणारांस रोख रुपये ५०० २००,१००,५०,२५,१५,१०,५,२ किंवा ०।२ किं. चे पुस्तक यांतून एक बक्षीस प्रत्येकांस खात्रीनें मिळतें. शाई मागविणाराची ट. ह. सह ०।४ ची मनिआडर पोंचतांच त्याचें नांव रजिष्टरांत नोंदून ज्या नंबरी नांव नोंदलें असेल त्या नंबरास आधींच ठरवून ठेवलेलें बक्षीस आहे तें लगेच रवाना होतें.

पत्ता-- एम. जी. तुपे, पेठ गणेश घर नंबर ३३ पुणें

---

### मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मगें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एकहजा रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई बँक आकोला १५ जुलै १८९८ — A. G. Watson, Agent.

---

भारतवर्ष

### सर्वांसफुकट

( आबालवृद्धांना उपयुक्त मासिक पुस्तक. )

सनातन भारतधर्महापरिषदेच्या हेतूप्रमाणें धर्म—नीतिज्ञानाचा विस्तार, बोध व करमणूक हीं सुगम रीतीनें होण्याकरितां ‘मनोविमार्गगमंडळीच्या किंत्येक वर्षांच्या परिश्रमानें हें मासिक पुस्तक सुरू होणार. शके १८२३ च्या चैत्रापासून दरमहा निघणार.

या प्रथमवर्षींच हजार प्रतींस वर्गणीदार होईपर्यंत फुकट ! पुढच्या वर्गणीदारांना वर्षास टपालसहावर्गणी १ रु० ह्मणून मागविण्याची त्वकरा !

मुंबई—नवानागवाडा.

म्यानेजर.

आर्यभिषक्.


---

☞ हें आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळ फडके यांचे “वऱ्हाड-समाचार” छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं न प्रसिद्ध केलें.

REGISTERED M. No. 4

सहामाही „ ३ „ ८
साल अखेर „ ७ „ १ ८
किरकोळ अंकास ..........................४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.......... ८१ ०६
दुसरे खेपेस .... .... ....८१

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Six monthly......... 3 ............... 8 as
Single copy .................................4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...3 as

VOLXXXV AKOLA MONDAY 15 APRIL 1901 NO 14

वर्ष ३५ आकोला सोमवार तारीख १५ माहे एप्रिल सन १९०१ इ० अंक १४

## जाहिरात
### पुण्यांतील वक्तृत्वोत्तेजक मंडळी.

सन १९०१।१९०२ सालचा.
भाषणसमारंभ.

पुण्यांतील वक्तृत्वोत्तेजक मंडळीचा चालू सालचा भाषणसमारंभ रविवार ता० ५ माहे मे सन १९०१ पासून सुरू होईल. विषय व बक्षिसें खालीं लिहिल्याप्रमाणें ठेविलीं आहेत.

( २ ) विषय—तीन नेमिले असून त्यावरील सर्व भाषणें मराठींत व्हावयाचीं आहेत. इंग्रजी विषयाकरितां उमेदवार फार येत नाहींत असें दिसल्यावरून इंग्रजी विषय यंदा कमी केला आहे, तथापि बऱ्याच उमेदवारांचे ता० १० एप्रिलचे आंत अर्ज आल्यास इंग्रजी विषय नेमण्यांत येईल.

विषय पहिला— इंग्रजी साम्राज्याची ( Imperialism ) जी नवी कल्पना निघाली आहे त्यामुळें इंग्लंड, इंग्लंडच्या वसाहती व ताब्यांतील मुलूख यांचें एकीकरण कितपत व कसें होण्याचा संभव आहे व त्यामुळें इंग्रजी साम्राज्याची शक्तिमत्ता सर्व जगभर किती वाढणार आहे हें दाखवून तें घडवून आणण्यास या कल्पनेच्या पुरस्कर्त्यांनीं किंवा इंग्रजी मुत्सद्यांनीं काय उपाय किंवा साधनें योजावयास पाहिजेत तें सांगावें व ऐतिहासिक दृष्ट्या या कल्पनेचें थोडेसें परीक्षण करून अशा तऱ्हेच्या साम्राज्यात हिंदुस्थानासारख्या इंग्रजांच्या ताब्यांत असलेल्या परधर्मीय व भिन्नजातीय देशाचा कायमचा समावेश होण्यास काय काय केलें पाहिजे याचें वक्त्यानें विशेष विवेचन करावें.

विषय दुसरा—आलीकडे हिंदुस्थानांत जे दुष्काळ वारंवार पडत आहेत त्यामुळें हिंदुस्थानवासी लोकांची सामाजिकदृष्ट्या निकृष्ठावस्था उत्तरोत्तर जास्त कशी होत चालली आहे हें दुष्काळाच्या उदाहरणावरून साधारण दाखवून, विशेषतः दुष्काळानें अनाथ झालेल्या हजारों पोरक्या मुलांचें त्यांच्या त्यांच्या स्वधर्म राखून रक्षण होण्यास व त्यांस योग्य शिक्षण मिळून पुढें ते उद्योगधंद्यास लागण्यास आपल्या लोकांनीं व सरकारनें काय काय उपाय केले पाहिजेत तें सांगून सदर उपाय अंमलांत कसे आणतां येतील हें सांगावें व अशा तऱ्हेचे उपाय न झाल्यास त्यापासून कायमचें नुकसान काय आहे त्याचेंही थोडक्यात निदर्शन करावें.

विषय तिसरा.–खालीं लिहिलेल्या अभंगांचें विवेचन करणें:—

भक्ति तें नमन वैराग्य तो त्याग ।
ज्ञान ब्रह्मीं भोग ब्रह्मतनु ॥
देहाच्या निरासें पाविजे या ठाया ।
माझी ऐशी काया जंव नव्हे ॥
उदक अग्नि धान्य झाल्या घडे पाक ।
एकाविण एक कामा नये ॥
तुका ह्मणे मज कळतें चांचणी ।
बडबडीची वाणी अथवा सत्य ॥

### बक्षिसें व गुण

वरील तीन विषयांतून इच्छेस येईल तो ( एकच ) विषय घ्यावा. पहिले विषयास बक्षीस ३५ रुपयांचें एक व दुसरें २० चें कै० रा० ब० नानाशास्त्री आपटे यांचें. दुसऱ्या विषयास रु० ३५ चें एक. व तिसरे विषयास रु० ३५ चें एक व दुसरें रु० २० चें श्री० कै० यशवंतराव गोपाळराव मैराळ यांचें बक्षीस मिळण्यास १०० गुणांतून निदान ५० गुण आले पाहिजेत

कृष्णराव बापूजी मांडे,
रामचंद्र भास्कर पाळंदे,
पुण्यांतील वक्तृत्व मंडळीचे चिटणीस.

---

## जाहिरात

तुपे यांची उत्तम निळी काळी शाई एकदम ॥। ची घेणारांस रोख रुपये ५०० २००,१००,५०,२५,१५,१०,५,२ किंवा ८।२ किं. चें पुस्तक यांतून एक बक्षीस प्रत्येकांस खात्रीनें मिळतें. शाई मागविणारांचा ट. ह. सह ८।४ ची मनिआडर पोंचतांच त्याचें नांव रजिष्टरांत नोंदून ज्या नंबरी नांव नोंदलें असेल त्या नंबरास आधींच ठरवून ठेवलेलें बक्षीस आहे तें लगेच रवाना होतें.

पत्ता-- एम. जी. तुपे, पेठ गणेश घर नंबर ३३ पुणें

---

## मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तो दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं-

मुंबई ब्यांक आकोला १९ जुलै १८९८ } A. G. Watson Agent.

---

### नोटीस

जगन्नाथ कुसरीलाल कलाल रहाणार हिवरखेड तालुके अकोट यांस.

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं मिसरीलाल कलाल यांची ताजनापेठ पैकी जागा राजश्री लाला सितारास वल्लद लाला बाळभद्र अपकारी कंट्राक्टर राहणार नागपूर यांचे पासून आह्मी खरेदी घेतली आहे. त्याच जागेंत हल्लीं राहणारे भाडेकरी लोकांस तुह्मी भाडें देऊं नका असें त्यांना सांगितलें आहे. व त्या जागेंत रिकामें असलेल्या कोठड्यांत तुह्मी आपले मुखत्यारीनें दोन कोठड्यांत भाडेकरी आह्मास न विचारतां ठेविलें आहेत. असें ते लोक कळवितात. तर आपण त्या जागेंतील भाडेकरी लोकांस चिथविल्या वरून ते हल्लीं भाडें देत नाहींत त्यापासून जें नुकसान होईल तें तुह्मांपासून कायद्या प्रमाणें भरून घेण्याची तजवीज करण्यांत येईल. तुह्मी या जागेंत माल किंवा भाडेकरी ठेवाल तर तुह्मावर फौजदारी करण्यांत येईल. तुमचा कांहीं हक्क संबंध असेल तर तो तुह्मी दिवाणी कोर्टांतून शाबीत करून घ्यावा. या नोटिशीचा खर्च व इतर नुकसानी मिळून एकंदर रक्कम दिवाणींत फिर्याद करून वसूल करण्याची तजवीज केली जाईल. कळावें. तारीख ४ माहे एप्रील सन १९०१ इसवी.

सही
रा. ब. मुकुंद बाळकृष्ण बुटी नांवच्या दुकानचे मालक गोपाळ मुकुंद बुटी तर्फे मुखत्यार सदाशीव सिताराम दस्तुर खुद्द आकोला

---

## मोरोपंत

( मागील अंकावरून पुढें )

पुढील पद्यें " मूर्तिमंत आल्हाद " हेंच द्रव्य घेऊन रचिलीं आहेत ! असें भासल्या वांचून राहणार नाहीं.

( विरहिणी स्त्रियांच्या अवस्थेचें वर्णन, किंवा रेखिलेलें चित्रच. वज्रनाभदैत्यकन्या प्रभावती इचे उद्गार. एकच आर्या. )

हरिवंश, अध्याय ३६

झालें मुख शुष्क; हृदय,
उत्सुक; सखि ! तापलीं पहा अंगें ॥
कोण अनौषध गदे हा,
दाह अधिक शीत—वस्तुच्या संगें ॥ ४८ ॥

( बाणासुराची कन्या ऊषा इच्या विरहावस्थेचें वर्णन. पार्वतीच्या वरा प्रमाणें पतिप्राप्तीची इच्छा करीत असतां– )

अध्याय ४१

न निजे जेवी सेवी,
न जळाहि तांबूलही न ती चावी ॥
पाण्डुत्वातें देह,
प्रतिपळ अतिशक्तिहीन तीचा वो ॥ ४९ ॥
निंदी शीतें--करातें,
सेव्याहि वाटे तिला असेव्य जन ॥
आर्द्रहि न लगोचि ह्मणे,
भाजितसे तापलें असे व्यंजन ॥ ५० ॥
माता धांवुनि आली,
प्रिय कन्येतें विलोकिती झाली ॥
चिंतीं बहु ती भ्याली,
घर्मांच्या अश्रुच्या भरें न्हाली ॥ ५४ ॥
आलिंगी कुरवाळी,
... ती सुता न वदे ॥
दावी चिकित्सकांला,
तीस परम भयें तिचें सुतानव दे ॥ ५५ ॥
पटु वैद्य वदति देव,
स्वस्थ रहा ईस लागली दृष्टी ॥
कीं अति सुंदरपण हें,
न असें अन्यत्र शोधितां सृष्टी ॥ ५६ ॥
अभिषेक करा उतरा,
सर्षप लावा मुलीस आंगारा ॥
सांगा राम-कवच-मनु--
पाठ सुधा जवळि असुनि कां गारा ॥ ५७ ॥
वदल्या चतुरा नारी,
केला देहीं प्रवेश तारुण्यें ॥
पाति शीघ्र उषेसि मिळो,
पितृ-वात्सल्यें महेषे-कारुण्यें ॥ ५८ ॥

( तिला स्वप्नांत पतीची प्राप्ति होते )

त्या उपरि भगवंतीनें,
कथिल्या काळीं उषा सखी-सहिता ॥
निज-हर्म्य-वरी निजली,
स्वप्नीं पाहे तसेंचि ती महितो ॥ ५९ ॥
देवी-वर-सामर्थ्यें,
अतुळें नागोत्तमें जसी नागी ॥
स्वप्नीं स-भोग-चिन्हा,
पुरुषवरें होय भोगिली जागी ॥ ६० ॥
झाले ते नव-संगीं,
होतात विकार भोगिलीला जे ॥

---

१ औषध नाहीं असा. २ रोग. ३ प्रसवे ४ चंद्र ५ पंखा. थंडा वारा घालीत असतांही अंग पोळतें असें ह्मणे. ६ अति कृशत्व. ७ मोहऱ्या. ८ थंड, गार निरुद्योगी. ९ शिव प्रसादानें. १० पार्वती. ११ मंदीर. १२ पूज्या. १३ हस्ति. १४ हस्तिनी.

कुल-दूषण मानी, मी,
प्रबळ-विरें जीव भोगिली लाजे ॥ ६१ ॥
कुंभाण्ड सुता रामा,
तीस म्हणे सखि धरूं नको ताप ॥
घडतां स्वप्नीं संग,
स्त्री नाहि पुरुषासही नसे पाप ॥ ६२ ॥
स्मरें [११] वरें [१२] सखि ! आखिलेश्वरें, --
वृयिता वदली तसेंचि हें घडलें ॥
जडलें कंठीं चिंता [१३] --
रत्न क्लेशांत हृदय कां पडलें ! ॥ ६३ ॥

(स्वप्न-प्राप्त प्रियतमाच्या शोधा करितां प्रधानकन्या चित्रलेखा इला पाचारून आणिलें. तेव्हां चित्रलेखा म्हणालीः—

देवीं [१४] तीस म्हणे सखि!
हें कार्य अशक्य कीं न, कुल, शील, ॥
देशहि, लोकहि, ठावा,
पारि विरहे तूं उरांत उलशील ॥ ७० ॥
या करितां लिहितें मी,
त्रैलोक्या मानि पुरुष जे महित [१५] ॥
सुर दानव यक्षोरग,
राक्षस गंधर्व मानवां सहित ॥ ७१ ॥
पारि दिवस चित्र-पट्टीं,
लागतिल मला लिहावया सप्त ॥
पाहुनि पावसिल प्रिय,
तोंवरि तव मन उषे न हो तप्त ॥ ७२ ॥
प्राप्त-सुखा [१६] वदलि उषा,
तुज जन परिपक्व [१७] शील हें [१८] याचें ॥
स्मरण असो दृढ [१९] मति ति,
[illegible] लिहावयास ॥ ७३

( तिने चित्रपट लिहून आणिला )
देव [illegible] दि सुपरुष,
जे चित्रपटांत रेखिले होते ॥
सादर सर्व उषेनें,
बळलाग्या दृष्टि देखिले होते ॥ ७६ ॥
(अनिरुद्धास ओळखून, )
वदली स्मित करुनि उषा,
रतितस्कर हाच साच जाणावा ॥
सखि कोणाचा कोण,
[illegible] नीं त्या प्रथम नीट आणावा ॥ ७७ ॥

---

१० स्मरण कर. ११ वरदान. १२ शिवस्त्री पार्वती. १३ चिंतामणी नांवाचें रत्न १४ चित्रलेखा १५ पूज्य १६ सुख प्राप्त झालें अशी १७ हे सखि १८ उषा. १९ बुद्धिमति.

---

वऱ्हाडसमाचार

---

मिती चैत्र वद्य ११ शके १८२३

---

लोकस्थिती असमाधानकारक आहे आणि या गोष्टी विषयीं वादही राहिलेला नाहीं. असमाधान वाटण्याचा मुख्य कारण असें कीं लोकांची गरिबी व आपदा वाढत आहेत, उत्तरोत्तर त्यांचे पाय बुडतीकडच खोलांत जात आहेत आणि या विपदा कधीं काळीं सोडतील अशी आशा वाटण्या सारखा कोणताच उन्नतीचा मार्ग डोळ्या समोर नाहीं. मनुष्याचे विचार कुंठतात व त्याची गती बंद होते तेव्हां त्याची निराशा झाला अगदीं नाहींसा करून सोडते. विपदा दूर करितां येतील अशी आशा असली म्हणजे कोणी डगमगत नाहीं. परंतु तो आशेचा तंतू तुटला म्हणजे मात्र मोठा कठिण प्रसंग असतो. तसाच कठिण प्रसंग या देशावर आला आहे. लोकांच्या संपदा वाढल्या व त्यांचीं सुखें बहुगुणित झालीं असा सरकारी अभिप्राय आहे पण प्रत्यक्ष गोष्टी आमच्या डोळ्या समोर खेळतात म्हणून आम्हांस हा अभिप्राय वस्तुतः चुकीचा वाटतो गेल्या दुष्काळानें लोकस्थितीचें खरें चित्र निदर्शनास आणिलें आणि तेव्हां पासून यमराजाचा विक्राळ जबडा लोकास भेदरून सोडीत आहे. असा हा भयंकर देखावा पुनः दृग्गोचर होऊं नये म्हणून सर्व बाजूंनीं लोकांचे प्रयत्न चालू आहेत. लोकांचे प्रयत्न दूरदर्शिपणाचेच असतात. बेताबातानें राहून पुढील काला साठीं काहीं तरी बेगमी असावी असा जो तो विचार करितो. पण सुकाळ आला तरी ज्या लोकांच्या अर्धी लोकांनें फक्त पोट भागतें ते आजचा दिवस लोटण्या पलिकडे उद्यांचा तो विचार काय करणार आहेत हे उक्त रितीनें [illegible] विकट असतात. त लोकांच्या दूरदर्शिपणानें टळण्या सारखे नसतात. गेल्या दुष्काळांत मानवी दैन्याची जी परमावधि झाली आणि सर्व जो एकच हाहाकार झाला त्याला कारण धान्याचा अभाव होता असें नाहीं धान्याचा सुकाळ विपुल होता पण लोकांच्या पाशी पैशाचा दुष्काळ होता. व तसाच रोजगाराचा मोठा दुष्काळ होता. लोकांच्या संग्रहीं पैसा नाहीं आणि कामधंदाही उपलब्ध नाहीं असा दुहेरी दुष्काळ होता.

या दुष्काळाच्या विपत्तींतून सुटका होण्याला उपाय पंचविध आहेत आणि ते पांचही उपाय एका समयानें प्रचलित झाले पाहिजेत अशा विषयीं नामदार राय श्रीराम बहादूर यानीं कायदे कौंसिलाच्या बैठकींत सुंदर प्रतिपादन केलें आहे. हे पांच उपाय असे:—

( १ ) दुष्काळाचा प्रादुर्भाव होतांच तगाईचा पैसा रयतेला पुष्कळसा मिळाला पाहिजे.
( २ ) औद्योगिक शिक्षणाच्या शाळा.
( ३ ) शेती विषयक शिक्षणाच्या शाळा
( ४ ) शेतकऱ्यांच्या पेढ्या
( ५ ) सारा माफक पाहिजे. तो कायमचा धारा असावा किंवा निदान एक जमाबंदी पुष्कळ वर्षे चिरस्थायी व स्थीर पाहिजे.

इंडिया सरकारची व्यवस्था दयाळूपणाची आहे व उदारबुद्धीची आहे. दुष्काळ येऊन धडकला म्हणजे सर्व जग आचंबयानें थक्क करून टाकण्या इतकी अद्भुत शक्ती आमचे सरकार दाखवितात. आमचे सरकार म्हणजे कृपाघन आहेत आणि दुष्काळा सारख्या आपत्तींतही ते आपल्या सुकार्यानें इश्वराला आपलासा करितात. परंतु भावी दुष्काळ येणार नाहींत किंवा अवर्षणानें तो आलाच तर त्याच्या विपदा कमी होतील अशा विषयीं सरकारच्या कायमच्या योजना काहींच नाहींत. अवर्षण सालोसाल पडत नाहीं; आणि आमचा जनसमूह सुखी व सुसमृद्ध असला तर तो दुष्काळाची मोठीशी फिकीर करणार नाहीं. परंतु सुखसंपदाला लोक विन्मुख कायमचे झाले आहेत आणि म्हणूनच दुष्काळाचें उग्रतर स्वरूप पराकाष्ठेचें उग्र होतें. संपदा परत येऊन सुस्थितीस पोचण्याला लोकांसाठीं औद्योगिक शिक्षणानें द्रव्यार्जनाचे मार्ग खुले केले पाहिजेत, शेतकीचा उद्योग उत्कृष्ठ स्थितीला आणून शेतीचा कल्पवृक्ष बनविला पाहिजे, नवीन पेढ्यानीं शेतकऱ्याच्या गरजा स्वल्प व्याजात भागल्या पाहिजेत आणि सारा माफक, कायमचा किंवा चिरकालीन करून शेतीचा उत्कर्ष होत गेला पाहिजे. वरील सर्वही उपाय राजानें योजण्याचे आहेत. प्रजेच्या हातच्या या गोष्टी नाहींत तथापि राजाची अनुकूलता होईपर्यंत देखील लोकसमूहानें वरील उपायांच्या प्रकाशानें आपला भावी मार्ग सुधारला पाहिजे.

---

हिंदुस्थानचे फडणिस सर एडवर्ड ला व नामदार आनंदा चार्लू या उभयतां मध्यें एक मोठा वाद पडला आहे. तो वाद आपल्या देशाच्या स्थिती विषयीं आहे. सर ला हे आपल्या बजटात प्रतिपादन करितात कीं इंडिया पूर्ववत् सुसंपन्न होऊं लागला आहे आणि दुष्काळाच्या चक्रांतुन सुटल्या नंतर या देशाची गती पुन्हा सुखसमृद्धीकडे वळली आहे. या विधानाच्या समर्थनासाठीं ते उत्पन्नाचे काहीं आकडे पुढें करितात. सर ला म्हणतात कीं १९००-१९०१ साली मिठाचें उत्पन्न १६ लक्ष रुपयानीं वाढलें, स्टांपाचें उत्पन्न पूर्व अंदाजा पेक्षा अधीक आलें, अबकारीच्या उत्पन्नात वाढ आली, जकातीची रकम २८ लक्षानीं अधीक वसूल झाली, पोस्ट आफिसाचें, तारायंत्राचें व इतर काहीं बाबींचें उत्पन्न वाढलें; या उत्पन्नाच्या वाढीच्या गोष्टी देशाची सुसंपन्नता दर्शवितात व लोकांची आबादानी असल्या खेरीज हीं उत्पन्नें वाढणार नाहींत. या अभिप्रायावर नामदार आनंदा चार्लू यांचा आक्षेप असा आहे कीं लोकांच्या पिशव्या चांगल्या गरम व भरल्या असल्या म्हणजेच वरील उत्पन्नें वाढतात असें समजणें चुकीचें आहे. रेलवे, पोस्ट आफिस, व तारायंत्र याचें उत्पन्न वाढण्याला कारणें आगंतुक असून दुष्काळातही या उत्पन्नाची वाढ मोठी असते. आतां मीठाचें उत्पन्न व जकातीचें उत्पन्न हीं देशाची संपत्ति दर्शवितात कीं काय हें पाहूं. मीठ हा पदार्थ काहीं इतर पदार्था प्रमाणें भराभर खाण्याचा नाहीं. मीठ हें द्रव्य इतर पदार्थांस स्वाद व गोडी देणारें आहे; आणि याच दृष्टीनें मिठाचा खप होत असतो. मीठ हें जर मनुष्याच्या अन्नाचा मुख्य व स्वतंत्र पदार्थ नाहीं तेव्हां मिठाचा खप पुष्कळसा होऊन सरकारी उत्पन्न वाढलें ही गोष्ट काहींच सिद्ध करीत नाहीं. दुष्काळाच्या वेळीं लोकांस मीठ अधीक खाण्यांत आलें असेल किंवा दुसरी एखादी गोष्ट उत्पन्न वाढण्याला कारणीभूत झाली असावी.

जकातीचें उत्पन्न वाढलें याचा अर्थ नामदार आनंदा चार्लू एवढाच घेतात कीं जकातीचें उत्पन्नावरून लोकांच्या उपयोगांत जकातीचे पदार्थ अधीक आले असें खरें पण त्या वरून लोकांपाशी पैसा अधीक झाला याची ही खूण नाहीं. सरकारी कायद्याच्या जबरदस्तीनें जकातीचा पैसा वसूल होतो म्हणून तो रयतेची संपन्नता शाबित करीत नाहीं. सराफ्यांत भारी व्याजानें कर्ज काढणाऱ्या माणसाला द्रव्यवान समजावा, किंवा घुशी, व उंदीर फार दृष्टीस पडले म्हणून धान्याचीं कोठारें धान्यानें विपूल भरलीं आहेत असें मानावें या दोन्हीं अनुमानांत जेवढी चूक आहे तेवढीच चूक जकातीच्या उत्पन्नावरून लोकांची संपन्नता ताडण्यांत होणार आहे. या अनुमाना संबंधानें सर एडवर्ड ला म्हणतात कीं लोकांनीं कायद्याच्या जलूमामुळें जकात भरली व अधीक वस्तु उपयोगांत आणिल्या ही गोष्ट संभवतच नाहीं. इंडिया सारख्या मुलूक राष्ट्रांत साध्या निर्वाहाच्या वस्तु जकातीशिवाय मिळतात आणि गरीब मनुष्य जकातीच्या वस्तूंकडे फारसा पाहणार ही नाहीं. त्या अर्थीं जकातीचें उत्पन्न वाढलें म्हणजे लोक अधीक सुखी झाले असें निदान होतें. [illegible] दोन्हा पक्षाचें म्हणणें आम्ही वाचकापुढें मांडिलें आहे. आमचे वाचक या संबंधानें काय म्हणतात हें पाहण्याचा आमचा विचार आहे म्हणून आम्ही आपला अभिप्राय तूर्त बाजूला ठेवितों.

---

## सवलत

सरकारी सारा वसूल होत आहे ही समाधानीची गोष्ट होय. पण यंदा पीक चांगलें आलें आहे या गोळाबेरजेच्या दृष्टीनें साऱ्याच्या बाबदींत निकाल व्हावा असें आम्ही इच्छित नाहीं. आमच्या पाहण्यांत अशीं उदाहरणें आलीं आहेत कीं रबीच्या पेरणीच्या सुमाराला व त्या नंतर जे गारपिटीचे पाऊस झाले त्यांनीं कित्येक शेतातील पिकांना अगदीं फन्ना उडविला आहे. दुष्काळाचें खडतर वर्ष संपल्या नंतर गारपिटीच्या माऱ्यामुळें ज्यांची शेती बुडाली त्या लोकांस बारीक चौकशीनें सरकारातून योग्य सवलती मिळाल्या पाहिजेत. सरसकट गुडघाभर पाणी असा हिशोब लागूं करूं नये म्हणून आम्ही गेल्या गारपिटीच्या नुकसानीची गोष्ट सरकारच्या नजरेपुढें मुद्दाम आणित आहों. गेल्या दुष्काळांतील लोकांची आपत्ति सरकारानें ध्यानांत घ्यावी आणि यंदाच्या पिकाच्या नुकसानी नजरेस येताच साऱ्याच्या सुटीचे व तहकुबीचे हुकूम सरकारानें अगोदर सोडावयाचे होते परंतु विलंब झाल्या नंतरही सत्कार्य घडलें तरी तें नासत नाहीं आणि लोकावर मोठा उपकार होतो असें आम्ही मुद्दाम सूचवीत आहों. दुष्काळा सारख्या प्रसंगा नंतर सरकार आपली नवी जमाबंदी अमलांत आणणार

नाहीं व कांहीं वर्षें पर्यंत नवीन दराच्या सान्याची तहकबी होइल अशी आह्मास मोठी आशा होती पण ती सफळ होण्याचा सुसमय कधीं काळीं येईल असेंही आह्मांस प्रस्तुत वाटत नाहीं सरकारच्या अंमला पुढें लोक जेरीला येतील आणि निरुपायानें नवीन धान्या प्रमाणें रकमा वायद्याच्या वेळीं कशा तरी भरतात हें सरकारानें विसरतां कामा नये.

## The Berar Samachar

MONDAY APRIL 15 1901

It was really an excellent beginning of a great and noble work when, on the 6th of March, a general public meeting was held in the Town Hall to collect subscriptions for the Victoria Memorial Fund. That day Mr. Rustumji was in chair and the list of the voluntary subscriptions was, to the joy of us all, very weighty and promising. The subject of contributing to the fund was welcome with a hearty response. And liberal subscriptions were promised on the very spot itself. The whole meeting promised a great success and we had no apprehensions to declare in our Marathi columns that the Victoria Memorial Fund of this district would be well worthy of its historical traditions, the loyal feelings and the sacred memories of the late august Empress of India.

But as an evil chance may have it, a very dark cloud stealthily shot up from the blue horizon to completely overshadow the clear sun-shine of the public spirit. We learn with great surprise that the figures of subscriptions are to be cut down 50 per-cent. but why and wherefore we cannot conceive. This has, to our knowledge, no sanction and a thing done at a public meeting cannot be shifted or set aside in such a secret manner.

We do claim the best intentions for the authors of this benevolent piece of charity. We do not, however, like this private way of undoing the acts done in a public meeting. Nor do we know of any requisition from the subscribers for such a reduction. Some people who, out of their generous nature, have voluntarily subscribed more than they could conveniently pay out of their small pockets, may inwardly grumble a little to fulfil their promised quota, but even they would shrink back from expressing their willingness to reduce the amount. They would, on the other hand, have a worthy pride in paying up the full subscriptions and thus discharging the debt which no law can enforce but which the pleasures of conscience can alone appreciate. We do not doubt that there are very good motives in the idea of curtailing the promised subscriptions, and it may be an attempt to reduce to the minimum the social pressure we every day exercise on one another when we think of starting a fund of public utility. We have, however, no reason to suppose that any unfair or impolitic demand is pressed upon the members of the meeting. Our experience runs counter to the above misgivings and doubtings of the heart which gave rise to the act of reducing the subscriptions. We know, as a matter of fact, that every gentleman who attends a memorial meeting goes there with a free conscience to subscribe to the fund. Analyse the human heart and you will find that a kind word appeals powerfully to the heart and it is for this reason that at the 2nd. National Congress at Bombay that the honorable Mr. Surendranath Banarji could collect the vast and wonderful sum of 45 thousand rupees in one sitting. The congress fund was only a national one but here the memorial fund is both an imperial and a national one. There is every sanctity of purpose and loyalty of heart that will move people to subscribe liberally towards the fund. The curtailments of subscriptions at Akola are more objectionable as an example. We see that a vein of putting down low figures, is running through all subsequent collections. It is more for the subsequent effects that we have taken the trouble of condemning the bad principle which is set in motion in this district in a simple matter of collecting charity subscriptions. We could go further and say that in a public business a little itching and teasing is necessary to induce people to do a public duty which all are at liberty to omit without the least inconvenience.

Emulation is a nice virtue. It often owes its greatness to a social influence, mutual pleasures and moral pressure. Emulation in donations is a rare thing. The home of charity is like a sacred temple and we must do our level best to induce people to visit it by a personal example. We should not hesitate to use a little pressure when the aims are noble and benevolent. The commemoration of the good name of the Queen and the foundation of a technical school are the great objects towards which the fund is to be spent. If for such a purpose as this the public support lacks in the tangible payment of liberal donations we do not hope to achieve any good object worth the name. Let us be ever firm and resolute and show to our friends and brothren that this is the time for us to join hands and to open our purse in an ünstinted manner.

## वऱ्हाड

हवामान— उष्मा फार होता. ऊन अती प्रखर पडतें. रोगराई उत्तरोत्तर कमी कमी होईल असा रंग दिसता.

मे० प्रीडे साहेब हे रजेवरून परत येऊन वाशिमास डेपुटी कमिशनरचे जागीं रुजूं होण्यासाठीं गल्या गुरुवारीं यथून गेले.

रा. रा. रामचंद्र नारायण देशपांडे बी. ए. ए० असि० कमिशनर हे येथील स्मालकाज कोर्टाचें काम पाहूं लागले.

आणि त्यांच्या सब जज्जाच्या कोर्टावर रा. रा. रंगनाथ विष्णु डाकप आफिशिएटींग एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर हे उमरावतीहून येऊन येथें गेल्या बुधवारीं रुजू झाले.

गेल्या बुधवारीं आकोल्यास दरबार भरला होता आणि ह्या वेळीं मे. कुमार श्रीहरबानजी रावजी, डिपुटी कमिशनर यानीं दुष्काळांत ज्या गृहस्थांनीं सरकारास चांगली मदत केली त्यांपैकीं कांहीं जणांस अभिनंदनपत्रिका वाटल्या. पढील अंकीं या मानाला पात्र ठरलेल्या सर्व लोकांची नामावळी देण्यांत येईल.

आजपासून आकोल्यास सेशन कचेरी भरणार आहे.

औरंगाबाद (डेकन)
ता. १२ ४-०१

हवामान—उष्मा कांहीं दिवसापासून कडक भासूं लागला आहे. प्लेग या जिल्ह्यांतून अगदीं नाहींसी झाली. किरकोळ आजार ताप वगैरे तुरळक चालूं आहत.

रब्बीची धान्यें निजामगंज येथें विपूल येत आहेत पण भाव ह्मणण्यासारखा कांहींच उतरत नसून नवस, तेल आणि तूप वगैर जिन्नस फार माहाग झाले आहेत

तालुके बिजापूर व गंगापूर येथील पिकांस बहूत धक्का बसला. कहीं कांहीं खेडेगावांत पाण्याची टंचाई फार झाली आहे.

शिक्षा—नाम इब्राहीम खान रोहिल्या यास खोटें नाणें तयार करण्याची कांहीं दिवसापासून चटक लागली होती. नुकतेंच औरंगाबाद पोलिसानीं नाणें तयार करिते वेळेस यंत्रें व हत्यारें या सहित गिरफ्त करून अदालतींत चालान केलें. गुन्ह्याची शाबिती झाल्यावरून आरोपीस ५ पाच वर्षें सक्त मजूरीची शिक्षा दिली गेली.

हबीब साल्हे जमादार कोतवालीनें दंडाच्या वसूल आलेले रकमेंसंबंधानें लबाडी व बेइमानी केली होती आणि गणपतराव इन चार्ज यानीं गफलत व बेपरवाई दाखविली ह्मणून अनुक्रमें पहिल्यास कामावरून मोकूफ करण्यांत आलें व दुसरे गणपतराव यास २०८ दोनशें आठ रुपये जरीमाना (दंड) केला गेला.

सामना झाला— जिजाला नामक किल्यांत पुष्कळ लुटारू भील लोक जमा झाले होते. ही बातमी मौलवी मीर तहांनयत अल्लीखान साहेब मोहोतामेमे कोतवाली (पोलिस सुपरिटेन्डेंट) यांस समजल्याबरोबर त्यानीं जमीयते कोतवाली (पोलिस फोर्स) सहित भील लोकांसीं सामना केला. बहुतेक भील जखमी व केदी झाले.

नुकतेंच मौजे जौका हें गांव भीलांनीं लुटलें होतें मीर सा० मवसूफ यानीं तात्काल त्यांवर धावा मरून त्या लोकांची एक मोठी टोळी पकडून आणिली. या टोळी पैकी कित्येक लोकांस कैदेच्या शिक्षा झाल्या व होत हेत. या बाबतींत मीर साहेब खरोखर स्तुतीस पात्र आहेत यांत कांहीं संशय नाहीं.

रुजू झाले— नवाब हैदर अलीखान साहेब क्यान्टोन्मेंट माजिस्ट्रेट याची बदली वाशीम (वऱ्हाड) येथें झाली. याचे जागीं मि. एडवर्डस यांची नेमणुक झाल्या प्रमाणें ते येथें येऊन कामावर रुजू झाले.

वापस आले—४ चौथ्या घोडेस्वार पलटणीचे कमांडिंग आफिसर कर्नल एच. एम. मेशन आणि सदर पलटणीचे मेडिकल आफसर सर्जन लेफ्टनेंट कर्नल डाक्टर वार्ट ऐबट हे एका फौजदारी मोकदम्यात दुष्नम तालुकदार साहेबांचें अदालतींत साक्ष देण्या करिता येथून इंगोलीस गेले होते. ते या सप्ताहांत इंगोलीहून वापस आले व आपलें काम पाहूं लागले.

एक क्ष

## नोटीस

मि. कलुसिंग वल्लद बुलुसिंग शीख व अहमदखा वल्लद बहादरखा मुसलमान राहणार ताजनापेठ अकोला.

या उभयतांस:-

मी खालीं सही करणार अशी नोटीस देतो कीं तालुके मोर्तिजापूर यथील पिंगळे जहागिरींत माझा ५ आणे ४ पैचा हिस्सा आहे व तो हिस्सा माझ्या ताब्यांत आहे. आणि ताल मुल्लखा उर्फ गुलामहुसेन यांचाहि ५ आणे ४ पैचा हिस्सा आहे. त्यावर आमचा महाणाचा फैसला झाला आहे ह्मणून ह्या जहागिरींत १० आणे ८ पैचे आह्मी आतां हक्कदार आहों. आतां आह्मास असें समजतें कीं, ह्या जहागिरींतील काटवणाचें नंबर आमचे हिश्शांत तुह्मी खाजा नूरुल्लाखा जहागिरदार यांजकडून विकत घतले आहे. तर या नोटिशीनें असें कळवितों कीं आमच्या हिश्याचे काटवण तुह्मी तोडूं नये या उपर तोडल्यास योग्य कोर्टांत फिर्याद करून अखेर निकाल होई पर्यंत जें नुकसान होईल तें व काटवणाचे ६०० रुपये व शिवाय ह्या नोटिशीचा खर्च वगैरे सर्व भरून घेऊं. कळावे तारीख १२ माहे एप्रिल १९०१ इसवी.

सही (उर्दूंत)
शेख इब्राहीम वल्लद महमद
अमीर राहणार
आकोला.

## जाहिरात

सर्व लोकांस या लेखानें असें कळविण्यांत येते कीं; पिंगळे जहागीर, तालुके मोर्तीजापूर यथील आमच्या हिश्शाच्या जहागिरीतील काटवण कोणीहि मि. खाजानूरुल्लाखा जहागिरदार यांनकडून अगर दुसऱ्या कोणाकडून विकत घेऊं नये. जर कोणी आमच्या संमती खेरीज आमच्या हिश्याचें कांटवण कोणी विकील अगर कोणी विकत घेईल तर विकणारा व विकत घेणारा ह्या दोघा पासून आह्मी आमची सर्व नुकसानी भरून घऊं. कळावें तारीख १२ माहे एप्रिल १९०१ इ०

सही उर्दूंत
शेख इब्राहीम वल्लद महमद अमीर
रहाणार अकोला.

## वर्तमानसार

मांचुरिया तहा संबंधीं इतर राष्ट्रांची कुरकूर असल्यामुळें आपण मात्र सही करीत नाहीं, कारण इतर राष्ट्रांस नाखूष ठेवून एकट्या रशियाचें मित्रत्व संपादण्यांत कांहीं अर्थ नाहीं असें चीननें रशियास कळविलें आहे.

जपानांत दारू गोळा तयार करण्याची मोठी गडबड सुरूं आहे. जपानची चिनांतील फौज दिढीनें वाढणार आहे.

भोपाळच्या बेगम साहेब ५० वर्षांच्या आहेत तरी त्या इतक्या ठेंगू आहेत कीं आठ दहा वर्षांच्या मुली एवढ्या दिसतात.

फिलाडेलफिया येथें एका मनुष्यानें एका स्त्रीशीं शेक हॅन्ड केला व तो फार जोरानें केल्यामळें तिचा हात दुखावला. व याबद्दल तिनें फिर्याद लावून नुकसानी बद्दल २००० पौंड मिळविलें.

रशियातील एका ८४ वर्षांच्या बाईस एक जुळें झालें इतक्या म्हातार वयांत एकदम दोन पोरें कशी झालीं !

प्रेसिडेंट क्रूगर हे उजव्या व डाव्या दोन्ही हातानीं छान लिहितात. त्यास शाई पेक्षां शिसपेनसलीनें लिहिणें जास्त आवडतें.

अमेरिकेंत ६ हजा स्त्रिया वैद्यकी करितात. ४ हजार गवयांचा धंदा करितात ३ हजार ग्रंथ लिहितात. ३ हजार नटीचीं कामें करितात. ६ शें वकिली करितात, ४ शे स्त्रिया वर्तमानपत्रें काढतात व २ शे स्त्रिया इंजिनिअर आहेत. आपल्या इकडील स्त्रिया पाक निष्पती, बाजार हाट व मोल मजुरी करितात.

वाघ व सिंह यांचीं फुप्फुसें इतकीं नाजूक असतात कीं, त्यांच्याच्यानें मैल अर्ध मैलहि पळवत नाहीं; वाघ सिंह ते, तेच पळ काढूं लागले तर मग दुसऱ्यांनीं काय करावें?

वतनदार लोकांस मोजणीचें काम शिकविण्याचा सरकारचा विचार झाला आहे दरसाल २५ हजार रुपये प्रमाणें खर्च करण्याचे ठरविलें आहे. ह्या मोजणीच्या दोन तीन परीक्षा पास होणाऱ्याचे हक्क इतर वतनदारापेक्षां जास्त समजले जातील.

दिवड— दिवड हे प्राणी कृष्ण सर्पासारखे लांबलचक, काळेकुट्ट, आणि लठ्ठ असतात. व ते अगदीं अस्सल सर्पाप्रमाणें दिसतात. ते सर्पापेक्षां चपल असतात पण त्यापासून कांहीं भीति नसते. ‘ कितीहि झोडपली तरी दिवडे फडा करतील काय ’ अशी एक म्हण कोकणांत आहे. याचा अर्थ इतकाच कीं दिवड व भुजंग यांची जात अगदीं निर निराळी आहे दिवड ते दिवड आणि भुजंग ते भुजंग.

माक्झिमाईट नांवाची नवीन दारू एकानें तयार केली आहे. तिच्या गोळ्यानें एका सपाट्यासरशीं मोठ्या लढाऊ जहाजाच्या चिंधया करून टाकतां येतात.

नवीन टारपेडो बोट, पाण्याखालून दर तासास सुमारें ४०।५० मैल चालणारी अशी तयार केली आहे. व तिच्यामुळें दोनच मनुष्यें मोठ्या आरमाराचा धुव्वा उडवून टाकतात.

भामटा—लंडन येथील ब्रौनिंग नांवाच्या एका मेडिकल विद्यार्थ्यानें आपण फार आजारी आहों असा बहाणा करून दिवसेंदिवस जास्तच तबेत बिघडत आहे असा डाक्टराचा समज करून दिला. पुढें एके दिवशीं आपलें रूप पालटून त्यानें आपण ब्रौनिंगचा भाऊ आहों असें डाक्टरास सांगितलें व बिछान्यावर कपड्याचा एक मनुष्य करून ठेविला व ब्रौनिंग मेला अशी डाक्टरास वर्दी दिली. व त्याचें मृत्यूचें सरटिफिकीट घेऊन विमा कंपनीकडून पैसे काढण्याचा त्याचा विचार होता. पण डाक्टरसाहेब त्याच्या घरीं जाऊन पहातात तों सर्वच लबाडी बाहेर पडली. व त्यास ९ महिन्यांची शिक्षा झाली.

मत— कांहींच न वाचतां वेळ व्यर्थ घालविण्यापेक्षां नीरस पुस्तकें वाचणें चांगलें असें के० रानडे यांचें मत होतें.

अगदीं खरें—प्रसिद्ध फ्रांकलिन म्हणे कीं सरकारच्या कराबद्दल आपण फार कुरकुर करतों; पण ह्यापेक्षां आळसानें दुप्पट, गर्वानें तिप्पट, व मूर्खपणानें चौपट कर आपणांवर लादले आहेत त्याची वाट काय ? सरकारी कर द्यावेत व पण हे बाकीचे कर फारच भयंकर होत.

उत्तम देखावे—श्रीमंत सयाजीराव महाराज यांनीं बडोद्याच्या १८ प्रेक्षणीय स्थळांचे सुरेख देखावे लिंडे नांवाच्या एका युरोपियन चिताऱ्याकरवी रंगवून घेतले व ह्या कामगिरी बद्दल त्यांस ८ हजार रुपये दिले.

अभिप्राय—अभ्यास, वाचन, लिहिणें अशा प्रकारचीं बैठीं कामें करणारांनीं विडी कधींहि ओढूं नये. पण असेच लोक नेहमीं विड्या फार ओढतात यांस काय करावें ?

चमत्कार—दक्षिण आफ्रिकेंत एक ‘मक्षिकाकर्तरी’ नांवाचें लहानसें झाड आहे तें लहान लहान पांखरें मारून खातें. ह्यास दोन पानें असतात त्यावर माशा, सुरवंट किंवा फुलपाखरू बसलें कीं, तीं पानें मिटतात व ते प्राणी भक्षून झाल्यावर तीं पानें आपोआप उकलतात. पण एखादा बारीक खडा त्यावर टाकला तर तीं मुळींच मिटत नाहींत. सजीव व निर्जीव पदार्थ ओळखण्याचें ज्ञान ह्यांत ईश्वरानें ठेविलें आहे हा मोठा चमत्कार होय.

कान्स्टांटीनोपल येथील सोफिया मशीद बांधून आज १२ शतकें झालीं. पण तिच्यांत त्यावळीं घातलेल्या कस्तुरीचा सुगंध अद्याप चांगला येत आहे.

अमेरिका व जर्मनी हे दोन देश इंग्लंडास शत्रू उत्पन्न झाले आहेत. ह्यांच्या व्यापाराची इंग्लंडवर सरशी होत आहे. याचा योग्य बंदोबस्त वेळींच न झाला तर इंग्लंडचें व्यापारास जबर धक्का पोहोंचेल. इंग्लंडचे साम्राज्याचा मूळ पाया व्यापार आहे. व तो अस्खलित चालण्याकरितां इंग्लंड जर हिंदुस्थानास व्यापारधंद्यांत तरबेज करील तर हिंदुब्रिटिश साम्राज्यास कसलीच डर उरणार नाहीं. पण आमचें कोण ऐकतो?

इंग्लंडात महाराणी साहेबाच्या मृत्यूबद्दल अशौचदर्शक फीत वीस लक्ष रुपयांची खपली म्हणतात.

अमंगल वाद्यें.—हजिरीबाग जिल्ह्यांतील कांहीं मजुरांनीं वाद्यें वाजवीत देवाचें पूजन करण्यास आरंभ केला. तो कर्णकटु ध्वनी तेथील व्हाईट साहेबांच्या कानास सहन न झाल्यामुळें त्यांनीं दुसरीकडे जाण्याचा त्यांस हुकूम दिला. परंतु दुसरीकडेहि एक दुसरे साहेब त्यांस हरकत करूं लागले म्हणून त्यांनीं त्यास पकडून ठेविलें. हें वर्तमान ऐकून व्हाईट साहेबांस चीड आली व त्यांनीं त्या लोकावर गोळीबार सुरूं केला. दोघे मेले व त्या दुसऱ्या साहेबांसहि गोळी लागली. पोलीस चौकशी सुरू आहे. ज्या अर्थी वाद्यांनीं आह्मास व मुख्य गोऱ्या लोकांना पीडा होते त्या अर्थीं हीं वाद्यें अमंगलच होत, ही गांठ आपण आपल्याशी घालून ठेविली पाहिजे.

खरी गोष्ट—एक मुत्सद्दी म्हणत असे कीं थोर पुरुष हे अत्युच्च शैला प्रमाणें होत. त्यांचें मनोरमत्व कळण्यास त्यानपासून फार दूर अंतरावर जावें लागतें.

युरोपची अंतस्थ वाईट स्थिती—युरोप मध्यें अलीकडे फार दंगेधोपे होऊं लागले आहेत. आस्ट्रिया, स्पेन, मार्सेलीस येथें दंगे झालेच. आयर्लंडमध्यें अस्वस्थता वाढत आहे व तेथें लवकरच बंड होईल असें रिमेकाचें म्हणणें आहे. या सर्वांचें मूळ पोटाची आग होय.

युरोपांत हजारों लोकांचा उपासमार होतो. गरीब लोकांची दाद सरकार घेत नाहीं सबब त्यांनीं आपल्या निरनिराळ्या मंडळ्या व पंथ स्थापन केले आहेत. ते लोक स्वतः सिद्ध उद्योगी आहेत. सरकारकडे तोंड वेंगाडणारे नव्हेत, आपल्या मनगटाच्या जोरावर आपले पोट भरावें, कांहीं झालें तरी सरकारच्या बिलकूल उपयोगीं पडूं नये. सरकारची नोकरी करूं नये म्हणजे आपोआपच सरकारला आपली अन्नवस्त्राची सोय करणें भाग पडेल. अशा तऱ्हेनें सरकारास जेर करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. ईश्वरकृपें करून आमचें इंग्रज सरकार आह्मां गरिबांबद्दल अती काळजी वाहतें म्हणून आपण किती तरी सुखी आहोंत !

जर्मनी इंग्लंडचा फारच द्वेष करते. राणी साहेब आजारी होत्या तेव्हां जर्मनीचे बादशाहा तिला भेटण्यास गेले होते तें जर्मन लोकांस विषतुल्य वाटलें. आस्त्रियन पार्लमेंटमध्यें, बोअर लोक विजयी होवोत, व इंग्रजांचा पराभव होवो, असें उघड लोकांनीं बोलून दाखविलें.

टर्कीच्या पारतंत्र्यांतून आपली मुक्तता करण्यासाठीं म्यासिडोनियन लोकांचें बंड उद्भवलें आहे. बलगेरियन लोकांनीं या स्वातंत्र्यासाठीं जय्यत कडेकोट तयारी चालविली आहे.

नवा शोध–सोडिअम बाय आक्साईड नांवाच्या पदार्थांत आक्सिजन वायु बाहेर टाकून कारबानिक ग्यास मुरवण्याचा गुण आहे तर या द्रव्याचा उपयोग पाणबुड्यांनीं केल्यास त्यांचे करिता वरून शुद्ध हवा सोडण्याची जरूर रहाणार नाहीं.

उत्तय नियम–जर्मन सैन्यांतील प्रत्येक शिपायास पोहतां आलेंच पाहिजे असा नियम आहे. पोहण्याच्या कामांत इतके तरबेज आहेत कीं, नदी मधून शेंकडोशें यार्ड ते बंदूक वगैरे सामानासह सहज पोहून जातात. हाच नियम प्रत्येक राष्ट्रानें करावा.

युरोप शद्बाचा अर्थ–इरेब शद्बाचा युरोप असा अपभ्रंश झाला असावा. इरेब ह्यांचा अर्थ संध्याकाळ असा आहे. यावरून युरोपाचा अर्थ सूर्यास्ताची भूमि म्हणजे पश्चिम असा आहे.

नवीन यंत्र–डा० पाल मायकेल नामक एका फ्रेंच शास्त्रज्ञानें जखमी मनुष्याची कातडी व्यवस्थित रीतीनें शिवून टाकतां येईल. असें एक उपयोगीं हलकें यंत्र तयार केलें आहे.

सरकारचा ठराव—कलकत्याचे इंग्लिश्यून पत्रकर्त्यानें सरकारी बजेटचा सारांश बजेट प्रसिद्ध होण्यापूर्वीं दोन तास अगोदर दिला, म्हणून ह्यापुढें बजेटची प्रत पत्रकर्त्यांना अगाऊ मुळींच द्यावयाची नाहीं असा सरकारनें ठराव केला आहे.

स्त्रियाचें राज्य--रशियाचे राज्यांतील बेश्चिकोव्हिर्श्चना नांवाचे प्रदेशांत स्त्रियांचें राज्य असून त्यांचाच मान तिकडे पुरुषाहून जास्त आहे. सर्व अधिकारांचीं कामें स्त्रियाकरितात पुरुष घरसंसाराचे कामांत आपल्या इकडच्या बायका प्रमाणें राबत असतात. एक एक ऐकावें तें नवलच.

विचित्र मरण— मधुरा येथें एक बाई रात्रीं निजली असतां कांहीं अनिश्चित कारणानें तिचें डोकें आपोआप दुभंग होऊन तिला मरण आल्याची विपरित बातमी प्रसिद्ध झाली आहे. कोण दिवस येईल कसा। नाहीं देहाचा भरंवसा ॥

रक्ताचा पाऊस— आस्ट्रिया व इटली देशांत रक्ताचा पाऊस पडूं लागला आहे. क्यूम गांवीं लाल रंगाचा मातड पाऊस पडला. ग्यास्टीन येथें तांबडें व पिवळें बर्फ पडलें व नंतर तांबड्या रेतीचा वर्षाव झाला. आकाशाचा रंगहि कधीं कधीं पिवळा होतो. तुफान वादळामुळें मासे, रेती वगैरे उंच आकाशांत जाऊन त्यांचा पाऊस पडतो असा समज आहे. देवभोळे लोक पृथ्वीचा अंत होण्याचा समय जवळ आला आहे अशा भीतीनें हवालदील होत आहेत.

एरंड्याच्या झाडाची लागवड शेताच्या बाजूनें केल्यास शेतास कीड लागत नाहीं. घाटावर शेता भोंवती व शेतांमधून एरंड्याच्या पेरीत असतात शेतकऱ्यांनीं अनुभव घेऊन पहावा.

काबूलच्या अमिराच्या वतीनें इतके दिवस कोणी प्रतिनिधी इंग्लंडांत नसे तो, आतां यापुढें तेथें असावा असा महत्वाचा ठराव झाला आहे.

अनुभव पहावा—ज्या मनुष्यास वृश्चिक दंश झाला असेल ती दंशाची जागा शरिराच्या उजवे बाजूस असेल तर त्या मनुष्याचे डाव्या डोळ्यांत पाण्यांत भिजविलेल्या तंबाकूच्या पाण्याचे दोन थेंब सोडावेत आणि दंशाची जागा डाबी बाजू असेल तर तसल्या पाण्याचे दोन थेंब उजव्या डोळ्यांत सोडावे. दोन मिनिटांत हटकून विष उतरतें असें म्हणतात. तंबाखू ही मोठी औषधी वनस्पति आहे.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे “ वऱ्हाडसमाचार ” छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही „ २ „ ८८
साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ........................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत ८० १
दर ओळीस........ ८१ ८६
दुसरे खेपेस .... ........८१

Annual in arrears 7 ,, 1 Rs 8 as
Six monthly......... 3 ............... 8 as
Single copy ................................4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...8 as

REGISTERED N. No. 4


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR


VOLXXXV AKOLA MONDAY 22 APRIL 1901 NO 15

वर्ष ३५ आकोला सोमवार तारीख २२ माहे एप्रिल सन १९०१ इ० अंक १५



NOTICE

Wanted for the Khamgaon Municipality a fitter qualified to repair pipes, fittings and knowing carpentry and smithy work.

Salary Rs. 25 to 30. Apply to.

17/4/01 } (Sd.) F. L. Crawford
Chairman
Khamgaon Municipality.

### मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षात ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेव लेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं

मुंबई ब्यांक
आकोला १९ जुलै } A. G. Watson
१८९८ Agent.

### जाहिरात

तुपे यांची उत्तम निळी काळी शाई एकदम ॥।- ची घेणारांस रोख रुपये ५०० २००,१००,५०,२५,१५,१०,५,२ किंवा ८।२ किं. चें पुस्तक यांतून एक बक्षीस प्रत्येकांस खात्रीनें मिळेल. शाई मागविणारा बी. ट. ह. सह ८।४ ची मनिआडर पोंचतांच त्याचें नांव रजिष्टरांत नोंदून ज्या नंबरी नांव नोंदलें असेल त्या नंबरास आधींच ठरवून ठेवलेलें बक्षीस आहे तें लगेच रवाना होतें.

पत्ता-- एम. जी. तुपे, पेठ गणेश घर नंबर ३३ पुणें


नोटीस.

रा० रा० व्यंकटी साहेबु मारावार दुकान मौजे घाटंजी ता० केळापूर जि० वणी.

यांसः—

खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमची कर्जदारी मांझकडेस असल्या ... मी मौजे आंमडी ता० केळापूर जि० वणी येथील माझे नांवचें असलेलें शेत सर्वे नंबर ५९ तुमचे कर्जदारींत ४ चार वर्षें पर्यंत वहितीस देऊन तुमचें कर्जाची फेड केली ती अशीः--पूर्वीचे साध्या दस्ताऐवजाचे रकमेंत ३ वर्षें व मागाहून माझे नांवचे असलेलें शेत सर्वे नंबर ९९ गहाण लिहून देऊन घेतलेल्या कर्जदारींत १ एक वर्ष या प्रमाणें ४ वर्षें तुमचें ताब्यांत शेत देऊन एकंदर तुमचे कर्जाची आदाई केली. हल्लीं मजकडेस तुमचा पैसा घेणें राहिला नाहीं सबब तुमचे ताब्यांत दिलेल्या शेताची साल मजकूरचे संवत्सर प्रतीपदेस मुदत संपली. यावरून नोटिशीनें कळवितो कीं एकंदर पैशाची आदाई झाल्याबद्दल रसीद एक आण्याचें टिकीट लावून तुमची सही करून मला द्यावी व तसेच माझे शेत माझे ताब्यांत ही नोटीस पावल्या पासून ८ दिवसाचें आत द्यावें. जर करितां तवें न कराल तर आपणा पासून साल मजकुरीं १०० शंभर रुपये मक्ता घेतला जाईल. पुढें तुह्मी कोणत्याही प्रकारची तक्रार केल्यास मी ऐकणार नाहीं.

या मजकूरची या पूर्वींच ता० २ माहे ४ सन १९०१ इसवी रोजीं पोस्टद्वारें नोटीस रजिष्टर नंबर ७६ ची केली होती ती आपण वापस केली सबब ही नोटीस प्रसिद्ध करून आपणास कळविलें आहे. या नोटिशीचा खर्च जो होईल तो व पूर्वींचे नोटीशी बद्दल खर्च ८=॥ साडे तीन आणे तुमचे जवळून घेतला जाईल. आज जें माझें शेत तुमचे ताब्यांत आहे तें दुसरे लोक १०० रुपये मक्त्यानें करण्यास तयार आहेत. सबब नोटीस पावल्यापासून मुदतीचे आंत आपण नोटिशींतील मजकुरा प्रमाणें खुलासा न केल्यास तींतील मक्ता आपणास कबूल आहे असें समजून मी स्वस्थ राहीन व मक्याचे रुपये रीतिप्रमाणें पिकावर ह्मणजे जानेवारी ता० १५ सन १९०२ रोजीं आपणापासून घेईन व आपली कोणतीहि तक्रार ऐकणार नाहीं, कळावें तारीख १२ माहे एप्रील सन १९०१ इसवी.

सही
देवीदास नारायण
काशीकर दस्तुर
खुद्द.

### नोटीस

रा० रा० चंदु वल्लद विठोबा थोटे राहणार गायगांव तालुका बाळापूर.

यांस.

या नोटिशीनें कळवितों कीं तुह्मास मी तारीख ८।४।१९०१ पासून माझ्या कूलमुखत्यारी वरून काढून टाकलें आहे. तुह्मास तोंडी कुलमुखत्यारीच्या संबंधाचे सर्व कागदपत्र व हिशोब मागितले असतां तुह्मी ते दिले नाहींत तर ही नोटीस पावतांच आठ दिवसांच्या आंत मागील जुन्या व्यवहाराचा चुकता उलगडा करून टाकावा, तसें करण्यास चुकल्यास त्याची जबाबदारी सर्व प्रकारें तुह्मावर राहून इतर होणाऱ्या नुकसानी सुद्धां तुह्माकडून सर्व हिशोब कोर्ट मार्फत चुकता करून घेण्यांत येईल, कळवें. तारीख १७ माहे एप्रील सन १९०१ इसवी.

( सही )
गणेश गड्याजी दस्तुर खुद्द.

### जाहिरात

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं चंदु वल्लद विठोबा थोट राहणार गायगांव तालुके बाळापूर यांस मी माझ्या इस्टेटीच्या व्यवस्थेसाठीं व इतर तत्संबंधी कामा करितां कुलमुखत्यार नेमिलें होतें. त्या कुलमुखत्यारीवर या पुढें मला त्यास ठेवण्याचें नाहीं मी त्याची कूलमुखत्यारी काढून घेतली आहे; आणि या उपर त्यांच्याशी कोणीही माझ्या संबंधानें देवघेव किंवा अन्य व्यवहार करूं नये. जर कोणी तसा व्यवहार करील तर त्याची जबाबदारी माझ्या शिरावर नाहीं. ज्याचा तो जबाबदार राहील. कळावें. ता० १७ एप्रील सन १९०१ इसवी.

सही
गणेश गड्याजी वस्ती
गायगांव द० खु०

नोटीस.

भगवान वल्लद लक्ष्मण केदारे जात तेली राहणार पातुर शेखबाबु ता० बाळापूर जि० आकोला.

यांस.

खाली सही करणार हिजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तूं माझा लग्नाचा नवरा असून लग्न होण्यास सरासरी २० वर्षें झालीं. व आपला दोघांचाहि संसार ठीक चालला होता. पण आज सहा वर्षें तूं मला घेऊन जात नाहींस. तरी मध्यंतरी मी ३-४ वेळां तुझे घरीं आलें पण तूं मला फुकट विचारलें हि नाहींस. याजकरितां मी आज ६ वर्षें माझा मावसभाऊ गणु तेली राहणार जानेफळ याचे घरीं राहून त्यानपासून माझे आणि मुलाचे पोटा करितां कर्जाऊ रुपये काढून निर्वाह करीत आहे. त्याचें एकंदर दोन दुष्काळासुद्धां देणें ४५० रुपये, व त्याचें व्याज इतके देणें आहे. आतां तो मजला माझेकडे फार रुपये झाल्यामुळें खाण्यास काहीं देत नाहीं. मध्यंतरी माझे मावस भावानें व आणखी कांहीं जातीवाल्यानें तुह्मास पुष्कळ वेळा मजला घेऊन जाण्या संबंधानें ह्मटलें. परंतु तूं मजला घेऊन जात नाहींस व खाण्यास देत नाहींस, तुझ्यानें संसारहि करवत नाहीं तर फारकती कां देत नाहींस ? तर या नोटिशीनें कळविलें जाते कीं माझे मावस भावानें कर्जाऊ रुपयें दिलेले ४५० शिवाय त्याचें व्याज आणून देऊन मजला घेऊन जावें. ही नोटीस पावल्या पासून १५ दिवसाचे आंत सर्व वर लिहिले प्रमाणें व्यवस्था करून मला घेऊन गेल्यास ठीक आहे. नाहीं पेक्षां हीच फारकती समजून मी दुसरा घरठाव करून मावस भावाचे घेतलेले रुपयाची आदाई करून देईन हे तुह्मी खूप समजावे मग मात्र तुमचा हक्क मजवर राहणार नाही. ह्मणून ही नोटीस लिहून दिली आहे. ता. ११।४।१९०१ इसवी.

सही
भिवराई मर्द भगवान जात
तेली राहणार जानेफळ
निशानी हातची
बांगडी असे.

नोटीस.

बींजराज श्रीकिसन या नावाचे दुकान मालक बींजराज नंदराम मारवाडी धानुका मुक्काम शेगांव तालुके खामगांव जिल्हा आकोला.

यांस.

खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येत आहे कीं तुह्मी आमची सून शोभाई जवजें जुरीमल राहणार शेगांव हिजला कांहीं भुलथाप देऊन लबाडीनें आमचे मालकीचे, कजबे शेगांव तालुके खामगांव येथील, शेत सर्वे नंबर ४०५ एकर २६८२ आकार रुपये १५ ह्या जमिनी बद्दल तिचे जवळून दस्ताऐवज करून घेतल्याची गुणगुण माझे कानी येत आहे तरी ती खरी असल्यास तुह्मास या नोटिसीनें स्पष्ट कळवितो कीं सदर्हू आमची सून इजला कोणतेही प्रकारें सदरहू जमिनीच्या बाबतींत विक्री अगर गहाण अगर इतर प्रकारचा कोणताही व्यवहार करण्यास अधिकार नसून सदरहू जमिनीचा मी पूर्ण मालक आहे. ती माझे ताब्यांत व उपभोगांत आहे तरी आपण दांडगाईनें अगर अन्यायानें अगर दुसऱ्या कोणत्याही लबाडीच्या वेषानें सदरहू शेतांत येऊन माझे ताब्यांस हरकत केल्यास अगर माझे उपभोगांस व्यत्यय आणल्यास अगर माझे मालकीचे हक्कांस बाध आणून माझी नुकसानी केल्यास अगर झाल्यास त्याबद्दल तुह्मास जबाबदार धरून जे रीतशीर इलाज मला करणें सुचतील ते मी करीन कळावें ता. १९ माहे एप्रील सन १९०१ इ.

सही
माधोराम वल्लद मोतीराम
मारवाडी रहाणार शेगांव तालुके खामगांव
दस्तुर खुद्द.

## नोटीस.

१ मिर्जा अब्बासबेग वल्लद मिर्जा हुशेनीबेग इनाम... २ वजीरखा वल्लद रसूलखा इनमदार ३ मिर्जा रहेम बेग वल्लद मिर्जा अब्बास इनामदार. सर्वत्र राहणार अकोला शहर.

यांसी:—

खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्ही त्रिवर्ग लिहून रकम रुपये २००० हजारांच्या हुंड्या ९ लिहून देऊन त्यांजवर सह्या केल्या आहेत. त्याची मुदत २४१ दिवसांची पौष्य वद्य १४ संवत १९५७ राजीं पुरी झाली, तुमचे कडून मुदती प्रमाणें हुंडीचे रुपये आले नाहींत. करितां दर हुंडीस इजुरा रुपये ७॥ प्रमाणें आकार रुपये ६७॥ व निकराई शिकराई दर शेकडा आठ आणे प्रमाणें आकार रुपये १० आणि हुंडीचे रुपयाचें व्याज पौष्य वद्य १४ पासून वैशाख शुद्ध १ संवत १९५७ पर्यंत माहे ३-३ दिवसाचे रुपये १२४ एकूण रुपये २१७१॥ हे आह्मास तुमचे जवळून आज मित्ती पर्यंत घेणे आहेत. सबब ही नोटीस पावताच चोवीस तासाचे आंत आमचे रुपये या नोटिसीचे खर्चासुद्धां आह्मास देऊन आमची रसीद घेऊन जाणे. या प्रमाणें आपले कडून वर्तन न जाहल्यास आपले त्रिवर्गावर लागलीच फिर्याद करून पुढील व्याजासुद्धां व कोर्ट खर्चासुद्धां रुपये वसूल केले जातील हे आपल्यास कळावे. तारीख १८ माहे एप्रील सन १९०१ इसवी.

सही (मारवाडींत)
सुरजमल गोविंदराम दस्तुर खुद.

---

वऱ्हाडसमाचार

---

मित्ती वैशाख शुद्ध ४ शके १८२३

---

कै. न्यायमूर्ती रानडे यांच्या स्मारकाचें काम राणी सरकारच्या स्मारकाच्या कामापुढें मागासें होतें. राणी साहेबांच्या नांवानें कलकत्यास अजबखाना होऊन प्रांतोप्रांतीं उद्योग शाळा निघणार आहेत व या साठीं वर्गण्या जमा करण्याचें काम धपाटून सुरूं आहे. आता रानडे स्मारका प्रीत्यर्थ पैसा गोळा करण्याचें लोकानीं मनावर घेतलें आहे. वीस पंचवीस हजार रुपये खर्चून एक दगडाचा न्यायमूर्तींचा पुतळा उभारावा असें मुंबईच्या पुढाऱ्यांचें मत दिसतें व तें सर्व लोकांस अगदीं नापसंत व टाकाऊ वाटत आहे. ह्मणूनच या स्मारकाचा पैसा दगड मातींत न घालतां उद्योग धंद्याकडे किंवा अशाच काहीं तरी राष्ट्रोन्नतीच्या कामीं खर्च करावा व याचें उद्योदेतर्फे प्रचलित असें स्मारक करावें अशी सर्वांची एकच ओरड सुरूं आहे.

राणी साहेबांचे स्मारका बद्दलच. लाट गव्हरनर जनरल साहेबानीं आपला हट्ट सोडून लोकांच्या अनुमती व पसंती प्रमाणें उद्योग वर्धनाकडे तो पैसा खर्च करावा अशी ज्या लोकनायकांची सरकारापाशीं विनंती व शिफारस त्यांनींच रानडे स्मारका बद्दल पुतळा बसविण्याच मनांत आणावें हें फारच आश्चर्य होय.

कोणत्याही थोर महात्म्याचें स्मारक करावयाचें ह्मणजे त्याच्या गुणपुंजाबद्दल त्याचे उतराई होणें होय. त्या स्मारका मुळें आपल्या मनांत त्याजबद्दल पूज्य भाव वागावा, त्याचे सद्गुण व परोपकार आठवुन आपल्या अंतःकरणांत त्याच्या सारखीं कृत्यें करण्याची स्फूर्ति व वुद्धि उत्पन्न व्हावी व स्वदेशाच्या व लोकांच्या सुखसंपत्तीत भर घालण्याची मनुष्याची महत्त्वाकांक्षा उत्कट प्रबल व्हावी.

ज्यांनीं लोकांच्या सौख्यासाठीं व ज्ञान वृद्धीसाठीं आपणास मरे तावत्कालपर्यंत झिजवून घेतलें, ज्यानीं आपल्या पैशाचा, विद्वत्तेचा, व अधिकाराचा परकल्याणैक बुद्धीनें सद्व्यय केला व ज्यांनीं आपल्या हिंमतीच्या जोरावर राष्ट्रोन्नतीची, समाज सुधारणेची, धर्मनीति प्रसाराची, उद्योगकला वर्धनाची सर्वत्र चोहो बाजूंनीं चळवळ करून सोडली व ज्यानीं विद्यामृताच्या व उद्योगशीलतेच्या पिढीच्या चटक्याचा सर्वां ठायीं संचार करून दिला, त्याना त्यांच्या मागें उन्हातान्हात, थंडी पावसांत व दगडमातींत उभें करून ठेवण्यापेक्षां जे मनोरथ व ज्या गोष्टी त्यास प्रीय होत्या व ज्याबद्दल लोक त्यांचीं गोड गाणीं गातात त्याच गोष्टी त्यांच्या नांवानें केल्यास त्यांस धन्य व कृतकृत्य वाटणार नाहीं असें कोण ह्मणेल ?

जे जे थोर पुरुष आपल्या देशाहिता करिता आपलें आयुष्य वेंचतील व लोकानीं आपलें स्मारक करावें इतक्या मानमान्यतेच्या पदास पोचून स्वदेशास आपल्यामुळें धन्य असें मानवतील तीं सर्व नररत्नें एकाच सुवर्ण रज्जूनें एकत्र गाठवावींत आणि जेणें करून त्यांच्या मनोरथवृक्षाचा जोमानें वादविस्तार होईल, ज्या प्रकारें त्यांच्या इष्ट हेतूंचा दिग्विजय होईल तीच गोष्ट करण्याचें सुयश संपादण्याच्या मार्गास प्रत्येकानें लागावें, हें उचित होय.

---

## व्हिक्टोरिआ स्मारक

(वऱ्हाडचा फंड)

तारीख ३० मार्च रोजीं क्याप्टन डी. ओ. मारिस, डिप्युटी कमिशनर, उमरावती यांच्या अध्यक्षते खालीं जाहिरसभा भरली होती आणि त्यावेळीं वऱ्हाडच्या फंडाची व्यवस्थापक कमिटी नेमण्यात आली. तिजमध्यें मि. ए. इलियट, जुडिशिअल कमिशनर व जिल्ह्याजिल्ह्याचे डिपुटी कमिशनर यांस व्हाइस प्रेसिडेंट सर्वानुमतें नेमण्यात आलें; आणि रावबहादूर बंधूजी जनार्दन चौबल व रावबहादूर रंगनाथ नरसिंह मुधोळकर यांस सेक्रेटरी निवडण्यांत आलें. बाब व्यांकेचे उमरावतीचे एजंट यांस खजिनदार नेमण्यांत आलें असून सर्व पैसे त्यांच्याकडे धाडण्यात येतील. कलकत्याच्या स्मारकाकडे किती रक्कम द्यावयाची आहे हा प्रश्न खेरीज करून बाकीच्या सर्व प्रश्नाचा निकाल करणें म्यानेजिंग कमिटीकडे सोंपविलें आहे. ही व्यवस्थापक कमिटी नेमण्याला आज पाऊण महिना झाला पण या स्मारक फंडाची चळवळ जितकी गर्दीची असावी तितकी नाहीं असें दिसतें हें व काम शांततेनें होईल तरी हरकत नाहीं पण पैसे गोळा करण्याचा क्रम जोरदारीनें चालू असावयाला पाहिजे होता.

या फंडाची वर्गणी गोळा करण्याचें काम जिल्ह्या निहाय मोठ्या झपाट्यानें चालू होईल आणि ही वर्गणी गोळा करितांना सर्व लोकांकडून रक्कम घेतली जाईल अशी योजना करण्यांत येईल तर बरें. रक्कम कितीही लहान असली तरी चालेल पण तिचें महत्त्व फार मोठें आहे. ईश्वर करो आणि कैलासवासी व्हिक्टोरिआ यांचें स्मरण चिरकाळ राहो !

---

## सेशन खटले.

गेल्या सोमवारपासून शनिवारपर्यंत सेशन कचेरी आकोल्यास भरली होती आणि तेव्हां खालील खटल्याचा निकाल झाला:—

(१) तामगांव तालुका जळगांव येथील महादेव परदेशी याचा खून १९।१।१९०१ रोजीं केल्याचा आरोप गणू नवाच्या माणसावर होता. परदेशी रात्रौ चोरट्या सारखा घरीं आला ह्मणून याला गणूनें बेदम मारलें आणि परदेशी पुढें मरण पावला. त्याचें प्रेत दुसरे दिवशीं बोडख्याच्या जंगलांत सापडलें. पण डाक्तराची साक्ष अशी झाली कीं चिरफाडीसाठीं आलेलें प्रेत १५ दिवसांचें जुनें होतें, यतावरून तो माणूस पुरुष किंवा स्त्री होता हेंही कळत नव्हतें. व प्रेताच्या अस्थि व सुकट हाडाचा पिंजरा पाहतां हा एकदोन दिवसांत मेलेला इसम दिसत नाहीं. या पुराव्यावरून महादेव परदेशी मेल्याचेंच शाबीत झालें नाहीं ह्मणून आरोपीला दोषमुक्त करून सोडून दिलें. आरोपी तर्फे वकील रा. रा. केशव गोविंद दामले बी. ए. एल एल. बी हे होते.

(२) सरबराईची सक्रांत— गेल्या जानेवारीच्या १२ व १३ तारखांस औरंगाबादचा एक घोडस्वाराचा ताफखाना शेगांव मार्गें जात होता. शेगावात छावणी होती तेव्हां तिच्या सरबराईचें काम गांवच्या कामदाराकडे होतें. सरबराईच्या कामामध्यें लोकास बिगारी नेत असतात त्या प्रमाणें विठोबा नांवाच्या ६० वर्षांच्या माळ्याला बिगारींत धरूं लागले तेव्हां त्याचे मुलगे नारायण, लक्ष्मण व बाळू यांनीं पाटलास प्रतिबंध केला. इतक्यात महारही थोडा जरबेनें बोलला ह्मणून बाळू याला राग येऊन त्यानें हिरू नांवाच्या महारास मारलें. तेव्हां त्यांच्या पैकींच एकजण ह्मणाला कीं, महाराला काय मारता, पाटलालाच झोडा. असें बोलतांच एकदम गर्दी झाली व मारामारी सुरूं झाली. त्या मारामारींत लक्षमणराव पाटील यास डोक्यावर मोठी दुखापत होऊन मार लागल्यामुळें त्यांस ३० दिवस इस्पतळांत राहावें लागलें. आरोपी पैकीं लक्ष्मण व नारायण यांसही मोठी दुखापत झाली व एकाच्या मनगटाचें हाडही तुटलें आहे. सरकार तर्फे रा. रा. विष्णु रंगनाथ शेंबेकर व व्यंकटेश कृष्ण देसाई वकील हे असून आरोपी तर्फे रा. रा. नारायण काशीनाथ दाते हे वकील होते. सातही आरोपींस चार वर्षांपासून सहा महिन्या पर्यंत निरनिराळ्या शिक्षा देण्यांत आल्या.

या मोकदम्या हकीकती वरून सरबराईच्या कामात रयत खुषीनें येत नाहीं ह्मणून पाटील लोक हुकुमाचे जोरावर रयतेस जबरदस्तीनें सरकारचें काम करण्यास नेतात ही गोष्ट कायद्याच्या दृष्टीनें विचार करण्या आहे. सरबराई हें एक पाटलाचें काम आहे परंतु तें करण्याकरितां यानें जुलूम करणें न्याय्य आहे किंवा नाहीं याचा निर्णय होणें फार अगत्याचें आहे. सदर्हू संबंधांत मागें अलिशान रेसिडेंट साहेब बहादूर यांनीं सरबराईच्या कामा करितां लागणाऱ्या सामानाबद्दल एक सरक्युलर काढलें आहे परंतु त्यावेळेस मनुष्याला मजूरी करितां बिगारी धरावा किंवा धरूं नये अशाबद्दल उल्लेख केलेला नव्हता. सदर्हू मोकद्दम्याची हकीकत पाहतां आह्मास वाटतें कीं बिगारीच्या मामला संबंधानेंही कांहीं नियम होणें फार जरूर आहे. या गोष्टीचा प्रांतांतील अधिकारी कांहीं योग्य विचार करितील अशी आह्मी आशा करितों.

(३) वाशिम जिल्ह्यातील दुष्काळ कामावरील रामदास, वासुदेव व देविदास अशा तीन अमलदारांवर खोटें हाजिरीपत्रक देऊन पैसे खाल्याचा आरोप आहे. या मोकदम्यांतील सरकारतर्फेचे कांहीं महत्त्वाचे साक्षीदार नसल्या मुळें हा खटला जूनच्या सेशना पर्यंत तहकूब ठेवण्यांत आला.

---

## रामायण

(अंक १२ वरून पुढें)

शत्रूवर हल्ला करण्यापूर्वीं आपले बळाबळ पाहिलें पाहिजे. साम, दाम, भेद, दंड, हे चार उपाय योग्य वेळीं उपयोगांत आणावे. दंड हा शेवटला उपाय आहे, असें सांगितलें आहे. राजनीती संबंधानें रामानें भरतास जे प्रश्न केले आहेत (२,११०) त्यांतील बराच मोठा भाग प्रक्षिप्त असावा अशी मला शंका आहे. भरत भावाला पाहून निश्चेष्ट पडला असता, त्याला इतके राजनीती संबंधीं प्रश्न, दशरथाच्या मरणाची वार्ता कळण्यापूर्वीं, राम विचारील हें संभवनीय नाहीं. महाभारतांतील नारदनीतीतील कश्चित् प्रश्न येथें ही टूम एखाद्या पढील कवीनें रामायणात घुसडून दिली असावी, अशी मला जबरदस्त शंका येते. ह्मणून या प्रश्नांतील माहिती मी बहुतेक वगळली आहे.

शत्रूशीं लढाई करण्या पूर्वीं, शत्रूकडे दूत पाठवून आपलें काय ह्मणणें आहे हें सांगण्याचा परिपाठ असे. दूतानें सांगितलेलें काम केलें पाहिजे पण दूत केवळ संदेशहारक असे असें दिसत नाहीं. तो वकिली ही करी आणि सामोपचारही सूचवी. दूत प्रायः अवध्य असत. फार झालें तर त्याला शरीरदंड करावा, इतकी सवड असे. दूतांहून चार निराळे. हे शत्रूकडील बातमी गुप्त वेषानें काढीत आणि आपल्या राजाला कळवीत. चार सांपडले तर त्यांचा प्रायः वध होत असे. रावणाचे चार कर्णीनीं व बिभी-

षणानें पकडले ते रामानें जिवंत सोडिलें, हें याच्या औदार्याची किंवा स्वसैन्याच्या बऱ्या विषयींच्या खातरीची साक्ष देतें. युद्ध नसे तेव्हांही प्रांतांतील माहिती राजेलोक गुप्त चाराच्या द्वारें काढीत सीते विषयींचा जनापवाद रामाला अशा चारांच्या मुखानेंच कळला.

राजा सत्य व धर्म याचा प्रमत्र असा झटलें आहे तेव्हां ता व्यवहार कसा चालवीत असे या विषयीं आपणाला पृच्छा आलीच पाहिजे. अर्थीप्रत्यर्थी यांचें ह्मणणें ऐकून राजा निवाडा देत असे. ज्ञान पद्धत कशी व्यवस्था असे या बद्दल रामायणात माहिती नाहीं. राजा सर्व अर्थोंना सुगम असावा व व्यवहाराचा निर्णय करण्याला फार उशीर लागूं नये ही तत्वें ठरल्या सारखीं होतीं.

दानाध्यक्ष, कोशाध्यक्ष या नांवाचे अधिकारी असत, व यांचीं कामें त्यांच्या नांवावरून दिसतातच. हल्लीं सरकारांत जशीं निरनिराळीं खातीं आहेत तशीं त्या वेळीं असतील असें संभवत नाहीं. साधारणतः एकाच्याच हातात सर्व सूत्रें असत, असें दिसतें. नगरात हा सूत्रधार राजा असे, व ग्रामात त्याचा प्रतिनिधी असे. जानपदाचे पोट विभाग असत, अशांबद्दल रामायणांत मुद्दा दाखला सांपडला नाहीं.

येथ पर्यंत राष्ट्रीय स्थितीची माहिती दिली. आतां सामाजिक स्थिती संबंधानें काय माहिती मिळते ती पाहूं या. प्रथमतः स्त्रियांच्या स्थिती विषयीं विचार करूं.

कन्या पितृगृहीं, राहून बऱ्याच मोठ्या होत. श्रीमंत घराण्यातील कन्यकाना नृत्य, गायन, व वादन शिकवीत. पुरुषाना चित्रकला येत असल्याचा दाखला आहे, परंतु स्त्रियांना ही कला अवगत होती असें दिसत नाहीं. हल्लीं ज्या रकेवर शिक्षण या कामीं आपण मिस्त ठेवतो ती लेखनकला रामायण काळीं प्रचलित होती असें दिसत नाहीं. 'अध्ययन,' 'पठण' 'वाचो विधेय' इत्यादि शब्द मुखोद्गत करण्याच्या परिपाठाची साक्ष देतात. 'लिखन्ति' हा शब्द युद्धकांडाच्या शेवटल्या सर्गांत फलश्रुतींतील शेवटल्या श्लोकांत आला आहे. ही फलश्रुती वाल्मीकाची नाहीं, प्रक्षिप्त आहे. अशाबद्दल बरींच प्रत्यन्तरें आहेत

कितव्या वर्षी कन्येचा विवाह होत असे हें खातरीनें सांगवत नाहीं. कुशनाभाच्या शत कन्या मारुतानें धर्षित केल्या तेव्हां त्यांचा विवाह झाला नव्हता. रंभा, अरजा या ही धर्षणा पूर्वी यौवनाक्रांत होत्या असा स्पष्ट उल्लेख आहे. सुमाली हा कैकयीला ह्मणतो 'मुली, प्रदानकाल आला. यौवन अतिक्रांत होत चाललें आहे.' सीतादि भगिनींचा विवाह झाल्याबरोबर त्या "रेमिरे मुदिताः सर्वाः भर्तृभिर्मुदितारहः" (१,७७,१४) या श्लोकार्धातील रहः या पदानें भर्तृयोग्य वयाच्या होत्या असें दिसतें. तसेंच सीतेनें अनसूयेला आपला वृत्तात सांगितला आहे त्यात 'पतिसंयोग सुलभं वयः' असे शब्द आहेत; त्याचा अर्थ सरळ घेतला तर तारुण्य असा होतो पण योग्य विवाह काल असा टीकाकार घेतात. तसेंच रावणाला सीता आपले वनवासा पर्यंतचें वृत्त सांगते त्यांत ती असें ह्मणते:—

(पुढें चालेल.)

---

# The Berar Samchar

MONDAY APRIL 22 1901

In Berar the tenure of land is of a very simple form. The Government are the highest land-lords. They portion out their land in Survey numbers. These survey-numbers are leased out at a fixed rent for a period of 30 years. This right of occupancy explains the sum of rights vested in a land-holder. The assessments are liable to a revision and those occupants who will submit to the new rates of settlement will continue to hold the land for a similar period of next 30 years. The assessments are not as light and fair as they are often represented to be. The recent settlements have further made them almost prohibitive and have made more stringent the pressure of the land-tax.

Agriculture is the only one profession we know any thing of. But with its yearly diminishing products it has become almost helpless to support the vastly increasing population. Besides there is an utter want of other industries and hence arises the great famine of wages. So the old agriculturists as a class are fast sinking down to the level of mere field labourers. The old land-lords are growing poorer and have to look up to the great Sawakars for money. The tightness of the money—market and the exhorbitant rates of interest have made the land change hands from the poor farmers to the big and rich Sawakars. There is no other out—let to this purely agricultural country. Man loves his own land and to the last he tries to stick to it. He holds it as dear as, nay, even dearer than his own life, works hard in it but to his ultimate grief finds himself turned out from it.

The wealthy people—the new masters of the land—do not mind to do any thing to improve the land but keep a keen eye to secure at least a moderate rate of interest upon the capital they have invested in its purchase. These rich land-lords do not care to have the lands for themselves to work in, but almost always lease them out every year, as if by an auction sale, to the highest bidder who has to pay the amount which is generally fixed by the double or treble the quantity of the government rental. Men have no alternative but to put up with this hard agreement if they would care to live. The greatest danger to the land proceeds from such a system as this. The question of land—improvement is systematically left out of consideration. Each one looks to his own immediate gain and no one would trouble himself to have a look into the future far off. The owners know full well how to screw out money from their poor lessees who can not have the will nor have the means to improve they land which they are to hold for a stipulated time on stipulated conditions. Both co-operate to make the land yield to the utmost but in no way there seems any effort towards improvement. The system of tenancy mentioned above gives rise to speculations and we object to all principles which give no weight to fixity of tenure, a common partnership in the goodness or otherwise of the harvest and a common bond of anxieties and pleasures that ought to be the stepping stone for the improvement of land and reforms in the science of agriculture. We condemn the new system of leasing out land at so many times the Goverment assessment. It is this system which is coming to prominence in Berar. The evils of the system are too many to claim a careful analysis The recent famine has brought to light the evils of the system of leasing fields at a fixed cash payment Perhaps it will be an easy mode of doing business but in an agricultural province like Berar the system becomes killing in its effect and highly speculative in calculation. Ignorant peasants who are in want of wages contract to pay exhorbitant rents and thus bring new victims to the growing class of indebted people.

We donot like the Revenu. system of the government. The claim of the Government is for a fixed amount in cash. This claim is to be satisfied irrespective of the actual produce of land.

There should be a legislation to the effect that no contract of leasing land at a cash amount will be recognized in a court of law. The old system of *Batai* will be a very good substitute A sort of partnership in the crops will be the right stimulus to improve agriculture and to re-establish on a firm footing of friendliness and confidence the old relations between a middle man and his tenants.

Land is our ultimate food—providing goddess on earth and she must be worshipped with all her productive materials; we must try to please her and when she is satisfied she is sure to bestow her rare and blessed boons on her devotees. We hold that in times to come, the government and the people will never fail to secure her good grace. Land backed by other industries would enable us to compete sucessfully with the powerful nations of the world.

---

## OUR E. A. C.

*Sir,*

In referring to the appointment of Mr. Kolatkar as an E. A. C. in the Central Province in one of your recent issues you have wisely suggested that selection should be made from the members of the Bar; but it does not necessarily follow that because a man is not a L. L. B. he is not a competant Judge. In Berar there are judges who are LL. Bs and those who are not LL. Bs. and if you compare some of the latter with the former you will find that they are equally good if not better. The selection is now a days generally made from amongst the Tahsildars and there is no objection to this provided they are competent men. What I would for the future suggest is that as a guarantee of their competency, they should be made to undergo a *Special Examination in Law* in lieu of the higher Departmental Examination. The present test is not sufficient to train our E. A. Cs in the administsation of law in all its departments. The Special Examination should comprise all the subjects prescribed for High Court Pleaders and no Tahsildar should be appointed a Judge unless and until he has beforehand qualified himself by passing the legal test; and then there need be no fear of an incompetent man presiding in our courts.

Yours faithfully
A

---

## वऱ्हाड

हवामान-दिवसा ऊन कडक व प्रखर पडतें पण रात्रौ हवेंत थंडपणा जलदी येतो. हवा रुक्ष व निरोगी आहे. तापाचे विकार गांवांत पुष्कळसे आहेत पण त्यांचा विलय लवकरच होईल.

रा० रा० लक्ष्मण गोपाळ तहशिलदार, आकोला यांस यवतमाळास आफिशिएटींग एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर नेमण्यांत आलें हें कळविण्यास मोठा आनंद वाटतो. यांची तहशिलदारी व दुष्काळाची कामगिरी पाहता त्यांस मिळालेली नवी हुद्देदारी त्यांच्या गुणाला अनुरूपच आहे.

आकोल्याच्या तहशिलदारीवर रा० रा० नारायण रामराव गुप्ते यांस नेमल्या अन्वयें ते परवां शनिवारीं आपल्या कामीं रुजूं झाले. याच्या उत्कर्षाला त्यांची शरीर प्रकृती पुष्कळदां आड आली. हल्लीं प्रकृती चांगली दुरुस्त झाल्या वरून त्यांनीं आपली रजा कमी केली आणि ते चाकरीवर दाखल झाले ही आनंदाची गोष्ट होय.

वाशिमच्या दिपुटी कमिशनरच्या जागीं मे० प्रीडो साहेब रुजूं झाल्या मुळें लेफटेनंट फ्लाडन हे आपल्या असिस्टंट कमिशनरच्या जागेवर बुलढाण्यास रुजूं झाले.

आह्मास कळविण्यांत मोठें दुःख वाटतें कीं रा. रा. गणेश राजाराम, नायब तहशिलदार बाळापूर यास दोषिक ज्वरानें देवाज्ञा झाली. हे गृहस्थ फार चांगले होते आणि त्यांच्या मरणामुळें त्यांच्या आप्त मित्रास मोठें दुःख होईल।

---

## वर्तमानसार

स्त्रीचें धारिष्ट— सगरोळी मक्ता जहागीर येथें एक मुलगा निजला असतां याचे पायास एका सर्पानें विळखा घातला; पण तेथील देशमुखीण बाईनीं मोठ्या धैर्यानें या सापाचें शेपूट धरून ओढलें व तो साप लांबवर फेकून दिला. अशा छातीच्या बायका! विरळा होत.

निलगिरी येथील झनाना मिशनच्या एका बाईनें एका मुसलमान मुलीला पळवून नेले. मुलगी वयांत असल्यामुळें फिर्याद रद्द झाली ह्मणून तेथील मुसलमानांनीं आपलीं मुलें ख्रिस्ती लोकांच्या शाळेंत पाठवावयाची नाहींत असा ठराव केला.

माफेकिंग शहराजवळच एक पांढरा वाळूचा डोंगर आहे. वाऱ्यामुळें ती वाळू उडते व यामुळें तेथें मंजूळ स्वर निघतात. ह्मणून या डोंगरास गाणाऱ्या वाळूचा डोंगर ह्मणतात.

अद्भुत—मनुष्याचा दगड झाला अशा प्रकारच्या सुरस मनोरंजक कल्पित गोष्टी आपण वाचतों पण कित्येक ठिकाणें अशीं आहेत कीं तेथील पाण्याचा स्पर्श होतांच वस्तुचा दगड होतो. शोणभद्र नदीचा असाच चमत्कार लोक सांगतात. पॅटागोनिया येथें एक एडमिरल नांवाचा इंग्रज खलाशी तेथील पाण्यांत पडला व तो लागलींच दगड बनला. त्या दगडांत जीव चेतना खेरीज करून त्या साहेबाचें सर्वांग हुबेहुब उमटलें आहे. कांहीं पाण्याच्या अंगीं ईश्वरानें काय ही शक्ती ठेविली आहे! असें कां होतें याचा शास्त्रज्ञांनीं मुद्दाम शोध लावला पाहिजे.

फाजील कडकपणा!— भागलपूर येथें युनिव्हर्सिटीच्या परीक्षा चालू असतां कांहीं विद्यार्थ्यांस बहिर्दिशेस जावयाची निकड लागली पण सुपिरिंटेंडटनीं त्यांस जाऊं दिलें नाहीं. एकाचे कपडेहि खराब झाले. तारतम्य ज्ञानाची बरीच उणीव दिसतें.

आपल्या हिंदू प्रमाणेंच छापील कागद वर पाय देणें चिनी लोक पाप समजतात विद्येला लाथ मारल्या सारखें होतें. असाच विद्येचा आदर ठेवणें चांगलें.

खानेसुमारीचा खर्च सुमारे २९ लाख रुपये होईल असा अंदाज आहे. इतका खर्च दर दहावे वर्षीं होणें चांगलें आहे काय?

निजाम सरकारच्या दिवाणांनीं एक मोठा वाघ मारला ह्मणतात.

एरंडाच्या पानानें डासाचा उपद्रव कमी होतो ह्मणतात. डांस, चिलटें, ढेंकूण, माशा यांच्या साठीं खात्री लायक असा उपाय निघणें फार जरूर आहे. सर्वजणांस फार फायदा होईल.

मुंबईस तरुण मुलींना कपडे शिवण्याचें काम शिकविण्याचा एक वर्ग निघणार आहे. व यासाठीं २० हजार रुपयांची देणगी मिळाली आहे. स्त्रियांनीं पुरुषांचीं कामें करण्याचें मनावर घेतलें आहे. मग पुरुषांनीं काय करावें? उद्योगधंदेच उरले नाहींत.

बडोद्याचे सर सुभे रा. ब. धामणगांवकर यांनीं आपल्या मृत पत्नीचें स्मारक ह्मणून ६ हजार रुपये मुंबई युनिव्हर्सिटीला दिले.

दोन तीनशें नेटिव घोडेस्वारांस इंग्लंडचे बादशहा आपले बाडिगार्ड ठेवणार आहेत.

मक्के पर्यंत आगगाडी करण्यासाठीं मुसलमान लोकांनीं पैसे जमविण्याचें ठरविलें आहे.

महाराणी साहेबांचे स्मारकाबद्दल लोकांची समजूत घालण्याकरितां व सर्व माहिती त्यांना समजून देण्या करितां एक बॅरिस्टर साहेब फुकट वर्तमानपत्र काढणार आहेत.

सरकारी ज्योतिषांचें भविष्य—हिंदुस्थानांत पावसाळा वेळेवर सुरूं होऊन चांगला होईल.

नामदार प्रो. गोखले यांना व्हाइसराय यांच्या कौंसिलांत लोक नियुक्त समासद नेमिलें. नामदार चंदावरकर यांस हायकोर्टचे जागीं कायम केलें. मि. वाच्छा यांस मुंबई मुनिसिपल कमेटीचे अध्यक्ष नेमिलें.

एका लुच्च्या युरोपियनानें सद्गृहस्थासारखा पेहेराव ठेवून ब्यांकेचे खोटे चेक देऊन हजारों रुपयांस मोठमोठ्या व्यापाऱ्यांस फसविलें आहे. पोलिस तपास सुरू आहे.

येत्या आगस्ट महिन्यांत दक्षिण ध्रुवाच्या भोंवतालचा ७० लक्ष मैल प्रदेशाचा शोध लावण्यासाठीं एक कंपनी निघणार आहे. त्यांस ४९ हजार रुपये देण्याचें ठरविलें आहे.

ब्राह्मणाच्या पोराचें शौर्य—बंगाल इलाख्यांतील बागपूर गावीं एका गृहस्थाचा एक मुलगा जंगलांत गेला होता. त्याला तेथें एका वाघानें घायाळ केलें व तो मुलगा रडत रडत घरीं आला. त्याच्या जिवाची आशा लोकांस वाटेना. हें पाहून त्याच्या भावानें हातांत ढाल तलवार घेतील व तो त्या वाघाच्या नरडीचा घोट घेऊन पुरा सूड उगविण्यासाठीं रानांत गेला. व तेथें मोठ्या शिताफीनें व धैर्यानें त्या वाघास त्यानें वार करून ठार केलें. शिकारी साहेब बहादुरांनीं या अद्वितीय शिकारीची गोष्ट लक्ष्यांत धरण्यासारखी आहे.

युरोपियन राजामध्यें फुटाफूट करवून आपला डाव साधण्याचा रशियाचा व चीनचा बेत आहे. युरोपियन सैन्यास चिनांत गडबड करतां येऊं नये ह्मणून चिनीं मुत्सद्यानें रशियाशीं सख्य करून त्यांस मांचुरिया प्रांताची लालूच दाखविली आहे. पण मांचुरिआ रशियास देण्याचा चीनचा बिलकूल इरादा नाहीं. परंतु रशिया त्याचा ताबा सोडणार नाहीं. कोरिआ प्रकरणांत हात घातल्यामुळें रशियाचें जपानशीं मोठें युद्ध होईल असा अंदाज आहे. चीनचा होईल तितका मोठा लचका तोडण्यास प्रत्येक राष्ट्रानें आ पसरला आहे.

माथेरानच्या सुपिरिंटेंडंट साहेबांस लोक फारच त्रासून गेले होते. ह्मणून त्यांच्या बदलीची बातमी तेथील लोकांस समजतांच यांनीं मोठा उत्सव केला ह्मणतात. अधिकाऱ्याच्या गुणांचा गौरव करण्यासाठीं उत्सव करण्याचा संप्रदाय आहे. पण ही तऱ्हा नवीनच दिसते.

जर्मनीमध्यें प्रत्येक चावडीवर एक एक बारोमिटर, व थर्मामेटर हीं ठेविलेलीं असतात व त्याचा शेतकरी, व्यापारी वगैरे लोकांस फार उपयोग होतो.

बेळगांवास एका जमादारानें एका युरोपियनचे कुत्र्यास वीष घालून मारलें ह्मणून त्यास २०० रुपये दंड झाला. पैकीं १९० रुपये साहेबांस नुकसानी बद्दल दिले. सरदारांच्या घरचें श्वान तें, गांवठी कुत्र्यांची गोष्ट निराळी.

अचंब्याची गोष्ट— युरोपियन स्त्रियांच्या माथचोळ झग्याच्या जमिनीवर लोळणाऱ्या मागांत सर्व जातीचीं रोगबीजें सांपडतात. पण स्त्री पुरुषांचे हातरुमालांत त्याहून अधिक असतात. यावरून लवकरच झग्याचीं शेपटें लांडी करण्यांत येतील व कापडी हातरुमाला बद्दल जपानेंच कागदी रुमाल येतील., ह्मणजे रुमाल खराब झाल्या बरोबर जाळून टाकण्यास सोयीचें पडेल.

लबाडी—एका सोनेरी टोळीचा डल्ला मारण्याचा बेत फसला. श्रीमंत छत्रपती महाराज व सांगलीकर हे रामेश्वराचे यात्रेला निघाले आहेत व ते बेंगरुळास अमूक दिवशीं येणार आहेत, सबब यांच्या खर्चा निमित्त ४० हजार रुपयांचे तोडे अमुक एका पत्त्यावर तावडतोब पाठवून द्यावेत असा शिरट्टीचे मामलेदारांस सांगली संस्थानांतून हुकूम आला. मामलेदार साहेबांस इतका ऐवज पार्सलनें पाठविणें जोखमीचें वाटल्या वरून यांनीं खुलासा करण्यासाठीं सांगलीस तार केली. ह्मणून सर्व लबाडी बाहेर पडली. मामलेदारास जें पत्र आलें ते बार नंबर शिक्क्यासह व्यवस्थेशीर आलें होतें. या लबाडीची बित्तंबातमी काढण्यासाठीं पोलीसनें आपली चतुराईची कारवाई दाखवावी. धर्माच्या नांवावर कानगी मागून लोकांचे गळे कापणारे, व पैशासाठीं अजब नव्या नव्या लबाडी करणारे लोकांची अलिकडे समृद्धि होत आहे हें चांगलें नव्हे. दारिद्र्या मुळें असल्या दुष्ट फंदांत आपली बुद्धि खर्च करणें कित्येकांस भाग पडतें हें दुर्दैव होय!

बोअरजनरलच्या तोडीचा, जनरल फ्रेंच हा एकच सरदार इंग्रज फौजेंत आहे व बाकीच्यांत कांहीं राम नाहीं असें बोर लोकांच्या डिवेट जनरलचें मत आहे. गुणी गुणं वेत्ति. हेंच तत्व या वरून लार्ड राबर्टस व किचेनर यांच्यांत जनरलचें कांहीं पाणी नाहीं दिसतें. आणि अशाच्या हातीं लढाईचीं सूत्रें असल्या मुळें तर आमच्या इंग्रज बहादरांची पिछेहाट होत नसेलना?

बोअर लोकांचा सरदार क्रीट झिंगर हा मोठा हुषार आहे ह्मणतात. तो मोठमोठ्या पुरांच्या नदीतून सहज पार जातो. याचें सैन्य नेहमीं त्या बरोबर असतें. क्षणांत सैन्यांची फाकाफाक करितो व क्षणांत तें जमवितो. इंग्रजांच्या हातून हा पुष्कळ वेळां निसटून गेला.

बोअर लोकांच्या एकेक आख्यायिका ऐकून मन थक्क होऊन जातें. यांची चलाखी धैर्य, शौर्य, व पराक्रम हीं सर्व विलक्षणच! यांनीं आपल्या अद्वितीय गुणांनीं स्वातंत्र्य लालसेनें व स्वदेशाभिमानानें सर्व जगास अनुकरणीय असें उदाहरण घालून दिलें आहे. यांच्या बद्दल त्यांच्या प्रत्यक्ष शत्रूंच्या मनात सुद्धां प्रेम व पूज्यबुद्धि उत्पन्न झाल्यावांचून रहाणार नाहीं. त्यांच्या युक्त्या व कल्पनाहि अचाट! शत्रूस कसें जेरीस आणावें, राष्ट्राचें ऐक्य कसें राखावें, व स्वातंत्र्याचें कसें रक्षण करावें हा उत्तम धडा त्यांनीं आपल्या उदाहरणांनीं सर्वांस शिकविला आहे व अशा रीतीनें आपली कीर्ति अजरामर करून सोडिली आहे.

ट्रान्सवालच्या लढाईत इंग्रजांची सरशीच होत आहे असें ह्मणतात पण तशीं चिन्हें दिसत नाहींत. ज्याचा जय होतो तो पराजित पक्षांस तहाच्या आपल्या अटी कबूल करण्यास लावितो व पराभव पावलेले लोक तह करा असें ह्मणतात पण येथें पहावें तो निराळेंच. इंग्लिश लोकच तह करा ह्मणून जनरल बोथाच्या पाठीस लागले आहेत व बोअर लोकांनीं त्यांस धिडकारून दिलें आहे. आपलें विस्खलित झालेलें सैन्य एकत्र करण्यास तहाबद्दल बोलणें करण्याची वेळ चांगली सांपडली. इंग्लंड व राशिया यांच्या मधील वितुष्टाचा फायदा करून घेण्याचा त्यांचा विचार आहे.

जनरल डीवेटचें माथें फिरलें आहे व तोच काय तो तह करीत नाहीं, बाकी आह्मी सर्व तयार आहों असें बोथा यानें नुकतेंच इंग्लिशास कळविलें आहे. ही दुसरी हुलकावणीच दिसते. शिवाय एकट्या बोथ्यानें तह केला न केला सारखाच. इतके दिवसांचे अनुभवावरून तें स्वातंत्र मिळाल्या खेरीज तह करतील ही गोष्ट अगदीं असंभवनीय आहे.

बोअर लोकांस युरोपियन राष्ट्रांनीं सहानुभूति दाखविली पण उघड मदत करण्याचें प्रत्येकानें नाकारिलें परंतु अंतस्थ रीतीनें त्यांस त्यांची मदत आहे व ह्मणूनच ते नेटावर आहेतं. प्रे० क्रूगर हे युरोपांत येऊन स्वस्थ राहिले नाहींत. ट्रान्सवालच्या वतीनें लढण्यासाठीं हालंड, बेल्जम व इतर राष्ट्रांतून रोज नवीन नवीन रिक्रूटस पाठविण्याचे प्रयत्न सुरू आहेत रोज शेकडों लोक त्यांस मिळत आहेत सध्या १०।१२ हजार लढवय्ये सैन्य आहे. मग तहाची गोष्ट कसली रुचणार!

ज्या प्रमाणें एखाद्या मोठ्या थोरल्या बुलडॉग कुत्र्यास यकःश्चित माशीनें त्रासवून जेर जेर करावें तसें बोर लोकांनीं आरंभिलें आहे. समरांगणांत दोन हात करून दाखविण्याची त्यांची शक्ति नाहीं. परंतु मोठ्या हिंमतीनें इंग्रजांस बेजार करण्याचें यांचे हरप्रयत्न चालू आहेत आपल्या स्वदेश स्वातंत्र्यासाठी त्यांच्यांतील मोठमोठ्या रथी महारथ्यांनीं सर्वस्वाची आहुती देण्याचा पुरा निश्चय ठरविला आहे. व पृथ्वी वरून प्रत्येक बोअर जीव नाहीसा होई पर्यंत ते आपल्या प्रिय राष्ट्रासाठीं असेच लढत राहातील अशी सर्वांची खात्री आहे. अशा जहांबाज, मर्द, व एकनिष्ठ लोकांस सरकारनें आपले मित्र करून सोडल्यास किती काम गोष्ट होईल.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED N. No.

सहामाही ,, ३ ,, ८(
साल अखेर ,, ७ ,, १ ८(
किरकोळ अंकास ........................८ॾ

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत ८० १
दर ओळीस.........८१ ०१
दुसरे खेपेस .... ........८१

Annual in arrears 7 ,, 1 Rs 8 as
Six monthly......... 3 ............... 8 as
Single copy .................................4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOLXXXV AKOLA MONDAY 29 APRIL 1901 NO 16

वर्ष ३५ आकोला सोमवार तारीख २९ माहे एप्रिल सन १९०१ इ० अंक १६


## मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षात ह्मणजे जानेवारी च्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षात एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं

मुंबई ब्यांक
आकोला १९ जुलै १८९८ } A. G. Watson Agent.

## जाहिरात

तुपे यांची उत्तम निळी काळी शाई एकदम ॥।- ची घेणारांस रोख रुपये ५०० २००,१००,५०,२५,१५,१०,५,२ किंवा ८।२ किं. चें पुस्तक यांतून एक बक्षीस प्रत्येकांस खात्रीनें मिळतें. शाई मागविणारा ची ट. ह. सह ८१४ ची मनिआडर पोंचतांच त्यांचें नांव रजिष्टरांत नोंदून ज्या नंबरी नांव नोंदलें असेल त्या नंबरास आधींच ठरवून ठेवलेलें बक्षीस आहे तें लगेच रवाना होतें.

पत्ता-- एम. जी. तुपे, पेठ गणेश घर नंबर ३२ पुणें.


### नोटीस.

नोटीस बेशमी किसन वल्लद लक्ष्मण कुंभार मुनीम निसबत भिकारचंद दुलीचंद तेली दुकान शेगांव ता० खामगांव जिल्हे अकोला. यांस:-

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं साल मजकूरचे हंगामाचे वेळीं तुह्मी दुकानचे पैसे कर्जाऊ देण्याचे कबूल केले ह्मणून मी त्या रकमेच्या आधारावर कापसाचा व्यापार करूं लागलो. त्याप्रमाणें मला माल खरेदी करण्यास पैसेहिं दिले व व्यापार चालू झाला. परंतु ज्या वेळीं तुमचा आमचा करार झाला त्यावेळीं आह्मांस तुह्मी कळविलें कीं, हे पैसें मालकाच्या हुकुमावरून देत असून व्यापारही मालकाच्या सांगण्यावरूनच होत आहे, या तुमच्या बोलण्यावर विश्वास ठेवून आह्मी खरेदीला सुरवात केली. सदर्हू व्यापार पौष शुद्ध १२ रोजीं सुरूं झाला व आठ दिवस खरेदी करून १०६॥ ओझ्यांचा माल गंजी लावून तयार होता, पुढें पौष वद्य ४-५ मीचे संधानांत १०० ओझे हिरजी वल्लद लद्धा भाई भाटे यांशीं भाव ६५। प्रमाणें मी स्वतां सवदा केला. आणि त्या प्रमाणें ओझें देण्यास तुह्मांस ताकीद देऊन माझे घरीं लग्न असल्यामुळें मी वरील हिरजी भाटे यांच्याशी तुमची पुन्हां रुजवात करून निघून गेलों. मी माझे ओझे विकलें गेले ह्मणून घरीं निर्धास्त बसलो. माझ्या ओझ्या पैकीं ६॥ ओझे तुमच्यापाशीं शिल्लक राहिले. पुढें माझे येथील लग्न वगैरे झाल्या नंतर मी पुन्हा शेगांवी येऊन हिरजी भाटे यांस विचारलें असतां त्यांनीं कळविलें कीं, तुमच्या करारा प्रमाणें ६५। च्या भावानें तुमचे १०० ओझे आह्मी घेऊन रुपये किसनपाशीं दिलें. नंतर तुमचे दुकानी हिशोब पहाण्यास आलों असतां तुह्मी कळविलें कीं, तुमचे ओझें विकलें. परंतु गंजीवर पाऊस पडल्यामुळें कांहीं ओझें ५३;५०;४९ वगैरे भावांत विकले गेले. ज्या दिवशीं सवदा झाला त्या दिवशीं पाऊस वगैरे नसून पुढें आठ दिवसहि पाऊस पडला नाहीं. निवळ आमचा विश्वास घात करून आपल्या फायद्यासाठीं प्रथम ६५। भावांत विकलेल्या माझे गंजीच्या कापसाची रकम माझे नांवानें जमा न करितां, त्या नंतर पावसानें खराब झालेल्या तुमच्या गंजीच्या विक्रीची कमी आलेली रक्कम लबाडीनें माझ्या नांवानें जमा दाखविली. व हिरजी भाट्यास जे ओझें दिले ते हिरजी भाटे यांनीं माझा सवदा झाल्यावरून माझेच ओझे आहेत असें समजून ओझे विकत घेतलें. वास्तवीक पहातां ६५। चे भावांतच माझे ओझे खरे विकले गेले. यावरून वरील भावा प्रमाणें १०० ओझ्यांचे रुपये तुमचे येथें माझे जमा असले पाहिजेत व आणखी शिल्लक राहिलेले ६॥ ओझे व सरकीचे दाम एकंदर मिळून तुमचेकडेस आमचे बरेचशे रुपये घेणें निघत आहेत, असा खरा व्यापार झाला असतां तुह्मी मुद्दाम लबाडी करून कमी भावानें मागाऊन विकलेल्या कापसाची रक्कम मला जमा देऊन आज तुह्मीच उलटी आमचे कडेस बाकी दाखवीत आहां, ही व्यापाराची रीत नाहीं. तुह्मी केलेल्या कृत्यावरून आमच्याशीं विश्वासघात केला असें उघडपणें सिद्ध होत आहे. व हा एकंदर झालेला व्यापार तुह्मी मालकाचे अपरोक्ष व बिन परवानगीनें केला अशी आतां आह्मास लोकांच्या सांगासांगी वरून समजतें. अशामुळें तुमची किंवा मालकाची जबाबदारी कमी होत नाहीं. पण तुमच्या लबाडीची मात्र खात्री होते. करितां ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत हिरजी भाटे यांच्याशी सवदा केलेल्या भावाप्रमाणें दाम धरून सर्व हिशेब आह्मांस दाखवून आमचे तुमचे कडेस फिरत असलेले रुपये आह्मांस देऊन रसीद घेऊन जावी व हिशेब साफ करावा सदर्हू व्यापारांत आह्मांस नुकसानी मुळींच नसून उलट नफा असतां तुह्मी लबाडीनें नुकसानीची रक्कम दाखविली हें आह्मांस मंजूर नाहीं. व पुढें मागें तुमची कुरकुर चालणार नाहीं. ह्मणून आठ दिवसांचे आंत सर्व निकाल करावा. नाहीं तर तुमचेवर विश्वास घात केलेबद्दल फौजदारींत फिर्याद करून शिवाय नुकसानीची सर्व रकम व्याजासुद्धां व खर्चासुद्धां तुमचेपासून भरून घेतली जाईल. याजकरितां ही अगोदर नोटीस दिली आहे. कळावें तारीख २६ एप्रिल १९०१ इसवी.

सही
विठू वल्लद बापूजी राहणार सवंदळ तालुके आकोट पोष्ट हिवरखेड दस्तुर खुद्द.

### नोटीस

नोटीस बेशमी किसन वल्लद लक्ष्मण मुनीम निसबत भिकारचंद दुलीचंद तेली दुकान शेंगांव ता० खामगांव जि० अकोलें यांस:--

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, साल मजकूरचे हंगामाचे वेळीं तुह्मी आपले दुकानचा पैसा आह्मांस कर्जाऊ देण्याचे कबूल केलें ह्मणून मी त्या रकमेच्या आधारावर कापसाचा व्यापार करूं लागलो. व त्याप्रमाणें माल खरेदी करण्यास पैसेही दिले. त्यावेळीं तुह्मी असें सांगितलें कीं, आमचे दुकानचे पैसे देऊन व्यापार करण्यास मालकाची परवानगी आहे. वरून खरेदीस सुरवात केली. कापूस खरेदी करून गंजी लाविली. व तो कापूस जीनमध्यें वटवून रुई ओझे १०६॥ तयार झाले. ते ओझे विकण्या करितां भाव चांगला होता त्या वेळीं मी विकण्यास सांगितलें असतां तुमचे सल्लयानें मी अधिक भावाच्या आशेने स्वस्थ बसलों. नंतर ते ओझे तसेंच राहूं देऊन मी माझे गांवीं गेलो. गांवी जाऊन परत आल्यावर मी तुह्मांस चार लोका समक्ष साफ सांगितलें कीं, माझे ओझे विकूं नका. मी अकोल्याचा भाव समक्ष पाहून मग कोठें व कसा विकावयाचा हें ठरवीन, असें तुह्मांस निक्षून सांगून ठेविलें. नंतर मी तसाच अकोलें येथें भाव पहाण्यास आलों. अकोल्यास त्या दिवशीं भाव ५५ चा होता. दोन दिवस तेथें राहून ओझे अकोल्यास आणून विकावे, कारण तेथें भाव जास्त होता ह्मणून शेगांव येथें आलों. दुकानावर आलों असतां तुह्मी ४८॥ च्या भावांत ओझे दिले ह्मणून सांगितले. तुह्मांस मी ओझे विकूं नका ह्मणून सांगितलें असतां माझ्या पश्चात मुद्दाम ओझे विकून टाकले. कोणास विकले ह्मणून तुह्मांस विचारलें असतां तुह्मी कोणास ओझे विकले हें सांगण्याचें नाकारिलें आणि हिशेबहि दाखविला नाहीं. यावरून तुमचा लबाडीचा डावपेच प्रथम दिसूं लागला. तशीच सरकी वगैरे तुह्मी आपल्या मर्जीप्रमाणें विकून टाकून अखेरीस हिशेब मागतां तो दाखवीत नाहीं. फक्त नुकसानी आहे ह्मणून कळविलें. एकंदरींत तुह्मी आमच्याशी दगाबाजी करून आपला स्वार्थ साधला. कारण मी परस्पर शोध केला असतां असें समजलें कीं आमचे चांगले रुईत तुह्मी आपली पाण्याची खराब रुई घालून कमी भावानें विकून टाकिली व दुकानांत अखेरीस आमचे नांवावर नुकसानी काढली. याज करितां तुह्मांस मुद्दाम नोटीस देण्यांत येते कीं, ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत सर्व खरा हिशोब आह्मांस चार लोकांसमक्ष समजवून द्यावा माझ्या मनाईला तुह्मी न जुमानतां ओझे विकले, ह्मणून ५५ च्या भावानें तुह्मांकडून सर्व रक्कम चुकती करून घेतली जाईल. तसेंच त्या दिवशीचा सरकीचा भाव लावून रुपये जमा करावेत. तसें न केल्यास माझे पाठी मागें व माझी परवानगी नसतांना जंगम मालाचा गैरशिस्त उपयोग केल्याबद्दल फौजदारींत तुमचेवर फिर्याद करूं. तुह्मी आमचे कडेस काढिलेले बाकी बद्दल आह्मी मुळींच जबाबदार नाहीं. आणि तुह्मास मात्र वरील शर्ती प्रमाणें माझा हिशोब चुकता करावा लागेल. सदरहू व्यवहारा बद्दल असें समजलें कीं तुह्मी मालकाच्या विरुद्ध बिनहुकुमानें आपला फायदा होण्या करितां आह्मास बुडवून आपला स्वार्थ केला याजबद्दल नीट विचार करून आठ दिवसांचे आंत सर्व निकाल करावा. व नोटिशीचा जबाब मुदतीचे आंत द्यावा. असा निकाल न केल्यास पुढील व्यवस्था करणें भाग पडेल.

तसेंच तुमच्या नुकसानीची रकम चुकाविण्यासाठीं आणि तुह्मास धीर द्यावा ह्मणून उक्त रुपये १४२५ तुमच्या दुकानीं आणून ठेविले. तरी देखील तुह्मी हिशेबाची फेड न करितां उलट तीं सर्व रकम नुकसानी ह्मणून च घेतली व पावतीही तशाच अर्थाची लबाडीची लिहिली असें आतां मला कळलें. मला लांबणीवर टाकण्याचा हाच तुमचा इरादा दिसतो. कळावें तारीख २६ माहे एप्रील सन १९०१ इसवी.

सहीची निशाणी रेघ.
गणपती वल्लद बापूजी धामोडे
रहाणार सवदल ता० अकोट
याच्या हातची असें.

### नोटीस

बेशमी राणुजी वल्लद जानूजी कुणबी राहणार खानजामाबाद तालुका व जिल्हा इलिचपूर यांसः—

खाली सही करणार इजकडून कळविण्यांत येतें कीं कवठे बुजरुक तालुके अकोट येथील माझें शेत मी आपणांस कांहीं विशेष अडचणीमुळें एक वर्षा खालीं २०० शें रुपयांस खरेदी लिहून छापून हि दिले होते. खरेदी लिहिते वेळीं आपला असा ठराव झाला होता कीं मी जेवेळीं आपले रुपये व्याजासकट परत देईन त्या वेळीं हें खरेदीखत मजला तुम्ही फाडून द्यावेत. हा करार आपसांत झाला व तुमच्या भलाईवर व विश्वासावर मी स्वस्थ बसले. आपण हा करार त्या खरेदीखतांत लिहिला नाहींत, तरी आपण आपली जबान खोटी कराल असें माझ्या स्वप्नींहि आलें नाहीं. म्हणून मी याबद्दल जास्त घासाघीसाहि केली नाहीं. पण तुम्ही आतां मला चांगले फसविण्याचा इरादा ठेविला आहेसे दिसते. कारण मी आपले २०० शें रुपये व्याजासह देत असतांहि आपण ते घेऊन खरेदीपत्र रद्द करीत नाहीं. व आपला झालेला करार कागदांतही नाहीं व तो तोंडी आतां नाकबूल करिता. मी माझें शेत खरेदी सारें २०० रुपयांस दिले. इतक्या थोड्या पैशात ते खरेदी देण्याचे कारण तरी आपला हा शेत परत देण्याचा करार हेंच होय. असें नसते तर त्या शेताची किंमत तें विकावयास काढिलेंच असते तर ह्याच्या तिप्पट चौपट सहज कोणीहि दिली असती. असे रीतीनें माझ्या सारख्या भोळ्या बाईला फसवून तुम्हांस काय मिळणार कोण जाणे. असो आतां हेंच कळवितें कीं, आपले व्याजासह रुपये तयार आहेत ते नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत घेऊन जाऊन माझे खरेदीखत परत द्यावे. असे वरील मुदतींत न झाल्यास मी आज तारखे पासून व्याज देणार नाहीं. व झालेलें खरेदीखत बातल आहे. मागें पुढें याबद्दल कांहीं कचेरीदरबार करणे लागल्यास अखेर निकाल होईपर्यंत सर्व नुकसानी तुम्हांकडून भरून घेतली जाईल. कळावें तारीख २७ माहे एप्रिल १९०१ इसवी.

सही

मागीरथी मर्द लक्ष्मण सोनार
रहाणार शिरसोळी तालुके
अकोट तर्फे मुखत्यार खु-
शाल वल्लद हणमंतरा-
व पाटील रहाणार
कवठे बुजरुक
ता. अकोट.

---

### नोटीस

बेशमी वायलाजी वल्लद सूर्यमान रावणकार राहणार कवठें बुजरुक ता. अकोट— यांस.

खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं तुम्ही माझी २०० रुपयांची गरज भागविण्यासाठीं शेताच्या खरीदीचा व्यवहार तुमचे सोयरे राणूजी याजशी करविला आणि मला सांगितल्याप्रमाणें त्या खरेदीखतांत व्याजासुद्धां रुपये परत करून शेतावरील खरेदीच्या रुपयांचा गहाणाचा हक्क सोडविण्याची शर्तही लिहिली नाहीं· ही तुमची निवळ लबाडी आहे तर या संबंधानें जी नुकसानी होईल तीजबद्दल जबाबदार तुम्ही रहाल आणि कपटाच्या प्रकाराबद्दल तुम्हावर फौजदारीहि करण्यांत येईल. कळावें. तारीख २७ एप्रिल सन १९०१.

सही

भागीरथी मर्द लक्ष्मण सोनार राहणार
शिरसोली तालुके आकोट तर्फे मु-
खत्यार खुशाल वल्लद हणमंतराव
पाटील राहणार कवठे बुज-
रुक ता. आकोट.

---

वऱ्हाडसमाचार

---

मिती वैशाख शुद्ध ११ शके १८२३

---

## आढावा

(१८९९-१९०० सालाच्या जमाखर्चाचा)

या प्रांताचें उत्पन्न सन १८९८-९९ सालीं १ कोटी १६ लक्ष ८२ हजार २८४ रुपये होतें तें १८९९-१९०० त म्हणजे गेल्या दुष्काळाच्या वर्षी फार कमी झालें हें अगदीं स्वाभाविक आहे. दुष्काळाच्या खडतर वर्षीत एकंदर उत्पन्न ९७ लक्ष ७३ हजार ४०१ रुपये झालें. उत्पन्नाचा व खर्चाचा मेळ बसण्याचें हें वर्ष नव्हतें आणि हा प्रांत इंग्रजी खाली आल्या पासून खर्चही इतका पुष्कळ कधींच करण्यांत आला नव्हता. या दुष्काळाच्या पायीं खर्चाचें प्रमाण फार वाढलें. एकंदर खर्च १ कोटी ४९ लक्ष ७६ हजार ३०८ रुपये झाला; त्या पैकीं निव्वळ दुष्काळा साठीं ३६ लक्ष रुपये सरकारानें खर्ची घातले. बाकीची रक्कम दरसालच्या खर्चाची आहे आणि हा खर्च फार मोठा आहे हें प्रतिपादन करितां करितां आम्ही अति श्रमलों आहों. तथापि इष्ठ कार्याची सिद्धी होत नाहीं इतकेंच नाहीं तर या दिशेनें राज्यकारभारानें धोरण बदलले आहे असेंहि समाधान मानण्यास आम्हा जवळ आधार नाहीं.

प्रांताचा जो ऐनकाळीचा वसूल येतो म्हणजे एकंदर उत्पन्नांतील लोकल फंडाची रकम कमी करून जें उत्पन्न शिल्लक राहतें त्याची व्यवस्था गेल्या २१ वर्षी पासून इंग्रज सरकाराकडून एका नियमित पद्धतीवर होत असते. ती पद्धती अशी कीं सिव्हील कारभार व लष्करी कारभार अशा दोन खर्चाच्या बाबी स्वतंत्र केल्या आहेत. प्रांताच्या सिव्हील कारभारासाठीं अलिशान रेसिडेंट साहेबांस ऐन उत्पन्नातून शेंकडा ५० रुपये प्रमाणें निराळें उत्पन्न कापून देतात; आणि त्या पैशाचा खर्च करण्याची मालकी अलिशान रेसिडेंट साहेबांकडे सोंपविली असते व त्यांस त्या रकमेच्या अंदाजानेंच सर्व कारभार मोठ्या बातावेतानें चालवावा लागतो. सिव्हील कारभारासाठीं निराळी करून दिलेली रकम वजा जातां बाकीच्या रकमेंतून लष्करी खात्याचा खर्च भागविला जातो आणि त्या नंतर जी शिल्लक राहील तिच्यावर मालकी निजाम सरकारची आहे म्हणून खर्चवेंचाच्या बाताबेताला संभाळून १०२० लक्ष रुपये दरसाल निजाम सरकारास देण्यांत येत असतात. या रितीनें वऱ्हाड प्रांताच्या उत्पन्नावर खर्चाचे तीन शह आहेत. एक लष्करी खर्च, दुसरा सिव्हील खर्च, व तिसरा निजामाच्या स्वामीत्वाच्या हक्काचा खर्च; या तीन बाबी पैकीं लष्करी खात्याची बाब फार मोठी आहे. गुदस्ता ३८ लक्ष ४२ हजार ७३४ रुपये लष्करी खात्या निमित्त खर्चण्यांत आले. ही रक्कम सालोसाल वाढत आहे आणि तिला कोणताच परबंध नाहींसा झालेला आहे. निजाम सरकारच्या मालकीच्या खंडणीचा बोजा रयतेवर विनाकारण बसत आहे. राज्यकारभाराचा खर्च अगोदरच फार जबर आहे आणि त्याला या खंडणीची भर पडली म्हणजे रयतेवरील करांचा मोठा बोजा बहुगुणित होतो.

राजकीय दृष्ट्या अंमल इंग्रजी व मालकी निजाम सरकाची असा दुहेरी जोरा या प्रांतावर आहे. एक निजामशाही बरी किंवा एक इंग्रजी बरी पण या दोन्ही बाजूंची एकवट मिळणी रयतेला फार त्रासदायक असून मोठी नुकसान काढते. या शिवाय लष्करी खात्याच्या खर्चाच्या मोठ्या रकमेमुळें सिव्हील कारभाराचा उपासमारा होतो. अलिशान रेसिडेंट यांस पैशाच्या कमतरतेमुळें नव्या सुधारणा करितां येत नाहीं. आणि कसा तरी राज्यकारभाराचा गाडा चालूं ठेवण्यापलिकडे त्यांची गती लांबवर जात नाहीं. अशा स्थितींत सालिना उत्पन्नाची जी फाळणी होत असते तिचें प्रमाण बदलण्यात येईल आणि प्रांताच्या कारभाराला जास्त रक्कम मिळेल तर मोठें कल्याण होण्याचा संभव आहे.

---

वऱ्हाड प्रांताचा विस्तार १,१३,९९,८७४ एकर आहे. या क्षेत्रा पैकीं शेंकडा ७२·८प्रमाणानें म्हणजे ८२,६०,११९ एकर जमिनीची जमाबंदी झाली असून ती लागवडींत येण्यासारखी आहे. अशा लागवडींत येण्यासारख्या जमिनिपैकीं शेंकडा ३ या प्रमाणाची जमीन अद्याप लागवडींत यावयाची आहे. बाकीची सर्व जमीन म्हणजे ८०,१२,९०४ एकर वाहिती खालीं आहे. या शेतीच्या जमिनीपैकीं बागाईती जमीन फक्त ६२९७८ एकर आहे. वरील आंकड्या वरून हें लक्षांत येईल कीं वऱ्हाड प्रांताची जमीन खरीपाच्या व रब्बीच्या पिकाला चांगली खरी पण तिला पाटस्थळाची जितकी सोय पाहिजे तितकी नाहीं. पाटस्थळाचें पाणी या मुलूखांत विपूलतेनें देतां येईल किंवा नाहीं याची देखील मोठी शंका आहे. हा प्रांत निव्वळ शेतीचा आहे आणि रयतेचे सर्व जुनें धंदे ठार बुडाल्यामुळें सर्वांचीच उपजीविका शेतीवर आहे. शेतीचा विस्तार नवा होण्याला जमीन पुरेशी नाहीं तेव्हां साऱ्याच्या बाजूनें सरकारानें सवलत दिल्या शिवाय शेतीवर निभाव लागणार नाहीं.

---

## रामायण

(अंक १९ वरून पुढें)

सीता रावणाला म्हणते कीं, " इक्ष्वाकूंच्या घरीं मी बारा वर्षे (विवाहानंतर) राहिलें. तेराव्या वर्षी राजानें रामाला यौवराज्याभिषेक करण्याचें योजिलें. नंतर कैकेयीनें वरदान घेऊन आम्हांस वनवासास धाडिलें. हल्लीं रामाचें वय २९ वर्षांचें आहे व मी अठरा वर्षांची आहे. " रामाचें वय विवाहाचे वेळीं सोळाहून थोडें कमी होतें. तो वनवासास निघाला तेव्हां कौसल्या म्हणते " याला झाल्याला १७ वर्षे झालीं. " विवाहा नंतर बारा वर्षे राम अयोध्येंत राहिला. तर २८ वर्षे होतात म्हणून टीकाकारांनीं शक्कल काढिली आहे कीं 'झाल्याला' (जातस्य) याचा अर्थ 'उपनयन झाल्याला' म्हणजे उपनयन कालींचें वर्षे क्षात्रियाचें ११ व ही सतरा मिळून २८ वर्षे. जुळलें पण सीतेनें रामाचें वय २९ वें सांगितलें याची वाट काय ! टीकाकार पंचविसावें सांख्य तत्व जें चैतन्य तद्रूप राम आहे असा करितात. दुसरी ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं सीतेचें हें म्हणणें तेरा वर्षे वनवास भोगल्या नंतरचें आहे; पण येथें ही टीकाकार 'वन प्रवेश समयीं इतकीं वर्षे झालीं होतीं असा अर्थ करून या विरोधी वचनांची व्यवस्था लावतात. उत्तर कांडांत विवाह कालीं सीता बाला होती व राम बाल होता असें म्हटलें आहे.

माझ्या मतें हे विरोध प्रक्षिप्तमूलक असले पाहिजेत. रामायणाची वाढवून सुधारलेली दुसरी आवृत्ति तयार झाली त्या वेळीं 'अष्ट वर्षा भवेत् कन्या' इत्यादि स्मृति विहित वाक्यांच्या प्रभावाचें हें फळ असावें.

सीतेचा स्वयंवर झाला हें प्रसिद्ध आहे सीता वीर्यशुल्का होती म्हणजे वरानें वीर्य हें शुल्क देऊन वरावी असें ठरविलें होतें. परंतु, हल्लींची रामायणाची जी प्रत उपलब्ध आहे तीवरून स्वयंवर पद्धती वाल्मीकीला फारशी पसंत होती असें दिसत नाहीं. कुशनाभाच्या मुली मरुताला म्हणतात " पिताच आमचा प्रभु, तोच आमचें परम दैवत. पिता ज्याला आम्हाला देईल तोच आमचा भर्ता होईल. " (१,३२,२१) सीता रावणाला आपला वृत्तात सांगते त्यावेळीं म्हणते " रामानें शिवधनू भंगिलें तेव्हां अयोध्याधिपती पित्याचा विचार (मर्जी—छंद) डावलून नसतां रामानें माझा प्रतिग्रह केला नाहीं " बालकांडाच्याही शेवटीं 'बापानें करून दिली म्हणून सीता रामाला प्रिय होतीच " (१,७७,२६) असें म्हटलें आहे; याचा भावार्थ ब्राह्मविवाह श्लाघ्य आहे असें टीकाकार म्हणतो तें खरें आहे. सीतेच्या बहिणींचे विवाह स्वयंवरानें झालेले नाहींत.

या विवेचनाचा निष्कर्षार्थ असा निघतो कीं रामायणाच्या द्वितीयावृत्तीच्या कालीं स्वयंवर प्रचारांतून जात चालला होता, वि-

याचे अधिकार वाढत चालले होते, व बालविवाह दिवसानुदिवस प्रशस्त वाटूं लागावयाला लागला होता. अर्थातून पित्यानें अधिकार चालवावयाचा तेव्हा कन्यांचें विवाहवय अष्ट वर्षांकडे धांव घेत चाललें होतें. रावणाला सांगितलेल्या वृत्तान्तांतील वय खरें धरलें तर सीता लग्नाच्या वेळीं सहा वर्षांची होती व त्यावेळीं तिचा रामाशीं एकांतांत सहवास होत असे, असें सिद्ध होतें. पत्नीदकारा संबंधी कायदा पास होण्यापूर्वी जें अभिक्रंदन झालें त्यांत हीं वचनें कोणी पुढें केलीं कीं नाहींत हें मला ठाऊक नाहीं.

रामायणकालीन विवाहांतील विधि सांगण्याची फारशी जरुरी दिसत नाहीं. गोदान वगैरे कांहीं विधी हल्लींहून निराळे असावेत असें वाटतें; पण मधुपर्क, पाणिग्रहण व होम हे त्यावेळीं ही होते.

वर वधूच्या पितृगृहीं लग्नाला जात असे. त्या बरोबर त्याचा बाप; वृद्ध ब्राह्मण, राजा असेल तर कोशाध्यक्ष, बलाध्यक्ष वगैरे जात असत. पण चमत्कार हा वाटतो कीं वरमाय विहिणीच्या गृहीं जात नसे 'सूनमुख' लग्नाहून स्वनगरास परत आल्यावर वरगृहीं होत असे. तेव्हां रुसणें, फुगणें, त्या वेळीं कमी असावें असें वाटतें. वऱ्हाडांत देशमुखांत वराची आई लग्नाला जात नाहीं. तरी रामायणकालीं ही जामाताचा वरपक्ष तो वरपक्षच असे. कन्येच्या बापाला तिच्या बद्दल काळजी असेच. तीन कुळें ती संशयांत ठेवते असा सुमालीचा उद्गार आहे. कन्यापितृत्व पत्करण्याला या वेळींही कोणी मानकांक्षि खुषी असतील असें दिसत नाहीं. (७,९,१०-२१) सीता ह्मणते 'कन्येचा पिता शक्रतुल्य असला तरी आपल्या बरोबरीच्या व आपणाहून कमी अशा योग्यतेच्या व्याह्या पासूनही अपमान पावतो.' तर मग टीकाकार कैमुतिक न्यायानें ह्मणतो आपणाहून वरिष्ट अशा पासून मानभंग पावेल हें बोलायला नको.

(पुढें चालेल)

# The Berar Samachar

MONDAY APRIL 29 1901

Agriculture in Berar is in a backward stage. It needs a thorough improvement on all sides. It is the principal industry of the province and it is to be much regretted that we have reasons to suspect that a process of deterioration makes agriculture a useless and worthless trade. The old ways of doing work on a field are almost stereotyped and the men who do follow agriculture as a business have lost all attractions for it. There is a sort of estrangement between the capitalists & the agriculturists of Berar. The first are owners of the landed property whereas the majority of the agriculturists form a large number of lessees of fields and have a limited interest in the progress of griculture. Those who work in a field do not look forward beyond the cultivation for one year. Their interests are limited to the crop of the year of their lease. Their labour is concentrated in getting from the land the largest crop they can lay hold upon. Their game is not to improve the permanent holding of the land. These temporary labourers on a field form the largest portion of the agricultural community of the province. There are some people who own a field or two and are free from the curse of indebtedness. These people have been reforming agriculture according to their light and learning and represent the well-to-do section of the agricultural masses. The latter section is however very limited in number and may well be left out of consideration in so far as we have to determine our chances of making a tangible progress in agriculture. Thus there is no community of interests between the capitalists who own land and the agriculturists who work in it. There is a sort of fight between the two classes of people who have within their making the best and the worst of the agricultural progress in the province. For the sake of convenience we will describe the capitalists who hold land from the Government as the middle men who lease it out to people who cultivate it to earn their bread. The present system of leasing land at a fixed rent is one of the main causes as to why agriculture does not show any signs of improvement. Where there is no feeling of unity of interest there is likely to be no common partnership between the land—owners and their tenants. It is therefore highly necessary to force something like the Batai system on the land—holding capitalists. We see the evil at work and we think that it cannot be remedied unless it be put down with a strong hand.

The rates of interest that prevail in Berar are also another cause of impairing all progress in agriculture. The high rates of interest do facilitate the devilish march of poverty and the poorer classes are being deprived of the golden harvest of their work in the field whereas the money-lenders flourish in the business of usury and reduce the agricultural puasses to a state of utter helplessness. There is thus an easy market and a free play for capital. It is lent out at interest and money—lenders think it a bad bargain to invest it in land or in improving the agriculture. The gains by way of interest on loans are much more than the gains of investments in agriculture. This is the plain secret as to why land holding mogey—lenders do not engage themselves in agriculture but are quite willing to have a larger scope for their money and to open new chances of acquiring land from the hands of their debtors in course of time. The rates of interest can alone be controlled by a competing agricultural Bank. The Government advances of Takvai go a long way to enable agriculturists to improve their land but cannot check the rate of interest because there are people who cannot get Tukvai but want money very badly. It is for these people that an agricultural bank is urgently required There is also another way of checking effectively the rate of interest by a legislative measure. Unless this is done we do not hope to see any indications of progress in agriculture. The system of leases at fixed rents and the business of money-lending should both be brought under an effective control before capital can be attracted towards agriculture.

## वऱ्हाड

हवामान-- आकाशांत ढग पुष्कळसे जमतात, उकाडा विशेष होतो आणि मधून मधून पाऊसही पडत असतो. हवेतली रुक्षता कमी होऊन मृग शितळाइ सारखी व्यवस्था दिसते. ताप, खोकला वगैरे आजार अधीक जोरावर आहेत आणि त्या मानानें सार्वजनिक आरोग्य समाधानकारक नाहीं.

मि० अजिमुद्दीन आफिशिएटींग ए० क्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांस वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पिच्छेहाटीमुळें चिखलीस तहशिलदारीवर नेमलें आणि रा० रा० दत्तात्रय विठ्ठल सरंजामे बी. ए. तहशीलदार यांचें तेथील नायब तहशिलदारीवर पुनरागमन झालें. राजश्री सरंजामे हे चांगले विद्वान असून तहशीलदारीच्या कामगिरींत नांवाजलेले आहेत तेव्हां त्यांस लवकरच वरिष्ट हुद्देदारीवर नेमतील अशी आह्मास आशा आहे.

रा० रा० रंगनाथ विष्णु डोंकस आफिशिएटींग एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांची बदली येथून उमरावतीच्या कोर्टावर करण्यांत आली.

मि० सैफुद्दीनखान लालखान यांस आकोल्यास तहशिलदारीवर नेमल्या मुळें रा. रा. नारायण रामराव गुप्ते यांस परत क्लार्क आफ कोर्टाच्या जागीं वाशिमास जावें लागणार आहे.

वऱ्हाडच्या वकिलीची परीक्षा सप्टेंबरच्या दुसरे तारखे पासून उमरावतीला सुरू होईल. उमेदवारांचे अर्ज आवश्यक दाखल्यासह जुडिशिअल कमिशनरकडे ६ जून तारखे पर्यंत पोंचले पाहिजेत.

मि. करी असिस्टंट कमिशनर हे हक्काची रजा संपताच अकोल्यास रुजूं होतील आणि मि. क्ले असिस्टंट कमिशनर हे रजेवरून परत येताच यांची बदली अकोल्याहून उमरावतीस होईल.

रा. रा. गणेश बापूजी एक्स्ट्रा असिस्टंट क[illegible] जज्ज, उमरावती हे दीड महिन्याची रजा घेणार आहेत.

मे. क्लार्क साहेब कमिशनर हे पुढील महिन्याच्या २१ वे तारखेला म्हैसूरच्या रेसिडेंटाच्या जागीं रुजूं होण्या करितां रवाना होतील.

राजा इंद्रकरण आनररी अध्यक्ष, आकोला यांस आकोल्याच्या मुनसिपालिटीचे समासद नेमण्यांत आलें हें कळविण्यास आनंद वाटतो.

मि० हैदरअली जुडिशिअल सुपरिन्टेंडंट औरंगाबाद यांची बदली वाशिमास होऊन वाशिमचे मि० एडवर्डस यांस औरंगाबादेस बदलण्यांत आलें.

मि० सी. एच. हाल्डेन एक्स्ट्रा असि० कानसरव्हेटर यांची बदली वऱ्हाडांतून ब्रह्मदेशाकडे झाली.

शेगाव म्युनसिपालिटीच्या तीन समासदांची निवडणूक गेल्या १९ वे तारखेला होऊन खालील तीन गृहस्थांची बहुमतानें निवडणूक झाली आहे:-

रा० रा० मथुरादास राऊतमल.
,, मारुती चंद्रभान
,, इच्छाराम हुलाराम.

एक चिपळूणचे गृहस्थ आपल्या पत्नीसह वाशिमाहून तारीख २६ रोजीं आकोल्यास परत येत असतांना पहिल्या चौकी नंतर त्यांस तीन चोरांनीं गांठलें व गाडींतून ते ट्रंक काढून नेत होते इतक्यांत या गृहस्थांच्या धैर्याच्या व प्रसंगावधानाच्या आवेशाला भिऊन चोर पळून गेले आणि ते गृहस्थ सुरक्षितपणें आकोल्यास येऊन पोंचले हें कळविण्यास आनंद वाटतो. अशीं उदाहरणें या रस्त्यावर होत असतात तेव्हां पोलिसांनीं योग्य बंदोबस्ताची व्यवस्था ठेवावी आणि उतारूंनींहि योग्य तजविजी शिवाय जाण्याचें साहस करूं नये.

अत्यंत कळविण्यास अत्यंत दुःख वाटतें कीं रा. रा. हरिभाऊ पेंडसे, वकील मलकापूर यांस नवज्वराच्या योगानें देवाज्ञा झाली. हे गृहस्थ अगदीं तरुण व सुस्वभावाचे होते. त्यांच्या अकालीं मृत्यूमुळें किती संकटें ओढवलीं आहेत हें निराळें सांगण्याची गरज नाहीं. ईश्वरी इच्छा !

अग्नि प्रळय —शेगांवास राजश्री शिवचंदराय यांच्या जिनांतील कपाशीच्या गंजीला आग लागून लाख पाऊण लाखाचें नुकसान झालें. खामगांवच्या गांठ बांधण्याच्या कारखान्यांतही आग लागून ११ माणसें भाजून मेलीं.

## वर्तमानसार

पुरता विचार करा—एका शास्त्रज्ञानें असा शोध काढला आहे कीं, दोन तीनशें वर्षांनीं राजधानी कलकत्ता शहर याच्या भोंवतीं गंगेतील गाळ जमून तें अगदीं खेडें गांव होईल. तर मग महाराणी साहेबांचें चिरकालचें स्मारक तेथें करणें वाजवी होईल काय ? लाट साहेबांनीं स्मारकास सुरवात करण्यापूर्वीं याचा विचार, करावें हें चांगलें. एका नवज साहेबानीं रा. गुरुनींच्यासाठीं घराची जामीनकी सुद्धां पत्करली नाहीं कारण धरणीकंपाचा धक्का बसून केव्हां घर नाहींसे होईल कोण जाणें. मग स्मारकासारखें कृत्य अशा उजाड होणाऱ्या गांवांत नव्हे नाशवंत पृथ्वीतलावर तरी करण्याचें कसें धाडसी साहस करावें ? विद्याज्ञानाची एखादी दिव्य ज्योत सर्वांच्या अमर अंतरात्म्यांत पेटवून द्यावी ह्मणजे ती निरंतरची व जास्त तेजस्वी आणि प्रकाशदायी होत जाईल. असें स्मारक केल्यास अशा कुशंकांच्या वाऱ्याच्या झोतानें ती ज्योती जोरानेंच पेट घेईल व कधींहि विझविली जाणार नाहीं. पहा पुरता विचार करा; अद्यापि वेळ आहे.

चमत्कारिक वनस्पती—उत्तर हिंदुस्थानांत व आसामांत एक ज्योतिष्मती नांवाचें रोप सांपडतें. तें रात्रींच्या वेळीं बैरागी फकीर वगैरे लोक शोधून आणितात. हें रोप रात्रीं फार चमकत असतें. या वनस्पतींचे अंगीं तांब्याचें भस्म करण्याचा मोठा धर्म आहे. व अशा रीतीनेंच तयार केलेल्या ताम्रभस्माचा सोनें तयार करण्याकडे उपयोग होतो. हें भस्म महारोगावर उत्कृष्ठ गुणकारी आहे. योगी लोक ही वनस्पति सेवन करितात व ह्यामुळें त्यांची बुद्धि फार वाढते असा समज आहे. ही फार उष्ण आहे. अशी आख्यायिका आहे कीं, ही वनस्पती १० जणांनी सेवन केली पैकीं ८ जण यमपुरीस पोहोंचले व २ जण उत्तम ग्रंथकार झालें—हे दोघे विद्वान गृहस्थ ह्मणजे एक सिद्धांत बिंदुकार मधूसूदन सरस्वती व दुसरे तर्कावरील लेखक गदाधर भाट्टाचार्य हे होत.

नवीन तर्क—एका नादी विद्वानानें एकाच कुटुंबांतील फोटो एकत्र करून वंश निरीक्षण करून असें ठरविलें कीं, एकाच वंशातील पुरुषाच्या चेहऱ्या सारखा चेहरा तीस हजार फोटो एका पुढें एक जोडले ह्मणजे पुनः पुनः येतो., आणि स्त्रियाबद्दल चाळीस हजार फोटोनीं पुनरावृत्ति होते. ही कशी काय गानगड आहे याचा चांगला शोध झाला पाहिजे.

खाणींतलीं माकडे— चोवीस माकडें सात पुरुषां इतकें काम करितात. तीं माकडें बारीक बारीक सुवर्ण रजःकण एकत्र जमवितात. हीं आपसांत न भांडतां चांगलें काम करितात. जागा साफसूफ ठेवितात. गाडींतून पडलेले दगड पुन्हां ह्यांत घालतात व हीं कामें त्यास शिकविण्यास फार त्रासहि पडत नाहीं.

आमचे मोडी वळणदार उत्तम कित्ते सारे दोन दोन पैशास मिळतात. पण या देशाच्या उष्ण हवेस ते त्रासले व विलायतच्या सफरी करून येऊं लागले आहेत. अर्थातच विलायती वळणामुळें ते बऱ्या किंमतीस चढणारच. परंतु मोडी अक्षरास विलायत ही वळण कोण देणार ? आह्मांलाच आमचीं अक्षरें चांगलीं वाईट हें जास्त समजत नाहीं काय ?

टोळधाड— इराणमध्यें टोळांनीं पिकांचा फन्ना उडविला. उडणारे टोळ मोठमोठ्या आवाजानें उडून जातात. पण बिनपंखाचेहि टोळ अतोनात झाले आहेत व त्यास मात्र कांहीं उपाय चालत नाहीं. ह्यांचा कितीहि संहार केला तरी ते कमी ह्मणून होत नाहींतच.

गवताचे तेल व मेणबत्या-रशियांतील बाकू गांवा जवळील कांहीं जमिनींत चांगलें गवत उगवतें तरी त्यास गुरें तोंड लावीत नाहींत. तेथील लोकांचा भूतबाधा आहे असा समज होता. पण ह्याचें मुख्य कारण त्या तेलास तेलकट वास येत असल्यामुळें ढोरें खात नव्हती असें एका युरोपियनानें शोधून काढलें, लगेच त्या रसमरीत गवतांचें तेल व मेणबत्या करण्याकडे छान उपयोग होऊं लागला. एकेक चमत्कारिकच.

पुण्याचे प्रसिद्ध चित्रकार रा० पिंपळखरे हे चांगले पुढें सरसावत आहेत ही आनंदाची गोष्ट होय. त्यांनीं के० न्या० रानडे यांची तसबीर फार नामी काढली आहे ह्मणतात. तसेंच ह्मैसूर संस्थानांतून दोघा युरोपियन चित्रकारांस व यांस लार्ड राबर्टस यांची तसबीर काढण्यास सांगितली त्यांत रा० पिंपळखरे यांचीच सर्वोत्कृष्ट उतरली. अशा त्यांच्या गुणास राजाश्रय मिळो व ह्यांच्या गुणांची उत्तरोत्तर वहा होऊन ह्या कलेस व गुणिजनांस उत्तेजन मिळो ह्मणजे झाले.

दुष्काळास व जुलमी राज्यकारभारास राशयांतील लोक कंटाळून त्यांचें माथें फिरून गेलें आहे. व राज्याची उलथा पालथ करून टाकून राज्यक्रांती करण्याचा ह्यांचा भयंकर विचार झाला आहे.

चिनांत चीन सरकारचे गुप्त हेर फिरत आहेत व ते युरोपियन सैन्याची सर्व बर्दी तात्काळ सरकारास देतात.

हिंदुस्थानांत आणून सोडलेल्या बोअर कैद्या पैकीं कोणी पळून गेला तर त्यास धरून देणाऱ्यांस प्रत्येकी ५० रुपये बक्षीस देण्याचें ठरविलें आहे.

इंग्लंडांतील पोस्ट खात्यांत पुष्कळ स्त्रिया नोकर आहेत. ह्यांच्या पैकीं कोणी लग्न करून नोकरी सोडूं लागल्यास सरकारांतून त्यांस कांहीं पैसे देण्यात येतात व या साठीं दरसाल बारा हजार पौंड खर्च होतो. असें का हा गूढ प्रश्न उभा रहातो ;

दरमहा ५० रुपयांपेक्षां जास्त पगारवाल्यांना सरकारी इस्पितळांत फुकट औषध देऊं नये असा गायकवाड सरकारनीं ठराव केला आहे, बरोबर आहे. सरकारी दवाखानें गोरगरिबांसाठींच फुकट आहेत.

आश्चर्य–महाराणी स्मारक फंडास सध्यांचे इंग्लंडचे राजे साहेबांनीं १६७५० रुपये दिले. पण आच्या हिंदुस्थानांतील मांडलिक राजांनीं लक्षांनीं पैसे मोजले. जणु काय हजारांचे मापच ठाऊक नव्हतें. यजमानापेक्षां नोकरांनींच जास्त दातृत्व दाखविण्याचा उलटा प्रकार कोठला ?

---

नोटीस

नोटीस बेशमी. नारायणसींग वलद सितारामसिंग रजपुत राहणार कजबे येवदे तालुके दर्यापूर जिल्हे उमरावती हल्लीं वस्ती अकोट यांसः—

अजबासिंग वल्लद फतेसिंग रजपुत राहणार कजबे येवदे तलुके दर्यापूर यानकडून नोटीस देण्यांत येते कीं तू माझा नातलग असून माझे वृद्धापकाळीं, तू चांगले रीतीनें माझी व्यवस्था ठेवसील अशी मजला खात्री वाटल्यावरून मी कजबे येवदे येथील सर्वे नंबर ६६०–५६१–५६९ अशी तीन शेते व राहते घर घोडेनाटी व जंगम माल माझे मरणानंतर तुजला मिळावा ह्मणून मी तारीख १२ जानेवारी सन १८९९ इसवी रोजीं मृत्युपत्र करून नोंदून दिले व माझे तर्फे सर्व काम चालविण्याबद्दल तुह्मास मुखत्यारपत्रही करून दिले होते. परंतु माझे जिवंतपणीच तुह्मी माझेसी नीट रितीनें वागत नाहीं व आतांच बेमानपणाच्या गोष्टी सांगतां यानकरिता जे तुह्मास इष्टेटी बद्दल मृत्युपत्र करून दिले आहे ते मी या नोटीसीनें रद्द केले आहे. त्या इष्टेटीवर माझे मरणा नंतर तुमचा कांहीं संबंध राहीला नाहीं. मी त्या इस्टेटीचा मालक असून मी आपले जीवंतपणीच वाटेल त्या रितीनें व्यवस्था करीन व माझे मरणा नंतरही ही इष्टेट मृत्युपत्र रद्द झाल्यामुळें तुह्मास मिळावयाची नाहीं. त्याच प्रमाणें तुह्मास जे मुखत्यारपत्र करून दिले आहे तेही आज तारखे पासून रद्द आहे, कळावे, तारीख २३ माहे एप्रील सन १९०१ इसवी.

सही
अजबसींग वल्लद फतेसींग
याची असे.

---

नोटीस.

जानकी मर्द मानाजी भारंबे रहाणार खामगांव. हीसः—

मी खाली सही करणार या लेखानें असें कळवितो कीं, टाकळी इरुसा येथील शेत सर्वे नंबर ३० हें पंढरी सूर्यभान धंगाळ ह्यांचें नांवानें आहे, पैकीं तीन हिस्से तुमच्या हिश्याचे आहेत ते तुह्मी आह्मांस ४१५ रुपयांस विकत देण्याचें सुमारे दोन अडीच महिन्या पूर्वीं कबूल केलें होतें व त्या प्रमाणें आह्मीं आपणास १० रुपये इसारहि दिला होता. पुढें दोन चार वेळा बाकी राहिलेले ४०५ रुपये घेऊन आह्मी आपल्या घरीं आलों पण तुह्मी आतां उडवा उडवीच्या गोष्टी सांगता. व झालेल्या व्यवहारा प्रमाणें आह्मास शेत न देण्याचा तुमचा विचार दिसतो. तर या नोटिशीनें असें कळवितो कीं नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत राहिलेले ४०५ रुपये मेक्षीदास श्रीराम लड्डा खामगांव यांच्या दुकानीं अनामत ठेविलें आहेत ते घेऊन जावेत. व ते नेण्यापूर्वी विकत देण्याचें ठरलेलें शेत आमचे ताब्यांत द्यावे. असें न झाल्यास रीतीं प्रमाणें तजवीज करण्यांत येईल. व अखेर निकाल होई पर्यंत सर्व खर्च आपणास द्यावा लागेल. कळावे तारीख २२ माहे एप्रील सन १९०१ इसवी.

सहीची निशाणी
दतु वल्लद सूर्यभान धंगाळ
राहणार टाकळी इरो ता-
लुका खामगांव तर्फे
मुखत्यार पंढरी वल्लद
सूर्यभान राहणार टा-
कळी इरो याच्या
हातची रेघ.

---

नोटीस

रा० रा० लाल माधोसिंग वल्लद सरदारसिंग क्षत्री राहणार नांदखेडे ता. अकोट.

यांसः—

मी खाली सही करणार या लेखानें असें कळवितें कीं, माझा नवरा लक्ष्मणसिंग व त्यांचे चुलत बंधु प्रयागसिंग या उभयतांनीं उत्तर हिंदुस्थानांतून इकडे येऊन सर्व जिनगी स्वकष्टानें कमाविली होती पुढें माझा नवरा लक्ष्मणसिंग हा मृत्यू पावला त्यास आज सुमोर सात आठ वर्षे होत आलीं नंतर मी व प्रयागसिंग दोघे एकत्रच होतो पण प्रयागसिंग मरण्यासही दोन तीन वर्षे झाली. प्रयागसिंग यांचे मृत्यूमुळें मी एकटीच पडले ह्मणून आपणांस हिंदुस्थानामधून इकडे बोलावून घेतले. मनातील हेतु एवढाच कीं आपण आपल्या बंधुद्वयांचे सर्व यथासांग क्रियाकर्मांतर करित जावें. व ह्या साठीं मी रोख २०० रुपयेहि तुह्मांस दिले होते. यापुढें मी एकटीच असल्यामुळें आपणास चारचौघांच्या ह्मणण्या प्रमाणें ठेवून घेतले. आपण माझे प्रत्यक्ष जेठ आहात ह्मणून घरचेंच मनुष्य माझ्या सर्व जिनगीची देखरेख करण्यास व वहिवाट करण्यास राहिल्यास चांगलें असें समजून आपण एकत्रच राहूं लागलों. शेतीची खातीं बदलावयाची राहिली होती तीं, मी बायको माणूस असल्यामुळें, व कचेरींत जाण्यायेण्याचा त्रास न पडावा ह्मणून तुमच्याच नांवानें लागल्यास हरकत नाहीं असें ठरविलें. पण माझी ह्या जिनगीवरील पूर्ण सत्ता मालकी कोणच्याहि प्रकारें कमी झाली नाहीं. माझा आपल्यावर पूर्ण विश्वास बसला होता. व ह्या विश्वासावरच मी आपली जिनगी तुमच्या सुपरूत करून कांहीं दिवस माझ्या भावाचे भेटीकरितां माहेरीं गेले. व सात आठ महिन्यांनीं परत येऊन पहाते तों तुह्मी सर्व जिनगी बळकावून बसण्याचा विचार केला होता. तेव्हां मी माझी जिनगी माझ्या कबजांत घेतली. नंतर आपणांस कांहींच उरलें नसल्यामुळें तुह्मी स्वतां चार पंच जमा केलेत व माझी मनधरणी त्यांच्या कडून केलीत. मलाहि आपली दया आली व मी माझ्या स्वतांसाठीं एक हिस्सा ठेवून तुह्मी लेकूरवाळे आहांत ह्मणून तुह्मांस दोन हिस्से देण्याचें कबूल केलें. असे करतेवेळीं असेंहि पंचानीं ठरविलें कीं माझ्या हिश्शाची विल्हेवाट मला वाटेल तशी करण्याचा पूर्ण अखत्यार आहे व तसेंच तुह्मीहि आपल्या हिश्शाचें वाटेल तें करावें. मी माझे हिस्से विकीन, बक्षीस देईन किंवा मन चाहील तें करीन. ह्या ठरावा प्रमाणें तारीख १–४–१९०१ रोजीं आपले कागदपत्रहि झाले. आपण तारीख २४।३।१९०१ रोजीं वऱ्हाडसमाचारच्या ११ व्या अंकांत जी नोटीस व जाहिरात दिली ती अर्थातच व्यर्थ झाली. या नोटिशीचें उत्तर नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत तुह्मां कडून आलें पाहिजे व आपण दिलेली नोटीस चुकीची आहे असा त्यांत स्पष्ट उल्लेख असला पाहिजे. असें न झाल्यास मी आपणांस देऊ केलेले दोन हिस्सेहि देणार नाहीं व घरांतूनहि घालवून देईन हें खूप ध्यानांत धरावें. कळावें तारीख २३ एप्रिल १९०१ इसवी.

सही
[ सहीची निशाणी ] सारजी
मर्द लक्ष्मणसिंग परदेशी क्ष-
त्री रहाणार नांदखेडे ता.
अकोट हिचे हातची
बांगडी.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.